# अनुशासनपर्व



# महाभारत

मराठी अनुवाद

## खंड ४७

**श्री. अशोक कोठारे**



# महाभारत

## महाभारत खंड सत्तेचाळीसावा

## अनुशासन पर्व भाग दुसरा

## अनुशासन पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/230923432381235123662340238123 50.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० डिसेंबर २०२१**

## अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मूळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत पंन्नासांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा सत्तेचाळीसावा खंड, अनुशासन पर्व भाग दुसरा, आपण आता वाचणार अहात. ह्या खंडामध्ये व्यावहारिक नितीशास्त्राची उदाहरणं आणि मनुस्मृतीतील मूळतत्त्व सांगितली आहेत. ब्राह्मणांचे महत्व विस्ताराने सांगितले आहे.
त्याशिवाय विविध दान प्रक्रियांची मोठी चर्चा ह्यामध्ये आहे. दान आणि भीक ह्यातील फरक सांगतात भिष्माचार्य. दान घेणार्या ब्राह्मणाची जबाबदारी त्यात सांगितली आहे. विशेषकरून राजांना त्याची कामं करतांना अनेक अन्याय्य कृत्य अनिवार्य असतात. त्यामुळे जे भयंकर पाप होत असते त्याच्या निवारण्यार्थ योग्य क्षमतेच्या ब्राह्मणांना, ऋषींना ते दानं करत असतात. राजाचे ते भयंकर पाप ब्राह्मण स्वतःवर घेतो त्याच्या नुकसान भरपाई प्रित्यर्थ ते भूदान, गोदान तसेंच सुवर्णदान करण्याची प्रथा प्राचीन काळापासून आपल्या वैदिक धर्मात प्रचारात आहे. त्या पापाचे क्षालन ते तपस्वी ब्राह्मण नंतर घोर तपयज्ञ करून करत असतात. त्याची किंमत अशा स्वरुपात ते दान असते. त्यासाठी पूर्णवेळ व्रतस्थ राहून अनुष्ठानं करणारे पवित्र ब्राह्मण दान स्वीकारण्यासाठी राजा निवडत असतो. त्याची माहिती ह्या खंडात आपण वाचणार अहात.
ह्या आधीच्या शांती पर्वांतील खंडांतून नितीशास्त्र आणि अध्यात्म विद्या समजावून सांगितले आहे. हिंदू धर्माचे हे दोन भाग आहेत. त्यानंतर कर्मकांड येते परंतु, त्यावर महाभारतात विशेष चर्चा केलेली नाही. कर्मकांड आगम शास्त्रातून तयार झाली आहेत.
शांती पर्वात हिंदू धर्माचे मूलभूत ज्ञान सांगितले आहे. त्यात नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड अशा तीन विभागात ते दिलेले आहे. युधिष्ठीर व भिष्म ह्यांच्या संवादाच्या रुपात ते दिलेले आहे. नितीशास्त्रात माणसांने इतर लोकांशी, प्राण्यांशी व वस्तुमात्रांशी कसे व्यवहार करावेत त्याचे विवरण आहे. ते पंचव्रताच्या स्वरुपात केले जाते. अध्यात्मविद्येत माणसांने त्याच्यामध्ये असलेल्या आत्म्याला कसे समजून घ्यावयाचे त्याची चर्चा केलेली आहे. कर्मकांड माणसाला त्याचे भाग्य बदलण्याची इच्छा असते त्यासाठी विविध देवतांना कसे खूष करावयाचे त्यासाठी काय करावे त्याची माहिती आहे. कर्मकांड हा एकाप्रकारे भ्रष्टाचाराचा भाग आहे. देवतांना वशिले लावून आपले भाग्य सुधारता येते अशा संकल्पनेतून हा भाग विकसित झाला आहे. कर्मकांड कितपत

माणसाचे दैव सुधारू शकते हा विवाद्य विषय आहे. मनुष्य आशावादी असतो व म्हणून तो कृत युगापासून त्या वशिलेबाजीत रमलेला आहे. कृतयुगात प्रामुख्याने यज्ञ त्यासाठी सांगितले आहेत. परंतु, कलीयुगात त्याचे स्वरुप बदलून सामान्य पुजा विधीमध्ये ते रुपांतरीत झालेले आपण पहातो. उपास तापास, व्रतवैकल्ये, शाकाहार करणे अशी आणखीन कांहीं रुपं कर्मकांडात आपण पहातो. शुद्ध हिंदू धर्मात कर्मकांडाला महत्व नसते. त्यात पहिले दोन म्हणजे नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या ह्यांच्यावर भर असतो. कर्मकांडाचे महत्व पुरोहित वर्गांने त्यांच्या स्वार्थासाठी अवास्तव प्रमाणात वाढवले आहे आणि कर्मकांडातील विधी करणे म्हणजेच हिंदू धर्म असा एक गैरसमज पसरवण्यात ते यशस्वी झालेले आहेत हे आपल्याला दिसते. त्यासाठी अनेक संघटना पुरोहीत वर्गाने यशस्वीपणे कार्यरत केल्या आहेत. समर्थ रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच त्यांच्या दासबोधात ते सगळे देऊन समाजाला सावध करण्याचा प्रयत्न केला आहे परंतु, त्याकडे हिंदू समाजाचे त्याच्या अशिक्षित रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे दुर्लक्ष झालेले आहे. प्रत्येक हिंदूंने त्याला त्याचा धर्म समजून घ्यावयाचा असेल तर शांतीपर्व चांगले लक्ष देऊन वाचावे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा

अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे व्यासांना ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं, हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो मात्र अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, त्यांच्या पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राजांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. कर्मकांडासाठी आगम शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो ते महाभारतात नाही. नितीशास्त्रात माणसाने समाजत कसे वागावे

त्याबद्दलचे मार्गदर्शन आहे. अध्यात्मविद्येत माणसाने स्वतामधील परमेश्वर कसा पहावा, कसा त्याच्याशी संपर्क करावा त्याचे शिक्षण असते तो विषय शांतीपर्वात विशेषकरून सविस्तरपणे पाहिलेला आहे. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ असला तरी भक्तीमार्गी निश्चितच नाही, तो ज्ञानमार्गी आहे. असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

# - अनुशासन पर्व भाग दुसरा सुरू -

# अनुशासन पर्व

## भाग सदोतिसावा

युधिष्ठीर भिष्माला विचारतो कीं, ब्राह्मणांच्या श्रेष्ठते बद्दल मला आणखीन ऐकावयाचे आहे ते सांगा.

भिष्म सांगतात, "त्यासंदर्भात एक प्राचीन किस्सा तुला सांगतो, त्यात शक्र आणि सम्वर ह्याचे संभाषण आहे. तो ऐक नीट लक्ष देऊन. एकदा शक्र संन्याशाच्या रुपात ज्याच्या डोक्यावर जटांचा भार आहे आणि अंगाला राख फासली आहे असा, एका विचित्र दिसणार्या गाड्यातून असुर सम्वराकडे जातो. त्याला बोलतो, "अरे तू असे काय केलेस म्हणून तू तुझ्या लोकांचा नायक झाला आहेस ते मला समजून घ्यावयाचे आहे. ते तुला श्रेष्ठ कां समजतात? मला सविस्तरपणे सांग".

सम्वर त्याला सांगतो, "मी कधी कोणाही सच्च्या ब्राह्मणाबद्दल तुच्छता बाळगली नाही. त्यांच्या सगळ्या सुचनांचे मी प्रामाणिकपणे पालन करत असतो. जेव्हां ब्राह्मण शास्त्रार्थ काढत असतात मी तो निमूटपणे ऐकत असतो. त्यांने काढलेले अंदाज मी शिरोधार्य मानून त्याप्रमाणे वागत असतो. प्रज्ञावंत ब्राह्मणांचा मी नेहमी सत्कार करतो. त्यांचा मी नेहमी सल्ला घेतो. त्यांचे पाय मी धुतो. तेसुद्धा माझी श्रद्धापूर्वक चौकशी करतात व माझे मत स्वीकारतात जेव्हां त्याना त्याची गरज असते. ते झोपलेले असतांना मी त्यांच्यासाठी जागृत रहातो. जशी मधमाशी पोळ्यातील गाळे मधाने भरून टाकते तसे ते माझ्या बुद्धीला ज्ञानाने भरून टाकतात. ब्राह्मणांच्या बद्दल माझ्या मनात कधी संशय नसतो किंवा कशीही पाप बुद्धी नसते. त्यानी सांगितलेले मी मनापासून स्वीकारतो. मी त्यांच्यापुढे कमी प्रतिचा आहे हे चांगलेच समजून त्याप्रमाणे माझे वागणे असते त्यांच्या प्रति. असे वागणे माझ्या लोकांत नसल्याने मी त्यांच्यापेक्षा जास्त पुढे असतो. शास्त्रांचा अर्थ जो ते सांगतात ते अमृतासारखे असते. त्याला मनापासून स्वीकारण्यामुळे माझे भले झाले आहे. देव आणि असुरांच्या लढ्यात माझ्या पित्याला जो सल्ला ब्राह्मण देत त्याचा फायदा माझ्या लोकांना

नेहमीच झाला आहे. ब्राह्मणांच्या बुद्धीसामर्थ्याने प्रभावित झालेले माझे पिता चंद्राला विचारत, "हे ब्राह्मण असें नेहमी तेजीत कसे रहातात"?
ते सांगत असतं कीं, ब्राह्मणांचे तेज त्यांच्या तपस्येत, व्रतस्थतेत आणि ब्रह्मचर्यात असते. ब्राह्मणांची प्रणव साधना त्यांना अध्यात्मिक बळ देत असते. ते यति होतात. त्यांच्या वाचेत शस्त्राची ताकद त्यामुळे येत असते. त्याना म्हणून शस्त्र साधना करावी लागत नाही. त्यांचा त्यांच्या मनावर पूर्ण ताबा असतो. त्यांचा वेदाचा अभ्यास उत्तम असतो. ब्राह्मण सदैव भटकत असतात जगाचे निरीक्षण करत असतात. (म्हणून तशा ब्राह्मणांच्या सोयीसाठी अतिथी शिष्टाचार सांगितले आहेत. ब्राह्मणेतर पाहूण्याला अतिथी समजले जात नव्हते.) असे सांगतात की, पर्यटन न करणारा ब्राह्मण आणि युद्ध न करणारा राजा ह्या दोघांना पृथ्वी गिळंकृत करते. गर्वामुळे अज्ञानी माणसाचे नुकसान होत असते. जसे कुमारिका गर्भवती झाली कीं भ्रष्ट समजली जाते त्या प्रमाणे पर्यटन न करणारा ब्राह्मण भ्रष्ट समजला जातो. असा कारणांसाठी मी सगळ्या ब्राह्मणांचा सन्मान करत असतो. माझ्या पित्याकडून मी ब्राह्मणांचा आदर करण्याचे शिकलो आहे".
भिष्म पुढे सांगतात, "दानवांच्या राजाचे ते ऐकून शक्र सुद्धा खर्या ब्राह्मणांचा सन्मान करू लागला. त्यामुळे तो त्यांचे इंद्रपद राखू शकत आहे".
अनुशासन पर्व भाग सदोतिसावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग अडोतिसावा

युधिष्ठीर बोलतो, "अहो पितामहा, मला सांगा ह्या तीन प्रकारातील, पूर्णपणे त्रयस्थ असलेला ब्राह्मण, शेजारात रहाणारा व ज्याला आपण चांगले ओळखतो आणि लांबून आलेला अतिथी, दानासाठी कोण जास्त योग्य समजले जातात"?

भिष्म सांगतात, ते सगळे सारखेच योग्य असतात. परंतु, कोणत्या कारणासाठी तो त्याचे दान वापरणार आहे ते महत्वाचे असते. यज्ञ करण्यासाठी, गुरूची दक्षिणा देण्यासाठी कां गृहस्थाश्रम चालवण्याठी ते पहावचाचे असते. चौथा भटकणारा त्याच्या प्रवासासाठी ते दान वापरणारा असेल तर त्याला पसंती द्यावयाची असते. दान करणारा असे दान करणार नाही ज्यामुळे त्याच्या स्वकीयांचे नुकसान होईल. कारण त्यामुळे तो दान करणारा स्वताचे नुकसान करत असतो. त्याशिवाय त्रयस्थाला प्राधान्य द्यावे असे कांहीं सांगतात. परिचित ब्राह्मणसुद्धा दानासाठी योग्य असतो. त्याला दान करण्याने दान करणारा आणि घेणारा ह्यांचे संबंध त्यामुळे जास्त घनिष्ट होत असतात. दूरून आलेल्याच्या सन्मानार्थ दान करणे हेसुद्धा कांहीं चांगले समजतात. मुख्य म्हणजे दान घेणारा ब्राह्मण त्या बदल्यात राजाच्या पापाचे क्षालन करण्यात सक्षम आहे कीं नाही ते तपासावयाचे असते. तो खरा निकस असतो दानासाठी ब्राह्मण निवडतांना.

युधिष्ठीर बोलतो, "दान करण्यामुळे कोणाचेही नुकसान होत नाही ते पहावयाचे असते. त्याच प्रमाणे ते शास्त्रात दिलेल्या संहितेला अनुसरून असले पाहिजे. कोणाची गरज जास्त आहे हा निकस सर्वात महत्वाचा असतो. दान केल्यामुळे कोणाचे नुकसान होत नाही हे पहावयाचे असते. नाहीतर दानाचा उद्देश असफल होतो".

भिष्म पुढे सांगतात, "ऋग्विज, पुरोहित, गुरू, आचार्य, शिष्य, आप्त (लग्नाने झालेला), इतर जातवाला, विद्वान आणि गुणी असें दानासाठी जास्त योग्य समजले पाहिजेत. त्यापैकी कांहीं त्यात नसेल तर तो दानासाठी अयोग्य असे समजले जाते.

अशी गुंतागुती असल्याने अखेरीस चर्चा करून त्याबद्दलचा निर्णय घ्यावा लागतो. पंचव्रताचे पालन करण्यासाठी ओळखला जाणारा त्यात वरचढ समजला पाहिजे.

त्याशिवाय नम्रपणा, त्यागी वृत्ती, इंद्रियसंयमन, समाधानीपणा असें अनेक चांगले गुण असलेल्याला केलेले दान जास्त चांगले समजले जाते. वेदांना न मानणारा, अन्याय, अमर्यादा, उद्धटपणा असे दोष असलेला दानासाठी अयोग्य असतो. त्याला केलेले दान व्यर्थ झाले असे समजावे. नितीशास्त्राचे नियम न मानणारा, ब्रह्माबद्दल तुच्छता बाळगणारा असे दानासाठी योग्य नसतात. इतर ब्राह्मणांचा अपमान करणारा, गर्विष्ठ, घाणेरडा, मूर्ख, अपशब्द वापरून बोलणारा, रोगट, शिष्टाचार न पाळणारा असे दान देण्यासाठी अयोग्य असतात. असे दोष नसलेला सत्पात्र समजावा, त्याला दान करणार्याचे भले होते. मग तो कोणीही असो.

यज्ञ करणारा त्याचे देवतांचे ऋण फेडत असतो, वेदांचा व्यासंग करणारा ऋषींचे ऋण फेडत असतो, संतति जन्माला घालून तो पितरांचे ऋष फेडत असतो आणि दान करून तो ब्राह्मणांचे ऋण फेडत असतो. अशारितीने जो गृहस्थ त्याचे गृहस्थी कार्य करत असतो त्याचे सर्वस्वी कल्याण होते. श्रद्धा नसतांना केवळ उपचार म्हणून यज्ञ करणे व्यर्थ असते, विश्वास नसतांना वेदाचा अभ्यास करणे निरर्थक असते, वासनेच्या जोरामुळे घेतलेले संभोग व त्यातून झालेली संतति पितरांचे ऋण फेडत नाहीत. तुच्छभावाने केलेले दान ब्राह्मणांचे ऋण फेडत नाही. म्हणून ते होत नाही ह्याची दक्षता गृहस्थाने बाळगावयाची असते.

अनुशासन पर्व भाग अडोतिसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकोणचाळीसावा

युधिष्ठीर विचारतो, "अहो पितामहो, मला बायकांना काय मार्गदर्शन शास्त्र करते ते समजून घ्यावयाचे आहे. असे सांगतात कीं, स्त्री सर्व पापाचे मूळ आहे. त्यांच्या तरल (चंचल) वागण्याने अनेक प्रश्न उत्पन्न होतात असा त्यांच्यावर आरोप केला जातो".

भिष्म सांगतात, "त्याबद्दल मी तुला नारद आणि अप्सरा पंचचुडा ह्यांच्यातील संवाद सांगतो त्यातून बायकांची काय भूमिका असते विविध परिस्थितीत ते तुला समजेल. नारद जगात भटकत असतांना एकदा अप्सरा पंचचुडेला भेटतात. ती फारच सुंदर होती. तिचे रहाण्याचे स्थान ब्राह्मलोकात होते. त्या नखशिखांत सुंदरीला पाहून नारद तिला बोलतात, "अहो सौंदर्यवती, मला बायकांच्या वागण्याबद्दल कांहीं शंका आहेत, त्यांबाबत तुझ्याशी मी बोलू शकतो कां"?

भिष्म पुढे सांगतात, नारदाचे ते ऐकल्यावर ती रुपगर्विता त्याला बोलते, "मी स्वतः एक स्त्री असल्याने त्या विषयावर बोलण्यात असमर्थ आहे. आपल्याला माहीत आहे बायकांची रित काय असते आणि त्या कशाप्रकारे वागतात ते. म्हणून मला हा प्रश्न कृपया आपण विचारू नये". ते ऐकून नारद म्हणतात, "तू बोलतेस त्यात तथ्य आहे. असत्य बोलण्याने दोष लागतो. परंतु, खरे सांगण्यात कसलाच दोष तुला लागणार नाही". ते ऐकून अप्सरा पंचचुडा त्यांना स्मित करत बोलते, ती त्यांच्या प्रश्नांना उत्तरं देण्यास राजी आहे. त्यानंतर ती बायकांचे चांगले आणि दोषपूर्ण गूण कोणते त्यावर बोलण्यास तयार असल्याचे मान्य करते. सुरुवाती पासून समाज पुरूषप्रधान राहिल्यामुळे बायकां एक प्रतिक्रीया म्हणून समाजाने त्यांच्यावर जी बंधन लादली आहेत ती झुगारण्याचा प्रयत्न करत असतात, त्यांचा त्या समाज व्यवस्थेला असलेला विरोध दाखवण्यासाठी. त्या म्हणून त्यांच्यावर लादलेल्या मर्यादांचे उल्लंघन करत असतात. ते एक प्रकारचे बंड असते पुरूष जातीच्या स्वामित्वा विरुद्ध असे समजा. अर्थात् त्याला पुरूष प्रधान समाज विरोध परोपरीने करत रहातो व त्यातून सगळे त्या बाबतचे प्रश्न समाजात उद्भवत असतात. त्यातून त्या नियम मोडणार्या बायकांचे नांव बदनाम करण्याचा सातत्याने प्रयत्न पुरूष

मंडळी, जी समाजाची प्रमुख असतात, करत असतात. हे एक प्रकारचे बायकांचे स्वातंत्र्यासाठीचे युद्ध आहे असें समजावे. बर्याच कमजोर महिला पुरूषांनी घातलेले जाचक नियम विनातक्रार मान्य करतात परंतु, ज्या समर्थ असतात त्या ते नियम तोडण्याचा परोपरीने प्रयत्न करत असतात. म्हणून मग तसे करणार्या बायकांना वाईट बायका ठरवण्याचा प्रयत्न समाज धुरीणी जे पुरूष असतात ते करत असतात. त्या बायकाना पापीणी ठरवण्या इतपत त्या पुरूषांची मजल जात असते. त्या तर्काप्रमाणे स्त्री सगळ्या पापाचे मूळ ठरवले गेले आहे त्या पुरूषांच्या दृष्टीने. मी सांगते अहो नारद मुनी, जर संधी मिळाली तर कमजोर बायासुद्धा समर्थ बाईप्रमाणे पुरूषांनी घातलेल्या जाचक नियमांचे उल्लंघन करत असतात. तशा परिस्थितीत कांहीं वाईट पुरूष त्याचा गैरफायदा उचलून बायकांना आणखीन बदनाम करण्याचा प्रयत्न करत असतात. वस्तुतः पापमयता हा पुरूषांचा दोष असतो पण पुरूष प्रधान समाज त्याचे दुषण बायकांवर टाकून मोकळे होत असतात आणि (निर्दोष) बाई वाईट ठरवली जात असते. त्यात सगळे पुरूष (चांगले आणि वाईट) एकमेकांना सामील असतात. त्यात कमजोर बायकांचे गप्प बसणे त्यांच्या पथ्यावर पडत असते. त्यात एक गोष्ट प्रमुख आहे ती ही कीं, बाईला सतत संरक्षणाची आवश्यकता असते पुरूष प्रधान समाजातील वाईट चालीच्या पुरूषांपासून. तशा परिस्थितीत जो पर पुरूष त्या बाईला संरक्षण देतो त्याच्याबद्दल त्या असहाय महिलेला आपुलकी वाटते. त्याचा उगाचच गैर अर्थ काढण्याचे काम ते पुरूष करून त्या स्त्रिला आणखीन बदनाम करण्याचा प्रयास करत असतात. त्यांचा अर्थ जर बाईचे आप्त पुरूष तिला संरक्षण देत असतील तर ती बाई परपुरूषाच्या मदतीची अपेक्षा कधीच करत नसते. म्हणून मी सांगते कीं, मुळतः बाई नितीमान असते कारण तिला तिच्या शरीराचा फार अभिमान असतो. जे गैरकृत्य होते ते विपरित परिस्थितीमुळे होत असते आणि अशी विपरित परिस्थिती उद्भवण्यात सुद्धा ते पुरूष कारणीभूत असतात जे नैतिकतेच्या गप्पा मारत असतात. जर स्त्रीला जे संरक्षण हवे असते ते तिच्या पुरूषाकडून मिळत असेल तर ती कधीच मर्यादा ओलांडणार नाही. म्हणजे जेव्हां एकादी बाई नैतिकतेच्या मर्यादा ओलांडते तेव्हां त्याला जबाबदार असतात ते पुरूष ज्यांच्या कडून ती संरक्षणाची अपेक्षा

करत असते. बाईचा स्वताच्या शरीराबद्दलचा अभिमान तिला गैर वर्तणूक करू देणारच नाही. पंचचुडा सांगत असते, नारदाला.

बाई कधीच सहजपणे परपुरूषाला तिच्या अंगाला हात लावू देणार नाही. कारण तिला स्वाभाविकपणे चांगला स्पर्श आणि चुकीचा स्पर्श ह्यातील फरक समजत असतो. बाई फक्त एकच पहात असते कीं ती त्या पुरूषाबरोबर सुरक्षित आहे कीं नाही. मग तो तरूण आहे कां म्हातारा आहे, गरीब आहे कां श्रीमंत आहे असे कांहीं ती पहात नसते. तिचे प्रेम असते तिच्या संरक्षणावर आणि जो ते तिला देतो तो तिला योग्य वाटू लागतो. जोवर तो तिला संरक्षण देत असतो ती त्याच्याशी प्रामाणिक रहाते. बाकीच्या गोष्टी तिला निरर्थक असतात.

जाचक बंधनात रहाणार्या कमजोर बायका इतर स्वतंत्रपणे रहाणार्या व त्या जाचक बंधनाना झुगारून जगणार्या बायकांचा द्वेष करतात कारण त्यांना ते सगळे करावयाचे असते पण त्या करू शकत नाहीत. अशा स्थितीत त्या पुरूषांची बाजू घेऊन त्या स्वतंत्र प्रवृत्तीच्या बायकांना विरोध करण्यात मदत करतात पुरूषांना केवळ त्या द्वेषामुळे. ते करतांना त्या दाखवत असतात कीं, त्या तसे करतात कारण त्या व्रतस्थ जीवन जगत आहेत. पण खरे कारण वेगळे असते. पंचचुडा नारदाला सांगत असते. स्त्रीचे आपुलकीचे वागणे बहुधा चुकीच्या रितीने पाहिले जाते. त्यामुळे त्यांच्या बद्दल मूर्ख पुरूष गैरसमज करून घेत असतो. बर्याच वेळा स्त्रीच्या आपुलकीच्या वागण्यात केवळ माणूसकी, भूतदया, चांगूलपणा हे कारण असतात, त्यात लैंगिक आकर्षण अजिबात नसते पण दुषित दृष्टी असलेला पुरूष समाज ते समजू शकत नाही आणि तिला दोष देऊ लागतो. असे जेव्हां होते तेव्हां त्या महिलेची खरोखरच मोठी दयनीय अवस्था होत असते. स्त्रीच्या पहाण्याला समजण्यात पुरूष नेहमी चूक करत असतो व त्यामुळे स्त्री–पुरूष संबंध बिघडत असलेले दिसतात. बरेच पुरूष शक्तीमान असले तरी ते बाईला आवडत नाहीत कारण त्यांच्या सामर्थ्याच्या दिमाखात ते वावरत असतात आणि ते बायकांना असुरक्षितता देत असते म्हणन बर्याच वेळा तुम्ही पहाल कीं, बाई सामर्थ्यवानापेक्षा तुलनेने कमी बलवान पण सहिष्णू असलेला पसंत करत असते. उदाहरणार्थ द्रौपदीने कर्णाला झिडकारून धनंजयाला पसंत केले होते. कारण कर्णाचा गर्विष्ठपणा तिला आवडत

नाही. त्यापेक्षा नम्र, समजूतदार पार्थ तिला जास्त योग्य वाटतो. अशी कित्येक उदाहरणं देता येतील. शक्यतर बाई समाजाने घालून दिलेल्या बंधनात रहाणे योग्य समजत असते कारण त्याला सुद्धा तेंच कारण असते कीं, त्यात ती स्वताला सुरक्षित समजत असते. तसे असले तरी प्रत्येक बाई इतर पुरूषाच्या उत्तम गुणांची चाहती असते पण त्यात ती त्यासाठी इतर सात्त्विक नाती (पिता, बंधू आणि मुलगा) त्या पुरूषाशी जोडत असते. प्रत्येक आवडीत लैंगिकता असतेच असें नसते. खरेतर बर्याच पुरूष-स्त्री संबंधात लैंगिकता नसतेच. पण भ्रष्ट पुरूष प्रधान समाज ते पाहू शकत नाही आणि आरोप प्रत्यारोप ह्यांना ती हवालदील महिला सामना करत असते. बाईच्या दृष्टीने पुरूष हा एक सुरक्षितता देणारा असला पाहिजे त्यापेक्षा इतर तिला कांहीं नको असते. पुरूषांकडे पहातांना ती तेंच प्रामुख्याने पहात असते. ज्याला बाईची ती दृष्टी समजली तो पुरूष बायकांना समजून त्याच्यावर अन्याय होऊ देत नाही पण असे समजूतदार पुरूष विरळा असतात. त्यात आणखीन कांहीं गोष्टी आहेत मुनीवर, तमोगुणी आणि रजगुणी बायकांचे आणि सात्त्विक बायकांचे पुरूषांकडे पहाणे सारखे नसते. तमोगुणी आणि रजेगुणी बायकां पुरूषांचा सूड उगवण्यासाठी त्याला त्याच्या पुरूषप्रधान समाज व्यवस्थेसाठी बळी घेत असतात. त्यासाठी त्या काय करतील ते कोणीच सांगू शकणार नाही. सात्त्विक बाई पुरूषाची परीक्षा मात्र घेत असते. तमोगुणी आणि रजोगुणी बायकां समाजावर सूड उगवण्यासाठी त्यांचे नियम तोडण्याकरता व्यभिचार करण्यास मागेपुढे पहात नाहीत. परंतु, तसे सात्त्विक बाई कधीच करत नाही. पण त्याला दोष म्हणता येईल कां"?

अहो मुनीवर, बायकांना त्यात न्याय देण्यासाठी सगळी पंचमहाभूत सज्ज असतात. स्त्री प्रकृतीचे दृष्य रुप आहे हे लक्षात घ्या. पंचचुडा नारदांना सांगत होती.

अनुशासन पर्व भाग एकोणचाळीसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग चाळीसावा

युधिष्ठीर विचारतो, "स्त्री कोणत्या संरक्षणाची अपेक्षा करत असते ते सांगा".

युधिष्ठीर पुन्हा विचारतो, "जगातील सगळे पुरूष ह्या ना त्या कारणांने स्त्रीशी जोडलेले असतात त्यामागे विधात्याने केलेले भ्रम असतात असे समजतात. त्याच प्रमाणे बायकासुद्धा पुरूषांशी जोडलेल्या असतात. त्याबद्दल माझ्या मनात कांहीं शंका येत असतात. मला सांगा, बायकांवर इतके दोषारोप श्रृती कडून होत असतांना पुरूष तरी त्यांच्याकडे खेचले कां जात असतात? सदाचारी पुरूष बायकांच्या संरक्षणार्थ नेहमी पुढे होत असतात. कित्येक वेळा बायका पुरूषांला मूर्ख करत असतात, तरी तो त्यांकडे दुर्लक्ष करत त्यांच्या मागे कां लागतो? बायकांच्या काव्यात अडकलेला पुरूष त्यातून कां बाहेर पडू शकत नाही? जसे गुरं नवीन चराई पाहिली कि त्याकडे आकर्षित होत असतात तशा बायका नवीन पुरूष दिसला कीं त्याला आकर्षित करण्यासाठी प्रयत्न करू लागतात. ज्या भ्रमसिद्धी असुरांकडे असतात, सम्वराकडे आहेत, असुर नमुची वापरतो, वली आणि कुंभिनाषी कडे आहेत त्या सगळ्यांपेक्षा जास्त प्रभावी मायावी शक्ती एका सुंदर स्त्रीकडे असते. बायकां त्यांच्या चतुराईने पुरूषाला मोठ्या खूबीने हाताळत असतात आणि त्या ते स्वाभाविकपणे करत असतात. त्याना कोणी त्या मायावी युक्त्या शिकवत नसतो. तशा बायका पुरूषाला त्याच्या बोटांवर नाचवत असतात. अशा धूर्त बायकांना पुरूष कसे नियंत्रित करू शकेल? जेव्हां पहावे तेव्हां पुरूष बायकांच्या तालावर नाचत असतांना ते पुरूष त्यांना कसे आवरू शकतील? कदाचित म्हणून बृहस्पतिने नितीशास्त्रात बायकांच्या नियंत्रणाचे नियम करून ठेवले असावेत. ते कसेही असले तरी बायका तरी सुद्धा पुरूषांचे नियंत्रण करत असतात असेच मी पहात आहे. तसे पाहिले तर बायका समाजातील एक मोठा हिस्सा असतो त्याला कसे नियंत्रित व कां म्हणून करावयाचे हा प्रश्न पुढे येतो कारण समाजातील पुरूषांत पांच प्रकारचे असतात ते असे आहेत, पिता, बंधू, पुत्र, पती, आणि भोगी. त्यातील पहिले तीन सात्त्विक प्रकारात येतात चैथा रजोगुणी व शेवटचा भोगी फक्त तमोगुणात व म्हणून पापमय जीवनाला गृहीत धरून जे श्रृती बायकांबद्दल सातत्याने सांगत

आहे त्या बद्दल मला विश्वास वाटत नाही. एक राजा म्हणून मला ह्या विषयाकडे न्यायी दृष्टीने पहावे लागत आहे. त्यातील फक्त एकाच प्रकारच्या पुरूषाचा प्रामुख्याने श्रृती विचार करत आहे असे दिसते. इतर चार प्रकारचे पुरूष नेहमी स्त्रीच्या बाजूने असतात आणि त्यातच बायकांच्या मजबूतीचा मुद्दा स्पष्ट होत असतो. त्यातसुद्धा पंचव्रताच्या नियमांत बसेल अशाप्रकारे ते नियंत्रण असावे लागते. म्हणजे माणूसकी, चांगुलपणा, भूतदया, प्रामाणिकपणा आणि कृतज्ञता ह्यांच्या मध्ये राहून बायकांना नियंत्रित करावयाचे आहे. तरच ते नियंत्रण धर्माला धरून होईल. मला सांगा आधी कधी तशाप्रकारे बायकांचे नियंत्रण कोणी करू शकला होता कां"?

अनुशासन पर्व भाग चाळीसावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग एकेचाळीसावा

भिष्म पुढे सांगतात, तू म्हणतोस ते खरे आहे. तुझ्या म्हणण्यात मोठे तथ्य आहे. त्या बाबत मी तुला एक किस्सा सांगणार आहे जो फार प्राचीन काळी घडला होता. त्यात विपुलराजाने कसे बायकांचे संरक्षण आणि नियंत्रण केले होते पंचव्रतात राहून. मी तुला आणखीन सांगतो कसे ब्रह्माने स्त्री उत्पन्न केली, आणि कोणत्या उद्देशांने त्यांने बायकांची निर्मिती केली तेसुद्धा सांगतो. असें समजतात कीं, बायकांपेक्षा जास्त पापी कोणी नसते. स्त्री अग्नी असते. तिच्यात माया असते. ती प्रकृतीचेच रुप आहे. तिच्यात सगळी वीष असतात, ती सापासारखी आहे. त्या उलट पुरूष मात्र मोठा गुणी असतो असें श्रृती सांगते. त्यामुळें पुरुष त्याचा विकास करत देवत्वाला पोहोचत असतो. ते पाहून इतर देवता काळजी करू लागतात व पुरूषाला थांबवण्यासाठी कांहीं केले पाहिजे असे समजून ते ब्रह्मदेवाकडे जातात व माणसाची प्रगति थांबवण्यासाठी कांहीं उपाय योजावेत असे सांगू लागतात. त्यासाठी अथर्वांच्या मदतीने ब्रह्मदेव स्त्री उत्पन्न करतो. त्यावेळी कृतयुगात सगळ्या बायका फार गुणी होत्या. परंतु, ब्रह्माने तिच्यात दोष उत्पन्न केले माणसाची प्रगति थांबवण्यासाठी. ब्रह्माच्या इच्छेने बायकांत भोगवृत्ती वाढली. त्यांच्या लैंगिक भोगाची वासना माणसाच्या आठपट केली त्यांने असें कीं, ती एका पुरूषांने समाधानी होणार नाही. त्यामुळें साधारण स्त्री (रजो आणि तमो गुणी) तिच्या भोग वृत्तीने सतत अग्नी सारखी पुरूषांना भाजू लागली. त्यात तिचा अजिबात दोष नसतो कारण ती तशी बनवलेली आहे. त्या वासनामय बायकांच्या इच्छा पूर्ण करण्यात पुरुष व्यस्त झाले आणि त्यांचे देवत्व कमी झाले. त्यासाठी स्त्रीसाठी कोणता एक वर्ण सांगितलेला नाही. तिला कोणता एक आश्रम सांगितला नाही. ती पुरूषाच्या सानिध्यात राहून त्याला अध्यात्मिक दृष्ट्या कमजोर ठेवणे एवढेंच तिचे काम असे योजले आहे असें श्रृती सांगते. त्यांच्यावर धर्मशास्त्राची कोणतीही जबाबदारी दिलेली नाही. तिचे स्थान जाणून बुजून दुय्यम ठेवलेले आहे. त्यांचे काम फक्त भोग घेणे एवढेंच आहे. स्त्री अप्सरेचे रुप असते. असें श्रृतीत दिले आहे. असें समजतात कीं, ब्रह्मदेव सुद्धा बायकांना नियंत्रित करू शकत नाही. त्यांना

वर्णाचे व आश्रमाचे नियम लागत नाहीत. तरी प्राचीन काळी विपुलाने त्याच्या गुरूच्या पत्नीला कसे नियंत्रित केले ते सांगतो.

फार पूर्वी एक ऋषी होऊन गेला, त्याचे नाव देवशर्मा होते. त्याच्या पत्नीचे नांव होते रूची. ती फार सुंदर होती. तिच्या सौंदर्याने सगळ गंधर्व, दानव मुग्ध झाले होते. इंद्र तिच्या सौंदर्याने फारच वेडा झाला होता. देवशर्मा त्या गोष्टीचा धोका जाणू होता कारण इंद्राला इतर ऋषींच्या बायकांचा शोक असे, हे तो जाणून होता. पुढे एकदा देवशर्माला एक यज्ञ करण्याची इच्छा झालीं, त्यासाठी त्याला दूर जावे लागणार होते म्हणून तो त्याच्या पत्नीला संरक्षण मिळावे म्हणून त्याचा शिष्य विपुल, जो भृगूवंशाचा होता, ह्याला रुचीची काळजी घेण्याची जबाबदारी देतो.

देवशर्मा त्याला बोलतो, "मी यज्ञाच्या कामासाठी दूर जात आहे, तुला माहीत आहे इंद्र ऋषींच्या बायकांच्या पाठी लागत असतो, म्हणून माझ्या अनुपस्थितीत तुझ्या गुरूमाऊलीचे तुला संरक्षण करावयाचे आहे. त्यासाठी जे करावे लागेल ते कर त्याला माझी परवानगी आहे. पुरंदरावर चांगली नजर ठेवून रहा. तो इंद्र निरनिराळी रुप घेऊन येत असतो".

भिष्म पुढे सांगतात, "गुरूची आज्ञा ऐकल्यावर विपुल जो घोर तपस्या करण्यात व्यस्त असतो, अग्नीसारखा वाटत होता. त्याचे पंचव्रताचे आचरण उत्तम होते. तो शब्दाचा पक्का होता. तो तसे करण्याचे आश्वासन देतो. ऋषी जात असतांना विपुल त्याला विचारतो, "मला सांगा मुनी, शक्र कोणत्या कोणत्या रुपात अशा कामासाठी येत असतो ते मला सांगा. त्याची शक्ती किती असते? मला ते सांगा".

भिष्म पुढे बोलतात, देवशर्मा सांगतो ती सगळी सोंग जी घेऊन इंद्र अशा कामासाठी येत असतो. तो आणखीन सांगतो कीं, इंद्र भ्रमसिद्धी वापरत  असतो. कधी तो मुकूट परिधान करत असतो, तर कधी त्याच्या हातात वज्र असते, त्याच्या कानात कर्णकुडलं असू शकतात, क्षणात तो त्याची रुप बदलत असतो. कधी तो जटाधारी असतो, कधी चिंध्यात येतो, कधी चांगल्या वस्त्रात असतो. कधी मोठा दिसतो, कधी हाडकुळा होतो. कधी गोरा तर कधी कृष्ण रंगाचा असतो. कधी कुरूप दिसतो कधी फार सुंदर होतो. कधी तरुण तर कधी प्रौढ होऊन येतो. कधी ब्राह्मणाचे सोंग घेतो. कधी क्षत्रिय होतो. कधी वैश्य होऊन

येतो. कधी तो शुद्र बनून येतो. कधी चांडाळ बनून येतो. कधी पक्षाचे तर कधी गाईचे रुप तो घेत असतो. कधी हिंस्त्र पशू बनून येतो. कधी आर्य दिसतो तर कधी दैत्याचे सोंग तो घेतो. कधी राजा बनून येतो. कधी जाडा तर कधी सडपातळ दिसतो. कधी अपंग बनून येतो, कधी रोगी बनून येतो. थोडक्यात तो कोणते रुप घेऊन येईल त्याचा नेम नसतो. तो बारीक किटक बनून त्रास देऊ शकतो. त्याच्या ह्या विलक्षण सोंगाडेगिरीमुळें त्याला ओळखणे अवघड आहे. त्याला ओळखण्यासाठी तुला तुझी दिव्य दृष्टी वापरावी लागेल. साध्या दृष्टीने त्याला ओळखणे सोपे नाही. कधी तो वारा बनून स्त्रियांना सतावतो व त्याचा आनंद घेत असतो. शक्र अशी विविध सोंग घेत असतो. अशा ह्या सोंगाड्या पासून तू आता माझ्या सहधर्मचारीणीचे संरक्षण करणार आहेस. नीच कुत्रा जसे यज्ञाचे हव्य खाऊन जातो तसा तो करू शकला नाही पाहिजे. असे बोलून तो ऋषी त्याच्या यज्ञाच्या कामासाठी निघतो. विपुल विचार करतो कीं, तो निश्चितपणे त्याच्या गुरूमातेचे संरक्षण करत असेल. पण ते कसे करणार ते त्याला समजेना. इंद्राकडे तुलनेने त्याच्यापेक्षा जास्त अध्यात्मिक उर्जा आहे. त्याची भ्रमसिद्धी मोठी आहे. आपल्या आश्रमाला कुंपण घालून ते करता येणार नाही. कदाचित वारा बनून तो गुरूमातेला त्रास देऊ शकतो. शेवटी तो समजतो कीं ह्यावर उत्तम मार्ग एकच आहे कीं, तो त्याच्या योगीक किमयेने गुरूमातेच्या शरीरात जाऊन तिचे आतून संरक्षण करेल. इतर कोणत्याही मार्गाने ते शक्य होणार नाही कारण इंद्राची ताकद फार आहे. जर मी तिचे संरक्षण करू शकलो नाही तर माझे गुरू मला शाप देतील. इतर बायकांचे संरक्षण जसे त्यांचे पुरुष करतात तसे माझ्या गुरूमातेचे मला करता येणार नाही. मी फार मोठ्या संकटात सापडलो आहे. एकच चांगला मार्ग मला दिसतो तो असा कीं, मी तिच्या शरीरीत जाऊन बसावे तिला स्पर्श न करता. जसा दंव बिंदू कमळाच्या पानावर बसतो. असे केल्याने माझ्या गुरूच्या आज्ञेचे पालन केल्यासारखे होईल. जसे संन्यासी भटकत असतांना एकाद्या रिकाम्या घरात आश्रय घेतात तसे ते असेल. त्याप्रमाणे मी माझ्या गुरूमाऊलीच्या शरीरात राहून तिचे संरक्षण करणेंच उचित वाटते अशाप्रकारे तो विचार करत असतो. त्या प्रमाणे तो एकचित्त करून त्याचा देह सुरक्षित ठेवून आत्म्याने तो रुचीच्या शरीरात शिरतो. ह्यापुढे काय होते ते सांगतो, मोठ्या तपस्येने सिद्ध झालेला विपुल रुचीशी चांगुलपणाच्या गोष्टी करू लागतो. ते करत

असतांना तो तिच्या दृष्टीतून तिच्यात शिरतो. विपुल तिच्या रोमा रोमात जाऊन बसतो. अशा प्रकारे तो तिला इंद्रापासून संरक्षण देण्याचे काम करत असतो. ऋषी त्याचा यज्ञ उरकून येण्याचा समय आला होता. त्या गुरूमातेला माहित नव्हते कीं, विपुल तिच्या अंगात बसला आहे तिला इंद्रा पासून संरक्षण देण्यासाठी.

अनुशासन पर्व भाग एकेचाळीसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग बेचाळीसावा

भिष्म पुढे सांगतीत, "एक दिवस स्वर्गाचा राजा एक स्वर्गीय सुंदर रुपात देवशर्माच्या आश्रमात येतो. त्याला वाटत असते कीं, ऋषी बाहेर गेला आहे ही चांगली संधी आहे त्याच्या बायकोला पटवण्याची. त्याचे रुप फारच देखणे होते असें कीं, कोणीही बाई त्याच्याकडे आकर्षित होईल. असा इंद्र त्या आश्रमात येतो व पहातो कीं, विपुल एका बाजूला समाधीस्थ अवस्थेत बसला आहे व त्याचे डोळे उघडे आहेत. त्याच्या बाजूला रुची देवशर्माची पत्नी बसलेली आहे. रुची फारच सुंदर होती. तिचे सर्वांग सौंदर्याने भरलेले होते. तिचे डोळे मोठे होते, तिचे नितंब गोल व भरलेले होते. उरोज घट्ट आणि मोठे होते. इंद्राला आलेले पाहून ती त्याचे स्वागत करण्यासाठी उठण्याचा प्रयत्न करते. इंद्राच्या देखणेपणाने ती लुब्ध झालेली होती. ती त्याला विचारते कीं, तो कोण आहे. ती त्याला भेटण्यासाठी उठण्याचा प्रयत्न करते पण तिच्यात बसलेला विपुल तिला खाली पाडतो, ती जमिनीवर कोसळते. ती उठू शकत नाही. इंद्र गोड आवाजात तिला सांगतो कीं, तो देवांचा राजा इंद्र आहे. तो सांगतो कीं, मदन मला खुणवत आहे कीं, मी तुझ्या बरोबर काम क्रिडा करावी. म्हणून मी आलो आहे. इंद्राचे ते बोलणे विपुल ऐकत असतो. त्याला जे घडत होते ते दिसत होते तिच्या नजरेने. रुची इंद्राचे बोलणे ऐकत होती परंतु, ती त्याचे स्वागत करण्यासाठी उठू शकत नव्हती. ती कांहीं बोलूसुद्धा शकत नव्हती. तो भृगू वंशाचा ब्राह्मण तिच्या शरीरात बसलेला समजत होता की, ऋषीची पत्नी इंद्राला विरोध करण्याच्या मनस्थितीत नव्हती. ते समजल्यावर विपुल तिचे सगळे हात पाय आखडून टाकतो. तो त्याच्या योगसिद्धीने तिचे सगळे अवयव निष्क्रीय करून टाकतो. रुचीच्या चेहर्यावर कोणतीही सोईस्कर प्रतिक्रीया इंद्राला दिसत नाही. इंद्र शरमून जातो. तो पुन्हा पुन्हा रुचीला बोलावत असतो परंतु, ती विपुलच्या योगीक किमयेमुळे त्याला प्रतिसाद देत नाही. रुची इंद्राला कांहीं बोलण्याचा प्रयत्न करत असते परंतु, विपुलच्या दबावामुळें ती कांहीं बोलू शकत नसते. तरी ती मोठ्या प्रयासांने इंद्राला विचारते कीं, तो कां आला आहे. ती ते उद्‌गारते त्यात शुद्ध संस्कृत वाणी होती जी रुचीची भाषा नव्हती.

ती प्राकृत बोलणारी होती. (त्याकाळात बायका संस्कृत बोलत नसत, त्या प्राकृत बोलत असतं. ह्याचा अर्थ, प्राकृत भाषां संस्कृत इतक्याच प्राचीन आहेत.) ती विपुलच्या प्रभावामुळे संस्कृतमध्ये ते विचारते. तिचे ते संस्कृत वाणीतील विचारणे ऐकून इंद्र अधिकच खच्ची झाला होता. त्यानंतर इंद्र त्याच्या दिव्य दृष्टीने तो काय प्रकार आहे ते समजतो. तो तिच्यात बसलेला विपुल पहातो. त्याला दिसते कीं, पिपुल मोठा तपस्वी आहे. इंद्राला त्याची भिती वाटते. ते झाल्यावर विपुल तिच्यातून बाहेर येतो व स्वताच्या शरीरात जातो. त्यानंतर तो तपस्वी त्या घाबरलेल्या इंद्राला ताकीद देतो, "अरे बेशरम्या, इंद्रा, तुझा तुझ्यावर ताबा नाही, तो शाप देतो इंद्राला, ह्यापुढे देवता आणि मनुष्य असें कोणीही तुझी पुजा करणार नाही. तो त्याला आठवण करून देतो कीं, गौतमानी त्याला अशा वागण्यामुळे शाप दिला होता. त्या शापामुळे इंद्राच्या अंगावर हजार चिन्हं उठली होती ती पुढे गौतमाने त्याच्यावर दया येऊन हजार डोळ्यात बदलले होते. एवढे झाले तरी तू सुधारत नाहीस. त्याची तुला लाजसुद्धा वाटत नाही. किती मूर्ख आहेस तू. तुझे मन अस्वच्छ आहे. तुझ्या मनात चंचलता आहे. त्यामुळे तू अशा गोष्टी करत असतोस. अरे मूर्खा लक्षात ठेव, ह्या बाईचा मी संरक्षक आहे. ह्यावेळी मी तुला शाप देऊन भस्मसात करत नाही. तुझ्या बद्दल मला किंव येते. माझे गुरू फार मोठे तपस्वी आहेत. ते असते तर त्यांच्या अग्नी सारख्या डोळ्यांमुळे तू भस्मभूत झाला असतात. तू पुन्हा अशा गोष्टी करणार नाहीस असे मी समजतो. नाहीतर तू तुझ्या सगळ्या परिवारासह भस्म होशिल. तू समजतोस कीं तू अमर आहेस, म्हणून तू कांहींही करू शकतोस. ब्राह्मणांना तू कमजोर समजू नकोस. ब्राह्मणांना सगळे शक्य असते अगदी तुझा नाश करणेसुद्धा त्यांना अवघड नाही. भिष्म पुढे सांगतात, त्याचे ते निर्वाणीचे बोलणे ऐकून कांहीं न बोलता तेथून निघून जातो. त्याच्या जाण्याच्या नंतर थोड्याच वेळात देवशर्मा त्यांचा यज्ञ उरकून आश्रमात परत येतात. ऋषी ते समजतात व मोठ्या प्रेमांनी ते विपुलला एक वर देतात. त्याप्रमाणे विपुल पंचव्रत सहजपणे आचरू शकेल. परंतु, त्याने गुरूला सांगितले नाही त्याने कसे इंद्रापासून रुचीला संरक्षण दिले. विपुल पुढे मोठा तपस्वी होतो. इंद्र पुन्हा कधी देवशर्माच्या पत्नीचा मोह धरत नाही.

अनुशासन पर्व भाग बेचाळीसवा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग त्रेचाळीसावा

भिष्म पुढे सांगतात, "आपल्या गुरूकडील अभ्यास पूर्ण झाल्यावर विपुल मोठी तपस्या करण्यास सुरूवात करतो. त्याप्रमाणे त्याच्याकडे पुरेशी अध्यात्मिक शक्ती प्राप्त झाली होती. त्याने केल्या कामगिरीबद्दल त्याला अभिमान वाटत होता. तो पृथ्वीवर मोठ्या धैर्याने पर्यटन करत होता. सगळे त्याच्या कर्तृत्वाची वहावा करत होते. तो भार्गव, समजत असतो कीं त्याने जग आणि अध्यात्म साधना जिंकले आहेत. पुढे अशी वेळ येते जेव्हां रुचीच्या बहिणीच्या निमित्ताने मोठी दानं करण्याचे प्रयोजन येते. त्यात धन आणि धान्य ह्यांचे दान होणार असते. त्याच सुमारास एक अप्रतिम लावण्य असलेली एक स्वर्गीय सुंदरी आकाशातून फेरफटका मारण्यासाठी निघते. ती आकाशातून जात असतांना तिच्या अंगावरील कांहीं फुलं पृथ्वीवर खाली पडतात. ती फुलं रुचीच्या पतिच्या जवळ पडतात. ती सांडलेली फुलं रुची वेचते. त्यानंतर लवकरच अंगच्या देशातून रुचीला आमंत्रण येते. रुचीची बहिण जिचे नांव होते प्रभावती, चित्ररथाची पत्नी होती. जो अंगदेशाचा राजा होता. रुची ती स्वर्गीय फुलं केसांत माळून त्या राजाच्या वाड्यात जाते. कारण तिलासुद्धा आमंत्रण होते. तिच्या केसातील फुलं पाहून प्रभावती तिच्या कडे ती फुलं मागते. रुची ती माहिती तिच्या नवर्याला सांगते. तो ऋषी त्याच्या मेहूणीची, प्रभावतीची विनंति मान्य करतो. तो तिला सांगतो कीं, आणखीन तशी फुलं घेऊन येतो. देवशर्मा त्यानंतर विपुलला ते करण्याचे आवाहन करतात. त्याला तशी फुलं आणण्याची आज्ञा करतो. आपल्या गुरूची आज्ञा प्रमाण मानून विपुल तशी फुल कोठे मिळतात ते शोधण्यास निघतो. तो त्या जागी जातो जेथे ती फुलं सांडलेली होती. त्या जागी तो पहातो कीं, आणखीन कांहीं फुलं तेथे होती. ती फुल नुकती झाडावरून काढली असावीत अशी ताजी होती. तो ती सुगंधी फुलं गोळा करतो. त्यानंतर तो मोठ्या आनंदाने ती फुलं घेऊन त्या चंपा नगरीकडे निघतो जेथे ती त्याला द्यावयाची असतात. वाटेत तो एक मनुष्याचे युगुल हातात हात घेऊन जात असलेले पहातो. त्यातील एक जोराने जाऊ लागतो व त्यामुळे त्यांच्यात तंटा सुरू होतो. एक दुसर्याला दोष देतो कीं तो जास्त वेगांने जात आहे. दुसरा बोलतो कीं तो जास्त वेगांने

जात नव्हता. प्रत्येक त्याचेच म्हणणे बरोबर असा आग्रह धरून वाद करत होते. असा त्यांचा वाद होत असतांना ते विपुलचा उल्लेख करतात. ते अशी शपथ घेतात कीं, त्यांच्यातील जो खोटे बोलत असेल त्याला विपुलसारखा अंत प्राप्त होईल. ते विपुल ऐकतो व खिन्न होतो. विपुल विचार करू लागतो कीं, त्याने घोर तप केले आहे, ह्या दोघांतील तंटा अटीतटीचा आहे, ते पाहून मला दुःख होत आहे, कारण ते बोलत आहेत कीं, मला एक वेदनामय अंत भोगावा लागणार आहे. त्याला फार त्रास होतो तो खाली मान घालून बसतो. तो मनातल्या मनात शोध घेऊ लागतो कीं, त्यांने असे कोणते पाप केले असावे किं, त्याला हालाखीचा अंत प्राप्त होणार आहे. तशारितीने विचार करत तो पुढे जात असतांना त्याला सहा माणसे द्युत खेळत असतांना दिसतात. त्यांचे फांसे सोन्याचांदीचे होते. विपुल पहातो कीं ते खेळत असतांना इतके उत्तेजित होत होते कीं, त्यांचे डोक्याचे केस ताठ उभे होत होते. त्यांच्यात सुद्धा वाद होतो खेळावरून, तेव्हां त्यातील एक म्हणतो, जे आधीचे दोघे बोलून गेले होते. त्यात पुन्हा विपुलच्या दुःखद अंताचा उल्लेख होता. ते ऐकून पुन्हा तो त्याने कोणते पाप केले असावे त्याचा शोध घेण्याचा प्रयास करतो परंतु, त्याच्या कांहीं लक्षात येत नाही. विपुल चिंतेने जळू लगतो. असा बराच वेळ जातो. बराच विचार केल्यानंतर त्याच्या लक्षात येते कीं, त्याच्या गुरूपत्नीला इंद्रापासून संरक्षण देण्याच्या वेळी तो तिच्या अंगात शिरला होता ते कदचित पापमय नाहींना ठरणार? त्याला आठवते कीं, त्याने कशाप्रकारे रुचीला संरक्षण दिले होते म्हणजे तिच्या शरीरात घुसून तो बसला होता. त्याने ते त्याच्या गुरूला सांगितले नव्हते. कदाचित ते न सांगण्याची त्याची चूक झाली होती कां? त्याला लक्षात येते कीं ते घोर पाप त्याच्या कडून झाले होते अनवधानाने. अशारितीने विचार करत तो चंपा नगरीत येतो. तो फुलं देतो. त्यानंतर तो त्याच्या ज्येष्ठांची पुजा करतो.

अनुशासन पर्व भाग त्रेचाळीसवा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग चव्वेचाळीसावा

भिष्म पुढे सांगतात, आपला शिष्य फुलं घेऊन आलेला पाहून ऋषी देवशर्मा बोलतात, अरे मुलां, तू वाटेत काय पाहिलेस ते सांग. तू माझ्या पत्नीला संरक्षण देण्यासाठी काय केले ते आम्ही दोघे जाणतो.

विपुल विचारतो, "अहो गुरूजी, ते कोण होते ज्यांना मी प्रथम पाहिले आणि नंतर कोण होते जे माझ्या मृत्यूबद्दल बोलत होते? ते सगळे माझा उल्लेख करून बोलत होते, मला ऐकू यावे अशा मोठ्या आवाजात ते बोलत होते"?

देवशर्मा सांगतात, पहिले जोडपे तू पाहिलेस ते दिवस आणि रात्र होते. ते एकमेकांचे हात धरून फेरे मारत असतात. आणि दुसरे सहा जे तुला दिसले ते सहा ऋतू होते. तेसुद्धा तू कोणती चूक केली ते जाणत होते. गुपचुपपणे चूक केली कीं, ती कोण पहात नाही असें जे समजतात ते जास्त मोठ्या दोषात अडकत असतात, तू जे पाप केलेस त्याची सजा तुला होणार आहे. तू कशाप्रकारे माझ्या पत्नीचे संरक्षण केलेस ते मला कां नाही सांगितलेस? जर सांगितले असतेस तर तुला पाप लागले नसते. केलेले पाप अथवा पुण्य कांहींही लपून रहात नाही. ते अखेरीस उघड होत असते. कोणाला तू कसे माझ्या पत्नीला इंद्रापासून वाचवलेस ते माहीत नाही ह्या कल्पनेत तू खुषीत होतास. जर ते मला सांगितले असतेस तर तुला पाप लागले नसते. तू मोठा तपस्वी आहेस म्हणून त्यांनी तुला त्याची जाणीव करून दिली. अशारितीने केल्या कर्माला लपवण्याच्या चुकीमुळे तुला पाप लागत आहे. कर्मापेक्षा ते लपवणे जास्त मोठे गैर असते. तरी तू जे केलेस माझ्या पत्नीच्या संरक्षणासाठी ते कृत्य पाप नव्हते. म्हणून मी तुला लपवण्याच्या चुकीच्या कृत्याने जे पाप लागले त्यापासून मुक्त करत आहे. मी तू जे माझ्यासाठी केलेस त्याबद्दल संतुष्ट आहे. जर तुझा उद्देश पापकारक असता तर मला ते समजले असते व त्या परिस्थितीत मी तुला शाप दिला असता. परंतु, तुझा उद्देश पवित्र होता म्हणून जे केलेस ते क्षम्य होते. पाप कृतीने होत नाही, ते उद्देशात असते. तू माझ्या पत्नीत एकरुप झाला होतास पण त्यात तुझा उद्देश पवित्र होता. तुझ्या तिच्यात एकरुप होण्याचे सुख तू माझ्या पत्नीला देत

होतास परंतु, तू मात्र त्या सुखात गुंतलेला नव्हतास त्यात तुझे निष्पापपण होते म्हणून तू निर्दोष ठरतोस. तरी जर तू मला तुझ्या तोंडाने ते सांगितले असतेस तर बरे झाले असते. आता तू त्या दोषातून मुक्त आहेस. मला ते समजले आहे जणूकाय तू मला सांगितले आहेस. म्हणून सगळा मामला संपलेला आहे. कांहीं काळजी करू नकोस. एका चांगल्या शिष्याचे काम तू केले आहेस. तू माझ्या पत्नीच्या शरीरात घुसला होतास जसा तू तुझ्या मातेच्या उदरात होतास जे मोठे पुण्यमय समजले जाते. असे बोलल्यानंतर देवशर्मा त्याची पत्नी आणि विपुल असे तिघे स्वर्गात जातात. तेथे सुखात रहातात.

हे मार्कंडेय ऋषी मला सांगत होते जेव्हां आम्ही गर्गा नदीच्या तटावर बसलो होते. अरे युधिष्ठीरा, बायकांना संरक्षण आवश्यक असते कारण त्यांना ब्रह्मांने शरीरांने कमजोर केले आहे. म्हणून कोणत्याही बाईला न मांगता संरक्षण देणे हे पंचव्रतात येते माणूसकीच्या अंतर्गत. बायकांचे पुरूषांबद्दलचे चांगले वागणे नेहमीच लैंगिक दृष्टीने नसते. त्यात मातृत्व प्रेम, भगिनी प्रेम अथवा कन्याप्रेम अशी कितीतरी असू शकतात. परंतु, पापमय पुरूषाला ते न समजल्याने बायकांबद्दल पुरूषांचे वागणे सदोष ठरते. त्याचा महिलांना फार त्रास होत असतो. बाई साधारणपणे शुद्ध मनाचीच असते. त्या त्यांच्या संरक्षणासाठी पुरूषांकडे पहात असतात. त्याचा गैर अर्थ घेणे तमोगुणाचे लक्षण असते. म्हणून ब्रह्मचर्य व्रतात राहून पुरूषांनी बायकांशी वागले पाहिजे. जो पुरूष त्यांना हवे तसे संरक्षण देऊ शकत नाहीत तशा पुरूषांचा बाई त्याग करते. त्यात लैंगिकता पहाणे चुकीचे असते. म्हणून पुरूषांनी त्रयस्थ वृत्तीने बायकांशी व्यवहार करावयाचे असतात. विपुलाने त्याच्या गुरूमातेचे संरक्षण ज्या विरक्त बुद्धीने केले ते आदर्श होते. असें भिष्म सांगतात.

अनुशासन पर्व भाग चव्वेचाळीसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग पंचेचाळीसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "मला सांगा आजोबा, नाते संबंधातील मुख्य तत्त्व कोणते? त्यांमुळे जात जमात आणि पाहुणे रावणे असे संबंध जपले जातात". त्या मागील कर्तव्ये कोणती असतात ज्याच्या अनुचरणामुळें समाज बांधला जातो. त्यात लग्न हा विधी मोठी कामगिरी निभावत असतो. मुलगी कोणास, कां, कशी लग्नात द्यावी म्हणजे समाजबंधनें कार्यरत असतील". त्याबद्दल सांगा.

भिष्म सांगतात, मुलगी लग्नात देण्या आधी उपवर मुलाची चांगली चौकशी करावयाची असते. त्याचे कुळ, घराणे, नातेसंबंध आणि ते सगळे योग्य आहे असें निश्चित झाले कीं, बोलणी करावयाची असतात. सगळे घरंदाज ब्राह्मण अशाप्रकारे चौकशी करून नंतर मुलगी देतात. त्यासाठी मुलाची गुणवत्ता, त्याचे उत्पन्न असें सगळे मुलीचा बाप पहातो कारण, त्यात त्याच्या मुलीचा सुखाचा प्रश्न असतो. अशा लग्नाला ब्राह्मण लग्न असे म्हणतात. नवरदेवाला खुष करण्यासाठी मुलीचा बाप त्याला भेटी देत असतो. त्याच्या मोहाने तो मुलगा लग्नासाठी तयार होतो. अशा लग्नाला क्षत्रिय लग्न असें म्हणतात. मुलीच्या पित्याच्या इच्छेचा विचार न करता जेव्हां मुलगी स्वताच्या पसंतीचा मुलगा पाहून लग्न करते त्या लग्नाला गंधर्व विवाह असें म्हणतात. त्याला गंधर्व विवाह म्हणतात कारण त्यात ती मुलगी त्या मुलाबरोबर पळून जात आसते. विवाह म्हणजे पळून जाणे. असे वेदात सांगितले आहे. असे विवाह बहुधा असुरात (पैशाची) आणि जबरदस्तीने पळवून तिच्या नातेवाईकांची कत्तल करून जो विवाह होतो त्याला राक्षस विवाह असें म्हणतात. असे ब्राह्मण, क्षत्रिय, गंधर्व, असुर आणि राक्षस पांच प्रकारचे विवाह आहेत त्यातील पहिले तीन चांगुलपणात (पंचव्रतात) येतात, आणि नंतरचे दोन भ्रष्ट प्रकारात येतात. ब्राह्मण तीन लग्न करू शकतो. क्षत्रिय आणि वैश्य दोन करू शकतात. वैश्याने फक्त त्याच्या जातीची मुलगी करावयाची असते. त्या बायकांपासून झालेली सगळी अपत्ये समान हक्काची असतात. ब्राह्मणांच्या तीन बायकांतील जी त्याच्या जातीची असेल ती पहिली समजावी. तोंच नियम क्षत्रिय आणि वैश्याना लागतो. कांहीं मानतात कीं पहिली पत्नी शास्त्रार्थाने खरी पत्नी समजावी

आणि नंतरच्या बायका भोगीनी समजाव्यात. त्यांच्यावर धर्माच्या विधींची जबाबदारी नसेल. जर खालच्या वर्णाच्या बायका केल्या असतील तर त्यांच्यावर  कोणतीही धार्मिक जबाबदारी नसेल. जर ब्राह्मणाला शुद्र बाईपासून संतति झाली तर त्याला प्रायश्चित्त करावे लागते. तीस वयाचा पुरूष दहा वर्षाच्या मुलीशी लग्न करू शकतो. त्या मुलीला नग्निका म्हणतात. एकविस वर्षाचा सात वर्षाच्या मुलीशी लग्न करू शकतो. ज्या मुलीला बाप अथवा भाऊ नाही ती लग्न करणार नाही कारण ती पुत्रिका समजली जाते. ती तिच्या बापाची वारस समजली जाते. वयात आलेली मुलगी तीन वर्षे वाट पाहून नंतर स्वताचा पति स्वतः पाहू शकते. अशी स्वताचे लग्न स्वतः ठरवणारी व तिची संतति वैध समजली जाते व त्यांचे समाजातील हक्क कमी होत नाहीत. अशा मुलीशी लग्न करण्यात दोष समजला जात नाही. परंतु, लग्न न करता पुरूषाबरोबर ती रहात असेल तर तिला प्रजापतीला जाब द्यावा लागतो. जो सपिंड नाही अथवा तिच्याच गोत्राचा नाही असा पुरूष तिच्याशी लग्न करेल तर ते योग्य समजले जाईल. असे मनू सांगतो.

युधिष्ठीर पुढे विचारतो. लग्नाच्या उद्देशाने कोणी हुंडा देऊन लग्न करतो, कोणी मुलीच्या नातेवाईकांना पैसे देऊन मुलगी मिळवतो, कोणी मुलगी पळवून नेतो. कोणी रितसर लग्नविधी करून लग्न करतो अशांपैकी कोणते लग्न खरे समजावयाचे.

भिष्म सांगतात, समाजातील शहाण्यांच्या सल्ल्याने त्या बद्दलचे निर्णय घ्यावयाचे असतात. सगळ्यांच्या भल्याचा विचार करून ते निर्णय घ्यावयाचे असतात. त्यावेळी कोणी खोटे बोलणे पाप समजले जाते. त्यात गुंतलेली स्त्री, तिचे अपत्य, त्या व्यवहारात गुतलेले पुरोहित, ऋग्विज, गुरू असें सगळे त्यात जबाबदार समजून त्याप्रमाणे निकाल दिले जातात. परंतु, जर मुलगी तिच्या मर्जीने इतर मुलाशी लग्न करते तर कोणीही जबाबदार नसेल आणि कोणालाही प्रायश्चित्त करावे लागणार नाही.

मनुच्या मते कोठल्याही परिस्थितीत मुलीच्या इच्छेविरूद्ध तिचा विवाह करता येणार नाही. अशारितीने मनाविरुद्ध लग्न लावणे शस्त्राला मान्य नसते. असुर विवाह करणार्याला तिचे नातेवाईक हुंडा घेऊन लग्न लावतात तर तो वैध समजला पाहिजे. त्यात पाप नाही. दोनही बाजूच्यांच्या परवानगीने मंत्राक्षदा, होम असें करून देवतांच्या, अग्नीच्या समक्ष झालेले वैध असतात. परवानगी न घेता फक्त मंत्राक्षदा करून केलेले अवैध समजावे. जेव्हां

पती समजून ते नाते स्वीकारतो कीं त्यांचे नाते गतजन्माच्या कारणाने होत आहे तर तो व त्याची पत्नी ते लग्न देवाच्या कृपेने यशस्वी करण्यास बांधलेले होतात. अशा नात्याला समाज मान्यता देतो.

युधिष्ठीर पुढे विचारतो, "समजा हुंडा घेतला आहे आणि त्यानंतर दुसरा अधिक चांगला मुलगा मुलीचा बाप पहातो तर त्या परिस्थितीत काय करावयाचे? असें करणे चांगले दिसत नाही. मी विचारतो, तुमचे मत काय आहे"?

भिष्म सांगतात, हुंडा घेतला म्हणून तो व्यवहार झालाच पाहिजे असें समजता येणार नाही. त्यात मुलीच्या भल्याचे सर्वात जास्त महत्व असले पाहिजे. घेतलेला हुंडा परत करता येतो. तो परत करून तो विषय संपवायचा असतो. चांगल्या मुलीच्या हितासाठी असे होत असते, त्यात कोणी दोषी समजता येणार नाही. ऋषी सांगतात कीं, जो पुरूष लायक सिद्ध होत नाही त्याने केवळ पैसे दिले म्हणून ते लग्न करू शकत नाही. वंशाच्या विस्तारासाठी मुलगी आवश्यक असते. तिच्या सुखाचा प्रथम विचार करावयाचा असतो समाजाला. उदाहरणार्थ, मी सगळ्या मगधी, काशी आणि कोसलच्या राजपुत्रांना बाद करून त्या तीन राजकन्यांना जबरदस्तीने विचित्रवीर्यासाठी आणले होते. त्यातील दोघी विचित्रवीर्याबरोबर रहातात परंतु, मोठी सांगते कीं, तिने दुसरा वरला आहे म्हणून आम्ही तिला तिच्या घरी परत पाठवले होते. कारण माझे काका वल्हिक म्हणाले कीं, तिच्या इच्छे विरुद्ध तिचे लग्न लावता येणार नाही. मी माझ्या काकांचे विचार न पटल्याने इतरांचा सल्ला घेतला होता. तेथे त्यांच्या बरोबर नैतिकतेच्या यथायोग्यतेची चर्चा केली होती. असे करणे सदाचारी लोकांसाठी बंधनकरक असते. अनेक वेळा मी ते माझ्या काकांना सांगितले तेव्हां ते म्हणतात, तसे करणे प्रस्थापित रुढीत बसत नाही. पति आणि पत्नी हे नाते पैशाने ठरवणे योग्य नसते जर त्यात मुलीची इच्छा नसेल. शास्त्रात असे कोठेही सांगितलेले नाही कीं मुलीच्या इच्छेची आवश्यकता नाही लग्न ठरवतांना. जर मुलीची इच्छा असेल तर ते नाते समाजाने मान्य करावयाचे असते आणि जर नसेल तर त्या मुलीला कोणी जबरदस्ती करून ते लग्न करून घेऊ शकत नाही. त्याच प्रमाणे मुलाच्या पसंतीचीसुद्धा दखल घ्यावयाची असते. लग्न हा धंदा  समजू नये असे शहाणे सांगतात. तो एक अध्यात्मिक व्यवहार असला पाहिजे. असे करणे पाप करण्यासारखे आहे. लग्न करणे

आणि गुलाम खरेदी करणे हे एकच नाहीत. त्यावेळी सत्यवतीला मी प्रश्न विचारला होता, जर हुंडा देणारा पुरूष लग्न होण्या आधी मेला तर ती मुलगी दुसर्याशी लग्न करू शकते कां"? ती म्हणाली, त्या मुलीच्या लग्नाची जबाबदारी त्या मृत मुलाच्या घरच्या लोकांची असेल व ते तिचे लग्न त्या मुलीच्या पसंतीच्या इतर मुलाशी लावण्यास बांधलेले असतात किंवा ते ती जबाबदारी त्या मुलीच्या पित्यावर सोडून देऊ शकतात. किंवा तिचे लग्न त्या मृत मुलाच्या धाकट्या किंवा ज्येष्ठ भावांशी लावता येईल. जर त्या मुलीला ते नाते मान्य नसेल तर ती मोकळी समजावी किंवा ती संन्यास घेण्यास योग्य समजावी किंवा, ती जबाबदारी त्या मुलीच्या पित्याची असेल. दिलेली हुंड्याची रक्कम तो पिता परत करेल. तसे केल नाही तर त्याला पाप लागते. हे नियम सातव्या फेर्या पर्यंत लागू असतात. कारण जोवर सात फेरे आणि कन्यादन झालेले नाही तोवर ते लग्न झाले असे समजले जात नाही. उच्च कुळीन ब्राह्मण राजी मुलीशीच लग्न करू शकतो. ती कुमारिका असली पाहिजे. त्यांचे लग्न विधीपूर्वक देवा ब्राह्मणां समोर अग्नीच्या व समाजाच्या साक्षीने व्हावे लागते. तो नियम उच्च कुलीन क्षत्रियांना सुद्धा लागू असतो. असे रीतसर झालेले लग्न त्या कुळाची देवता मान्य करते.

अनुशासन पर्व भाग पंचेचाळीसावा संपला.

## अनुशासन पर्व
## भाग सेहेचाळीसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "समजा नवरा मुलगा हुंडा देऊन कोठे तरी निघून गेला तर तिचे आप्त काय करतील अशी राजाची अपेक्षा असते"?

भिष्म सांगतात, "असा मुलीचा बाप जर संपन्न असेल तर तो त्याच्या कन्येची काळजी घेत रहातो त्या मुलाच्या परतीची वाट पहात. किंवा तो पिता ती हुंड्याची रक्कम नवर्याच्या लोकांना परत करून टाकेल. जर ती त्याच्या पासून पोटाशी झाली असे तर ती त्या मुलांना जन्माला घालेल. परंतु, त्या दरम्यान कोणीही त्या मुलीशी लग्न करणार नाही. उदाहरणार्थ, राजकन्या सावित्री तिच्या पित्याच्या आदेशानुसार दुसर्या मुलाशी लग्न करते. परंतु, धर्मशास्त्राचे जाणकार हे अयोग्य असें सांगतात. चांगला मनुष्य तिच्या भल्याचे काय ते पाहून अशा परिस्थितीत निर्णय घेईल. ह्यावर सुकृत, जनक राजाचा नातू सांगतो कीं, बायकांना एकटे ठेवणे त्यांच्या भल्याचे नसते, त्यांना सतत कोणाचा तरी आधार असणे हा त्यांचा नैतिक हक्क असतो व त्याची जबाबदारी त्यांच्या संम्मतीने तिच्या आप्तानी करावयाची असते. त्या शिवाय स्त्रिला शरीर सुख आवश्यक समजले आहे ते पुरूषाला आवश्यक समजले जात नाही. म्हणून जसे पुरूषाला ब्रह्मचर्य अभिप्रेत असते तसे बाईला नसते. योग्य समयी तिला शरीर सुख मिळण्याची व्यवस्था असावी लागते. जिचे लग्न झाले ती सोय तिच्या पुरूषाकडून होण्याची अपेक्षा असते ते पंचव्रतात येते, त्यात कांहीं दोष समजला जात नाही. त्यादृष्टीने पहाता असुरांच्या बायकांबाबतच्या व्यवस्था आर्यांपेक्षा जास्त योग्य असतात. त्याच प्रमाणे माता होण्याचा बाईचा हक्क हि एक बाब आहे जी पुरूषांपेक्षा वेगळी असते त्याचीसुद्धा व्यवस्था असुरात बाईच्या सोयीची असते म्हणजे त्यांच्यामध्ये कुमारी माता अवैध मानत नाहीत. तिची संततिसुद्धा वैध असते. तसे आर्यांत धरत नाहीत. अशा दोन बाबतीत आर्यांचे नैतिकतेचे नियम बायकांसाठी जाचक ठरतात. असुरांत अशी कुमारीमाता समाजात सन्मानाने वावरू शकते ते आपल्या बायकांना शक्य

होत नाही. सुकृत त्याचे स्पष्ट विधान करत होता व त्यातून तो श्रृतीच्या अपूर्णतेबाबत त्याची नाराजी दाखवत होता.

युधिष्ठीर पुढे विचारतात, "मालमत्तेच्या मालकीबाबत मुलीचे अधिकार कसे ठरवले जातात? मुलीला मुलाप्रमाणे कोणत्या परिस्थितीत समजले जाते"?

भिष्म सांगतात, मुलगी आणि मुलगा असा भेद संपत्तीच्या बाबत केला जात नाही. दोघांचे हक्क समान असतात. आईचे धन मुलीला मिळते त्यात मुलाचा अधिकार नसतो. बापाच्या संपत्तीत मात्र मुलगा आणि मुलगी दोघे हक्कदार असतात. जर आईचा पिता निपुत्रिक मेला तर त्याची संपत्ती त्याच्या मुलीच्या अपत्यांना मिळते जर तो पिंडदान करत असेल. तशा परिस्थितीत मुलाचा मुलगा आणि मुलीचा मुलगा ह्यांच्यामध्ये फरक केला जात नाही. त्यांचे अधिकार व जबाबदार्या समान असतात. एकच मुलगी असलेला पिता त्याची संपत्ती त्याच्य कन्येला देतो पण जर त्याला नंतर मुलगा झाला तर मात्र त्या संपत्तीची समान विभागणी होत असते. त्यात वादाचा मुद्दा असा असतो कीं, मुलगी लग्न होऊन जातांना पित्याच्या संपत्तीचा कांहीं भाग कन्याधनाच्या रुपाने नेत असते त्याशिवाय. तिला आणखीन सम भाग दिल्याने मुलावर अन्याय होत असतो. म्हणून कांहीं जाणकारांच्या मते तिला त्यामध्ये कमी हिस्सा मिळाला पाहिजे व मुलाचा हिस्सा मोठा असला पाहिजे. त्यात जर मुलगा बापाच्या मालमत्तेत त्याच्या मेहनतीने भर करत असेल तर त्याचा हिस्सा त्या प्रमाणात मोठा असला पाहिजे. त्यात जर मुलगा त्याच्या रक्ताचा नसेल व दत्तक असेल तर त्याचा हिस्सा बापाच्या इच्छापत्रानुसार ठरवला जाईल. मुलीचा विवाह असुर पद्धतीने झाला असेल तर तीचा पित्याच्या मालमत्तेवर कसलाच हक्क लागणार नाही. त्याबाबत अतिप्राचीन काळी यमाने गाईलेले कांहीं सुचक आहे ते सांगतो, जो मनुष्य आपला मुलगा विकून पैसे कमावतो, जो मुलीसाठी हुंडा घेतो तो नरकात खितपत पडतो. तेथे तो सुक्ष्म जीव बनून हगामुतात अनेक वर्षे रहातो. कांहीं समाजात मुलीचा बाप मुलाकडून गाय आणि बैल भेट घेतो मुलीच्या बदल्यात. त्याला हुंडा समजावयाचे कां कांहीं इतर त्याबाबत मतैक्य नाही. तरी राजाने त्याला हुंडा समजून त्याचा विचार केला पाहिजे. कांही म्हणतात कीं, तो व्यापार झाला त्या बाबत मतभेद आहेत. तसे समजले तर तो कन्या विकतो असें समजले जाते. राक्षस विवाह सरासर पाप

ह्या प्रकारात येत असल्याने त्याबाबत कोणतेही मत राजाला असण्याचे कारण नसते. अशारितीने बळजबरी करणे ह्या गुन्ह्यात तो विवाह समजला जातो परंतु, जर मुलीच्या बाजूच्या कोणीही कांहीं तक्रार केली नाही तर ती बाब गुन्हासुद्धा ठरत नाही. आर्यांच्या दृष्टाने राक्षस विवाह हे नरकात जाण्याचे काम ठरते. मुलीची विक्री करणे लग्नाच्या सबबीखातर हे सुद्धा पाप आहे.

अनुशासन पर्व भाग सेहेचाळीसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग सत्तेचाळीसावा

भिष्म पुढे बोलतात, "ज्याना प्राचीन इतिहास माहीत आहे ते प्रचेताचा मुलगा दक्ष ह्यानी गाईलेली कवनं आठवतात. त्यात तो सांगतो कीं, ज्या मुलीच्या देण्यात नवर्याच्या लोकांनी कांहीं धन घेतलेले नाही ते लग्न धंदा समजता येणार नाही. ते खरे पुण्यवंताचे लग्न समजले पाहिजे. परंतु, मुलीचा बाप त्याच्या मुलीच्या अंगावर जे धन (दागिने इत्यादि) चढवतो ते तीचे स्त्रीधन असते व त्यावर इतर कोणाचा (नवर्याचासुद्धा) हक्क नसतो. अशा लग्नानंतर त्या मुलीला त्या (नवर्याच्या) घरात मानसन्मान मिळाला पाहिजे. अशा लग्नात खरे सुख असते. जे लग्नाचा धंदाकरून मिळत नाही. जर बायको पतिवर नाराज असेल तर ती त्याचा वंश वाढवत नाही आणि तो पुरूष नरकात जातो. त्यासाठी पुरूषाने नेहमी स्त्रियांशी अदबीने वागले पाहिजे. ज्या घरात बायकांना योग्य सन्मान दिला जातो त्या घरावर लक्ष्मीची छाया असते व तेथे सुख नांदते. ज्या घरात बायकाना सन्मान नसतो ते घर म्हणजे नरक असते. बाईचा मौनी शाप त्या घराचा नाश करतो. बाईच्या शापात अडकलेला पुरूष आणि त्याचे घर नष्ट होते. असे शाप त्या पुरूषाचा त्याचे सात जन्म पाठलाग करत असतात. म्हणून बाईचा शाप पुरूषाने कधीही घेऊ नये. सन्मान नाही तरी निदान तिचा अपमान करू नये. बाई सौख्याचे स्थान असते कारण, तिच्यात उमा असते असें तो सांगतो.

जनकाची कन्या बोलते, "बायकांसाठी यज्ञ सांगितलेले नाहीत. त्यांना श्राद्ध करावे लागत नाही. त्याना कोणताही धार्मिक विधी दिलेला नाही. त्यांचे काम फक्त त्यांच्या पुरूषाची सेवा करणे. तेवढेच काम आणि कर्तव्य दिले आहे. तेवढे करून त्या स्वर्ग गाठू शकतात. आर्यांच्या बायका नेहमी पुरूषाच्या गुलाम असतात. तरी समृद्धी देवता एक स्त्री दाखवली आहे. म्हणून ज्यांना समृद्धी व्हावी असें वाटते त्यांनी त्याच्या घरातील लक्ष्मीचा मान ठेवावयाचा असतो".

अनुशासन पर्व भाग सत्तेचाळीसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग अठ्ठेचाळीसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "आपण आपले धर्मशास्त्र चांगले जाणता. तुम्हाला राजाच्या जबाबदार्यांची चांगलीच कल्पना आहे. तुम्ही माझ्या कांहीं शंकांचे निरसन कराल तर बरे होईल. असें सांगतात कीं, ब्राह्मण चार बायका करू शकतो, त्यातील एक त्याच्या वर्णाची असली पाहिजे. त्यानंतर एक क्षत्रिय कुलिन तिसरी वैश्य आणि चौथी शुद्रा घरची असेल. त्या सगळ्यांशी तो ब्राह्मण संभोग करत रहातो. त्यांपासून जी संतति होते त्यातील कोणत्या बायकोच्या मुलाचा हक्क त्या ब्राह्मणाच्या संपत्तीवर असतो. त्या चार बायकांच्या मुलांचे कसे हक्क त्याच्या मालमत्तेवर शाबीत होत असतात? त्या बाबत धर्मशास्त्र काय सांगते ते सांगा".

भिष्म सांगतात, "ब्राह्मणाचा हक्क असतो कीं, तो त्या तिनही वर्णाच्या बायकांशी लग्न करू शकतो".

युधिष्ठीर बोलतो, समजा वासनेच्या मोहात अडकून ब्राह्मण शुद्र स्त्रीला प्राधान्य देतो पण शास्त्राप्रमाणे त्याला मान्यता नाही, त्या प्रमाणे शुद्र बाई बरोबर लग्न केल्यामुळे तो ब्राह्मण त्याच्या पुढच्या जन्मी शुद्र कुळात जन्म घेणार असे दिले आहे जर त्यांने आधी ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य बायकांशी लग्न केली नसतील तर. आता मी सांगतो त्या ब्राह्मणाची संपत्ती त्या चार मुलांत कशी विभागून द्यावी त्याबद्दलचे आदेश शास्त्रात काय दिले आहेत. ब्राह्मण पत्नीचा मुलगा त्या ब्राह्मणाकडची अत्युत्तम गोष्ट घेतो. उरलेल्या संपत्तीचे दहा समान भाग केले जातात. त्यातील चार भाग ब्राह्मणीच्या मुलाला मिळतात, तीन भाग क्षत्रिय आणि दोन भाग वैश्य व उरलेला एक भाग शुद्र बाईच्या मुलाला मिळतो. जर जास्त मुलं झाली असतील एका बाई पासून तर त्या बाईच्या वर्णाच्या हिस्शानुसार जो भाग येतो त्याची सारखी वाटणी त्या सगळ्या मुलांत होईल. त्याच प्रमाणे तीन द्विज बायकांच्या मुलांना ब्राह्मण हा दर्जा मिळतो परंतु, शुद्र बाईचा मुलगा शुद्रच समजला जाईल असे शास्त्र सांगते. त्या मुलाला वेदांचा अभ्यास करण्याचे बंधन नसेल. पण जर ब्राह्मण बाप त्याच्या हयातीच्या काळात जे त्या शुद्र बाईला व तिच्या मुलांना देईल ते त्यांचे असेल. त्यावर

इतर बायकांचा आणि त्यांच्या मुलांचा कांहीं हक्क नसेल. अशारितीने त्या ब्राह्मणाच्या संपत्तीचा दहावा भाग त्या शुद्र बाईला मिळत असतो. ब्राह्मण फक्त तेवढीच संपत्ती साठवू शकतो जेवढी त्याच्या परिवाराला तीन वर्ष पोसण्यासाठी आवश्यक आहे आणि त्यापेक्षा जास्त धन जमा झाले तर ते तो यज्ञात खर्च करील असे शास्त्र सांगते. शास्त्राप्रमाणे ब्राह्मण जास्त संपत्ती जमा करू शकत नाही, जास्तीत जास्त तो एक हजार नाणी इतकी संपत्ती साठवू शकतो. (*ह्या जाचक कायद्यामुळे ब्राह्मणांनी कालांतरानी वैश्य वर्ण स्वीकारण्यास सुरूवात केली कारण वैश्यांना कितीही संपत्ती साठवण्याची परवानगी असते. जे युद्ध करू शकत ते ब्राह्मण क्षत्रिय वर्णाचा स्वीकार करत होते. अशारितीने जे कमी कुवतीचे होते ते फक्त ब्राह्मण वर्णात रहाणे पसंत करत होते परिणामतः ब्राह्मण समाजाची गुणवत्ता आणि संख्या कमी होत गेली. असे त्रेतायुगापासून होत गेले.*) ब्राह्मणांने त्याच्या पत्नीला दिलेल्या संपत्तीचा विनियोग कसा करावा ते ठरवण्याचा हक्क त्या पत्नीला आहे. त्यात कोणी हस्तक्षेप करणार नाही. पतीच्या हयातीत मात्र ती त्याच्या परवनगीशिवाय त्या धनाला हात लावणार नाही. कन्यांच्या बाबत शास्त्र सांगते कीं मुलगी मुला इतकीच हक्कदार आहे पित्याच्या मालमत्तेमध्ये. त्यामुळे त्यांचा हक्क संपत्तीत त्याप्रमाणे धरला जाईल. आईच्या मालमत्तेवर (जी आईच्या माहेरहून तिला मिळाली आहे) मात्र तिच्या मुलींचाच फक्त हक्क असेल. त्यात मुलांचा हक्क नसेल. निपुत्रिक दांपत्यांच्या बाबत शास्त्र सांगते कीं, नवर्याची सगळी संपत्ती त्याच्या बायकांत वरीलप्रमाणे विभागली जाईल. असे आहेत वारसा हक्काचे कायदे वैदीक धर्मात. हे कायद्याचे नियम मला जाचक आणि अन्यायकारक वाटतात".

भिष्म त्याला उत्तर देतात, "अरे राजा, ह्या जगातील सगळ्या बायका दारा म्हणून बोलल्या जातात. ह्या कायद्यात मेख अशी आहे कीं, जरी ब्राह्मणांने तीन लग्नात पहिले लग्न शुद्र बाईशी केले आणि शेवटचे लग्न ब्राह्मण बाईशी केले तरी वारसा हक्कात त्या ब्राह्मण बाईचा हक्क प्रथम समजला जातो. तिला सर्वात जास्त मान असतो. ब्राह्मणाची सगळी धार्मिक कार्याची सामुग्री तिच्या कडीकुलपात असेल. ती तिच्या पतिबरोबर असेल तर तेथे इतर बायका जाणार नाहीत. असे मनूने सांगितले आहे.

जो ब्राह्मण दुसर्या बायकोशी जास्त काळ घालवत असेल तर त्याला ब्राह्मणात चांडाळ असें समजले जाते आणि त्याचे समाजातील स्थान कमी दर्जाचे होते. मात्र राजा ब्राह्मणाच्या क्षत्रिय पत्नीच्या मुलाला जास्त महत्व देईल कारण राज्यकारभारात तो महत्वाचा समजला जाईल. त्यानंतर ब्राह्मण आणि त्यानंतर वैश्य असेल. शुद्र कोठेच नसेल. जर क्षत्रियाने इतर वर्णाच्या बायकांशी लग्न केली असतील तर क्षत्रिय बाईचा हक्क मोठा असेल. त्यानंतर वैश्य आणि शेवटी शुद्र असेल. क्षत्रियाच्या संपत्तीच्या आठ वाटण्या होतील. क्षत्रिय मुलगा चार हिस्से घेईल वैश्य तीन हिस्से आणि शुद्र एक हिस्सा घेईल. शुद्र बाईचा मुलगा तेव्हांच हिस्सा घेतो जेव्हां त्याचा पिता त्याला तो देतो. क्षत्रियाने ब्राह्मण पत्नी केली तर काय ह्याबद्दल श्रृतीत सांगितले नाही म्हणजे क्षत्रियानी ब्राह्मण पत्नी करावयाची नाही असे गृहीत धरलेले आहे परंतु, अशी अनेक उदाहरणं आहेत ज्यात राजांनी ब्राह्मण मुलींशी लग्न केली आहेत. त्यामध्ये पिता शुद्र मुलाला हवे तशी वाटणी करून देऊ शकतो. वैश्य एकच पत्नी करू शकतो. तो शुद्र पत्नी करू शकतो पण ते शास्त्रसंम्मत नाही. वैश्याच्या धनाच्या पांच वाटण्या करण्याचे सांगितले आहे त्यातील चार वाटण्या वैश्याच्या आणि उरलेला भाग शुद्र मुलाचा असेल. तो हिस्सा सुद्धा बाप देत असेल तर त्याला मिळतो.

शुद्र फक्त एकच पत्नी करू शकतो. त्याच्या मुलातील मोठ्याचा हिस्सा जास्त असेल बाकीचे उरलेला वाटून घेतील. असे कायदे आहेत वारसा हक्काचे. असे कायदे ऋषी मरिचीचा मुलगा काश्यप ह्यांनी तयार केले होते.

अनुशसन पर्व भाग अठ्ठेचाळीसावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकोणपन्नासावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "मनुष्य त्याच्या वासनांचा शिकार होतो व विविध प्रकारे निरनिराळ्या वर्णाचे लोक जे एकाच समाजात रहात असतात त्यांच्यामध्ये स्त्रीपुरूष ह्यांचे शास्त्रा बाहेरचे असे संभोग संबंध होऊन मिश्र जाती तयार होत असतात आणि ते निसर्गाच्या पद्धतीने होत असते त्यांना धर्माची बंधनं नसतात. परंतु, अशा मिश्र समाजाचे स्थान राजाला निश्चित करावे लागते व त्या द्वारा समाजाचे व्यवस्थापन करावे लागते. मला सांगा त्यांच्या व्यवस्थापनेसाठी आपल्या शास्त्रात कांहीं निश्चित नियम आहेत कां? त्याची माहिती मला सांगा. जसे चार वर्णाच्या लोकांचे व्यवसाय निश्चित केले आहेत तसे ह्या मिश्रजातीच्या लोकांसाठी कोणते व्यवसाय राजाने निश्चित करावयाचे कां ते त्यांना हवे ते व्यवसाय करू शकतात, त्याबद्दल सांगा".

भिष्म सांगतात, "फार प्राचीन काळी ब्रह्माने ब्राह्मण तयार केले व त्या कृतयुगाच्या काळात माणसांत फक्त ब्राह्मण हा एकच वर्ण होता. परंतु, त्या ब्राह्मणांत नंतर सत्त्व गुणापेक्षा इतर गुण जसे रजोगुण आणि तमोगुण त्यांच्या अध्यात्मिक उर्जेच्या कमी होण्यामुळे उत्पन्न झाले त्यामुळे ब्राह्मणांत रजोगुणी मधून क्षत्रिय आणि वैश्य हे वर्ण तयार झाले. त्यापेक्षा कमी अध्यात्मिक उर्जा असलेल्या ब्राह्मणांतून शुद्र हा वर्ण उत्पन्न झाला अशा प्रकारे एका वर्णातून चार वर्ण तयार झाले कृतयुगाच्या मध्यान्ह काळी. मुळात तो एकच वर्ण असल्याने त्यांचे एकमेकांबद्दलचे आकर्षण स्वाभाविक होते. त्यामुळे जरी जाती व्यवस्थेनुसार साधारण लग्न होत होती तरी कांहीं जाती बाहेरची अशी लग्न होणे स्वाभाविक होते तसे होत होते. मिश्र लग्नाच्या संततिचे वर्ण त्यांच्या आईच्या वर्णावरून ठरवले जात होते. वेदाच्या आधीच्या म्हणजे कृतयुगात सगळे ब्राह्मण होते पण त्यात कमी जास्त प्रवृत्ती आढळत निरनिराळ्या व्यक्तींत जरी त्या व्यक्ती एकाच मातापित्याची संतान होती. तेव्हां त्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी वर्ण व्यवस्था गुणकर्म विभागशः ठरवली जात होती त्यामुळें एकाच घरात एक मुलगा ब्राह्मण असतांना त्याचा सख्खा भाऊ शुद्र असू शके. त्यामुळे पुढे जरी जन्म निहाय वर्गीकरण केले गेले त्रेतायुगात, त्यांचे लग्न संबंध होणे चालू

होते. त्याचे कारण सांप्रत सुद्धा सगळे मुळात ब्राह्मणच असे समजले जात आहे. जन्माप्रमाणे वर्गीकरण झाल्यानंतर त्याचा अंमल कालांतराने जास्त आग्रहपूर्वकपणे करणारे ब्राह्मण पुढे आले आणि जाती व्यवस्था विशेष जाचक त्या अहंकारी ब्राह्मणांनी केली त्यांच्या अहंकाराच्या पुष्टीसाठी. त्याप्रकारचे कायदे नियम त्रेतायुगाच्या मध्यान्हापुढे होत गेले ते आपण जाणता. आता ही जाती व्यवस्था पूर्णपणे जन्मनिहाय त्या ब्राह्मणांनी केली आहे व त्याप्रमाणे समाज व्यवस्था राजाला सांभाळावी लागते आहे. ब्राह्मणाचा शुद्र स्त्रीपासूनचा पुत्र पराशर म्हणून बोलला जातो. त्याचा अर्थ शवापासून जन्मलेला असा आहे. त्याचे कारण शुद्र स्त्रिला ते माजोर ब्राह्मण प्रेताची उपमा देत होते. त्या प्रकारे व्यासमुनीचे पिता जन्मले होते. म्हणून त्यांचे नाव पराशर ऋषी होते. पराशराला जरी ब्राह्मण मानले गेले नाही तरी त्याला त्याच्या पित्याच्या मुलांची म्हणजे त्याच्य भावंडांची काळजी घ्यावी लागत असे जर तो परिवारात सर्वात ज्येष्ठ असेल. पुढे ह्या जातीव्यवस्थेने समाजाचे अशाप्रकारे विभाजन केले कीं, निरनिराळ्या वर्णाचे लोक एकमेकांत लग्न करणे गैर समजू लागले. त्यात जर क्षत्रियाने शुद्र बाईशी लग्न केले व तिला पुत्र झाला तर त्याला उग्र असें विशेषण लागत असे. त्याच प्रमाणे वैश्याने जर शुद्र पत्नी केली तर तिच्या पासून झालेल्या पुत्रास सुत असें विशेषण लागत होते. त्याचप्रमाणे क्षत्रिय ब्राह्मण बाईशी लग्न करून जे पुत्र होत त्यांना सुद्धा सुत समजले जात होते. अशारितने एका ब्राह्मणातून अनेक जाती तयार होत होत्या केवळ अहंकाराच्या प्रभावामुळे. सुत राजाचे भाट होत असतं. त्याशिवाय इतर कामं जसे रथ चालवणे, शस्त्रांचा सांभाळ करणे आणि प्रसंगी युद्धात सैनिक म्हणून जाणे असे करत असतं. वैश्याला ब्राह्मण बाईपासून होणार्या संततिला वैदेही असें म्हणत. वैदेही राजाच्या वाड्याची संरक्षणाची व्यवस्था करत असतं त्याशिवाय सुतांची कामं सुद्धा ते करत असतं. शुद्रापासून ब्राह्मण बाईला झालेल्या संततिला चांडाळ म्हणत. त्यांना न्यायदानात गंभीर कार्य सोपवले जात होते जसे गुन्हेगाराला देहांताची शिक्षा देणे. ते इतर काळात राजाचे सैनिक म्हणून काम करत. वैदेही स्त्रीला कोणाशीही लग्न करता येत असे अथवा लग्नाशिवाय पुरूषांबरोबर रहाण्याची मुभा असे. त्या स्त्रियांच्या पासून क्षत्रिय आणि ब्राह्मण पुरूषा पासून झालेले कायस्थ समजले जात होते. ती मुलं आईच्या बरोबर रहात. त्यांचा वंश मातेपासूनचा समजला जात होता. त्या समाजात स्त्रिया

फार स्वतंत्र असतात व त्याच्या जीवनाचे निर्णय त्या पुरूषाच्या परवानगीशिवाय घेत असतात. अशा मिश्र रक्ताच्या लोकांत खास चाणाक्षपणा, चतूराई असें गुण असल्याने ते लोक राजाच्या कामात मोठ्या जबाबदारीच्या हुद्यावर पोहोचत असतात. वैश्य पुरूषाचा क्षत्रिय बाईचा मुलगा मगधी म्हणून ओळखला जात होता. तेसुद्धा यज्ञात ब्राह्मणाना मदत करत असत. त्यांचे दुसरे काम राजाचे गुणगान करण्याचे असें. असे पुरूष उद्योग, व्यापार अशा कामात मोठी कामगिरी करत असतात.

शुद्रापासून झालेला क्षत्रिय बाईचा मुलगा निशाद म्हणून ओळखला जातो. ते गंगानदीवर मासे मारी करण्याचे काम करण्यासाठी नियुक्त होत असतं. अशाप्रकारे राजा ह्या मिश्र पिंडाच्या लोकांना समाजात स्थाईक होण्यासाठी त्यांना निरनिराळी कामं नियुक्त करत असें ते राजाचे काम असते असें भिष्म युधिष्ठीराला सांगत असतात. शुद्रापासून वैश्य बाईला होणारा अयोगव म्हणून ओळखला जात असे व त्याचे काम तक्षण (सुतारकाम) असें. ब्राह्मणानी अशा मिश्र पिंडाच्या माणसाकडून दान घ्यावयाचे नाही असा दंडक आहे. कारण ते चतुर्वण पद्धती बाहेरचे समजले जात म्हणून ते वैदीक विधींत भाग घेण्यास अयोग्य समजले जात होते. अशारितीने मिश्र पिंडाच्या लोकांना चतुर्वण व्यवस्थेच्या बाहेर ठेवण्याची प्रथा होती तरी गुणकर्मशः ते त्याच्या खर्या योग्यतेच्या दर्जाला जाऊ शकत होते. त्याला कोणी विरोध करत नव्हते. ह्या व्यवस्थेमुळे समाजात उच्च नीचता आणि त्यातून उद्भवणारे तणाव समाजात उत्पन्न होत होते. कारण त्या मिश्र पिंडाच्या लोकांत उच्च समजल्या गेलेल्या परंतु, योग्यता नसलेल्या लोकांबद्दल तुच्छतेची भावना व त्यातून शत्रूत्व जे उत्पन्न होत होते त्याला शांत करण्याचे काम राजाला मोठ्या खूबीने करावयाचे असते. त्याच्यात पुन्हा मिश्र संबंध होत होते कारण त्या मिश्र पिंडाच्या स्त्री पुरूषांना चतुर्वणाचे जाचक नियम त्रास देत नाहीत त्यामुळें ते जास्त स्वतंत्र असतात. राजाकडे आपले कर्तृत्व दाखवून ते आपले योग्य स्थान मिळवू शकतात. राजासुद्धा त्यांच्या योग्यतेच्या नेमणूका करण्यास मोकळा असतो. अशारितीने चार वर्णातून पंधरा उपजाती तयार झाल्या आहेत आजच्या घडीला. भिष्म सांगतात. त्या विविध जातीचे नामकरण राजा करतो व त्यानुसार त्यांच्या व्यवसायाचे नियम ठरवत असतो परंतु, बर्याच वेळा ते लोक त्यांचे व्यवसाय त्यांच्या मर्जीने निवडून त्यात रहाणे पसंत करतात जे राजाला मान्य

करावयाचे असते. कांहीं जाती विशेष फक्त बायकाच्या जातीच्या आहेत त्यात एक आहे सैरंध्री. ती मगधी पासून होते म्हणजे (वैश्य–क्षत्रिय मिश्र जात). त्या बायका नटणे सवारणे, ह्या वेशभूषा करण्याच्या दागिन्याचे असें सुशोभित करण्याचे काम करण्यात पटाईत असतात म्हणून राजा त्यांना ते काम देईल. त्याकरता लागणारे सामान तयार करण्यात त्यांचे पुरूष असतात. अशाप्रकारे दोघे मिळून ते काम राजासाठी आणि समाजातील उच्चभ्रूंसाठी करतात. वैदेही पुरूष आणि मगधी ह्यांपासून मैरेयक जात तयार झाली जी मद्य शरबतं आणि अशी पेये राजाला पुरवण्याचे काम करतात. इतरांना सुद्धा विकून पैसे कमावत असतात. निशाधातूंन मदगूर जात तयार झाली जे होड्या बनवण्याचे काम करतात. राजासाठी युद्धनौका बनवण्याचे काम ते करत असतात. चांडाळांतून शौपक तयार झाले जे मृतांचे व्यवस्थापन करत असतात. मगधी पासून पुढे गुन्हेगारी उद्योग करणार्या धोकेबाज जाती तयार झाल्या ज्यांपासून राजाला त्याच्या जनतेचे संरक्षण करावयाचे असते म्हणून त्यांच्यावर राजाला खास ध्यान द्यावयाचे असते. त्यामध्ये येतात, मंगस, स्वदुर्क, क्षौद्र, सौगंध आहेत. त्याशिवाय मद्रनभ, पुक्कश, असे जे अभक्ष्य भक्षण करतात, गावाबाहेर रहातात ते मृतांच्या अंगावरील कपडे काढून ते वापरतात. ते इतके गरीब असतात कीं त्याची भांडी तुटलेली असतात. वैदेही बायकांपासून अनेक जाती तयार झाल्या आहेत, त्या सगळ्या राज्याबाहेर रहातात आणि दिवसा कामासाठी राज्यात येतात. एक मिश्र जात पंडूसौपक म्हणून ओळखली जाते ते वेताच्या टोपल्या करतात. ह्या जाती पापातून तयार झाल्या आहेत असें स्वताला उच्च समजणारे ब्राह्मण आणि क्षत्रिय लोक सांगतात पण अरे राजा, त्या गरीब जातींमध्ये त्याच उच्च समजलेल्या उच्च वर्णियांचे रक्त धावत असते. म्हणून राजाने त्यांच्याशी चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदयेने पाहिले पाहिजे. त्यांचा अवमान न करता त्यांना न्याय दिला पाहिजे. त्याना वेदाचा अभ्यास करण्याचा हक्क नसला तरी जगण्याचा हक्क राजा देईल कारण तेसुद्धा अरे राजा तुझे नागरीक आहेत. त्या सगळ्यांने राजाबद्दल प्रेम वाटेल असे राजा त्यांच्याशी वागत असला पाहिजे. स्वताला उच्च समजून इतरांना कमी लेखणार्या ब्राह्मणांपासून त्या उपयोगाच्या समाजघटकांचे संरक्षण करण्यास राजा बांधलेला असतो. त्या वरकरणी नीच समजल्या गेलेल्यामध्ये उत्तम गुण लपलेले असतात ते राजाने हुडकून त्यांना संधी दिली

पाहिजे. ते लोक त्यांचे व्यवसाय करत असतात त्यात भांडी बनवणे. घिसाडी काम, कलाकुसरीची काम, अशा कित्येक गोष्टींमध्ये ते व्यस्त असतात. त्याच्या सौख्याचा राजाला विचार करावा लागतो. समाजाने ह्या लोकांना प्रगती करण्यासाठी मदत करावयाची असते व त्यात राजाला महत्वाची भूमिका करावयाची असते कारण ह्यांची संख्या प्रजाजनात जास्त असते ते राज्याच्या भवितव्याचा मोठा हिस्सा असतात. त्यांच्या परिस्थितीकडे राजाने जातीने लक्ष द्यावयाचे असते. त्यांच्यातून राजाचे सैनिक, हेर असे सेवक तयार होत असतात. त्या समाजाच्या मजबूतीत त्या राज्याची मजबूती असते. उच्च कुलिनांच्या वासनामयतेमुळे अशा मिश्र जाती तयार होत असतात म्हणून त्यांची काळजी घेण्याची जबाबदारी त्या उच्चभ्रूवर सुद्धा असते ज्यामध्ये स्वतः राजा असतो. पुरूष त्याच्या वासनामयतेची जबाबदारी स्वतावर न घेता नेहमी बायकांना दोष देऊन मोकळा होतो आणि आपण मोठे निर्दोष आहोत असा बहाणा करत असतो. कित्येक वेळा तावडीत सापडलेल्या दासी, नोकराणी, सैरंध्री असा बायकांवर असे पुरूष बळजबरीने बलात्कार करतात व त्यामुळे मुलं जन्मत असतात. त्याचा दोष हे उच्चकुलिन पुरूष त्या असहाय बायकांच्या नैतिकतेबद्दल शंका घेत आपले पाप लपवत असतात. त्यासाठी राजाला न्याय देण्यासाठी अशा दोषी पुरूषांना योग्य सजा करावयाची असते. तशातून बर्याच मिश्र जातीतील मुलं उपजत असतात. म्हणून ह्या मिश्र जाती आणि त्यातील मुलं ही राजाची नैतिक जबाबदारी आहे हे लक्षात घेऊन राजा त्याचे न्यायाचे काम करत असला पाहिजे".
युधिष्ठीर बोलतो, "वरकरणी कोणाची काय खानदान ते कधीच समजत नाही ही वस्तुस्थिती आहे. अहो पितामहा मला सांगा एकादी पद्धत त्याजोगे राजा त्यांच्या जन्माची खरी माहीती समजू शकेल"?

अनुशासन पर्व भाग एकोण पन्नासावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग पन्नासावा

भिष्म पुढे सांगतात, "असे ऋषी समजतात कीं, अनौरस संतान बर्याच वेळा अयोग्य वागणूक दाखवतात. माणसाच्या वागण्यावरून त्याची खानदान कोणती ते ओळखता येते. चांगल्या खानदानीतील लोकांची वर्तणूक सुसह्य असते असा साधारण अनुभव असतो. अनौरस संतान बहुधा गुन्हेगारी प्रवृत्तीची असते असें समजले जाते म्हणून राजाचे कारभारी त्यांच्याकडे साशंकपणे पहात असतात. त्यांच्यावर हेत्वारोप करण्याची प्रवृत्ती त्या कारभार्यात असते. पंचव्रताचे त्यांच्या कडून पालन होत नाही असा अनुभव आहे. म्हणून त्यांना उच्च दर्जा दिला जात नाही. प्रामाणिकपणा आणि कृतज्ञता हे पंचव्रतातील दोन व्रत त्यांच्या कडून व्यवस्थितपणे आचरले जात नाहीत. म्हणून ते विश्वसनीय नसतात. असली खानदान असलेले तसे वागणार नाहीत असा साधारण समज असतो व त्याप्रमाणे समाजाची अशा अनौरस अपत्यांकडे पहाण्याची प्रवृत्ती असते. अर्थात् त्याला अपवाद असतात हेसुद्धा राजाने लक्षात घेऊन त्याप्रमाणे सावध राहून तो त्या लोकांशी वागेल. असे अपवाद त्यांच्या वर्तणूकीतून दिसून येतात. थोडक्यात सांगावयाचे असे कीं, माणसाच्या वर्तणूकीला महत्व असते जर वर्तणूक उत्तम असेल तर तो उच्च समजावा राजाने आणि अयोग्य असेल तर नीच समजावा हा ठोकताळा आहे माणसें अजमावण्याचा. एकादा जन्माने शुद्र असलेला जर वागणूकीने उच्च असेल तर राजा त्याला उच्च कुलीनाचा मान देईल आणि एकादा ब्राह्मण अयोग्य वागणूक दाखवत असेल तर त्याला तो मान देणार नाही. राजासाठी वागणूक महत्वाची असते कूळ नंतर येते. असे धोरण असावे लागते. माणसाचे वागणे त्याच्यावर कोणते संस्कार झाले आहेत त्यावर अवलंबून असते. साधारण अपेक्षा असते कीं, उच्च कुळातील माणसांवर त्यांच्या घरात उच्च दर्जाचे संस्कार होत असतात पण त्याला अपवाद असू शकतात म्हणून त्याबाबत राजा नेहमी सावध भूमिका घेईल. असे असू शकते कीं एकादे शुद्राचे घर जास्त सुसंस्कृत आहे आणि ब्राह्मणांचे नाही. राजा त्यासाठी केवळ जात वर्ण हे न पहाता त्याची वागणून पाहून त्या

माणसाबद्दल निर्णय घेईल. त्यासाठी राजा जातियता न पहाता गुणकर्म विभागशः हे धोरण स्वीकारेल. बर्याच वेळा ब्राह्मण त्यांच्या खास दर्जाचा गैरफायदा घेत असतात. त्याने राजा फसला तर ते राजाच्या स्थानाला शोभणार नाही. जे पुरूषांचे तेंच बायकांच्या बाबत असते, त्यांच्यावर कोणते संस्कार झाले ते महत्वाचे असते. मग ती शुद्र आहे कां ब्राह्मण आहे ते पाहू नये. त्यासाठी राजा लोकांच्या बद्दल निर्णय घेण्यात चिरकर्णी असला पाहिजे".

युधिष्ठीर विचारतो, "निरनिराळ्या स्त्रियांच्या पासून झालेल्या मुलांच्या बाबत कोणते निर्णय घ्यावे त्याबद्दल कोणते ठोकताळे आहेत ते सांगा असे कीं, त्या माहितीच्या मदतीने मला निर्णय घेता येतील. असा टोकताळ्यांच्या मदतीने राजा त्याचे काम सोपे करू शकतो".

भिष्म सांगतात, "पुरूषाच्याच वंशाच्या बाईपासून झालेला तोंच स्वज आहे असे समजतात. वंशाच्या वृद्धीसाठी भाडोत्री बाईकडून पुत्र झाला तर त्या मुलाला निरुक्तज म्हणतात. त्याच्या बायकोला इतर पुरूषापासून नवर्याच्या परवानगी शिवाय झालेल्या मुलाला प्रसृतज म्हणतात, त्याच्या बायकोला त्याच्या परवनगीने झालेला पतीतज समजला जातो. त्याशिवाय आणखीन दोन प्रकारचे पुत्र असतात, दत्तक घेतलेला आणि दासीला त्याच्यापासून झालेला. दत्तक घेतलेला अध्युज आणि दासीच्या पुत्राला कनिन म्हणतात. त्याशिवाय कांहीं प्रकार सांगितले आहेत शास्त्रात, अपध्वंसज, अपासद".

युधिष्ठीर विचारतो, "ते कोण आहेत ज्यांना अपध्वंसज म्हणतात आणि कोण अपासद"?

भिष्म सांगतात, "ब्राह्मणाला त्याच्या इतर वर्णाच्या बायकांपासून झालेला अपध्वंसज समजले जातात आणि क्षत्रियांच्या इतर वर्णातील बायकांना झालेले अपासद समजले जातात".

भिष्म पुढे सांगतात, "शुद्रापासून ब्राह्मण बाईसा झालेला चांडाळ, शुद्राला क्षत्रिय बाईपासून झालेला व्रात्य आणि वैश्य स्त्रीला शुद्र पुरूषापासून झालेला वैद्य अशी त्या मुलांची नांव असतात. ते सगळे अपासद समजले जातात. वैश्याला क्षत्रिय बाईपासून झालेला वैनक समजला जातो. ब्राह्मण बाईला क्षत्रिय पुरूषापासून झालेला सुत समजला जातो. तेसुद्धा अपासद समजले जातात".

युधिष्ठीर पुढे विचारतो, "पुरूषाने जन्मलेला पुत्र स्वीकारला तर तो त्याचा ठरतो व नाही स्वीकारला तर तो त्या पुरूषाचा ठरतो ज्याच्या बाईबरोबर त्याने संबंध केला आहे".
भिष्म सांगतात, "तेंच नियम सगळ्या अशा अनौरस मुलांसाठी लागू असतात.
युधिष्ठीर पुढे विचारतो, "केवळ त्याचे बीज आहे म्हणून तो पुत्र त्याचा ठरतो कां? जो त्या मुलाचे लालन पालन करतो त्याचा काय हक्क असतो त्या मुलावर"?
भिष्म सांगतात, "केवळ बीज त्याचे म्हणून तो त्याला मुलगा ठरत नाही परंतु, जो त्याचे लालन पालन करतो तो त्याचा बाप सामजला जातो राजाच्या (कायद्याच्या) दृष्टीने. म्हणून त्या मुलावर बीज पिता कोणत्याही प्रकारे हक्क दाखवू शकत नाही. असा मुलगा त्याच्या बीज पित्याचा वर्ण स्वीकारू शकत नाही. त्याचा वर्ण त्याच्या पालक पित्याचा समजला जातो. परंतु, ज्याने त्या मुलाला दत्तक घेतले तो त्याचा पिता समजला जातो व त्या पित्याचा वर्ण त्या मुलाला मिळतो".
युधिष्ठीर विचारतो, "रक्ताचे नाते नसलेला मनुष्य केवळ त्या मुलाला दत्तक घेतो म्हणून तो त्याचा वर्णाचा कसा ठरतो"?
भिष्म सांगतात, "अनाथ बालक सांपडले तो त्याचे पालन करतो व त्या मुलाचे पितामाता शोधतो परंतु, ते त्याला सापडत नाहीत अशा परिस्थितीत ते बालक त्या माणसाचे अपत्य असे राजा समजू शकतो. त्या मुलाचा सुद्धा त्या पालकांवर पिता अशा अर्थाने हक्क लागतो. त्या मुलाला त्या पालक पित्याचा वर्ण मिळतो".
ह्या नियमाप्रमाणे मांतग ऋषीचा वर्ण ब्राह्मण ठरत असतांना त्या गाढविणीने त्याला चांडाळ ठरवले ते तिच्या अज्ञानामुळे होते. जरी त्याच्या बीज पित्याचा आणि मातेचा वर्ण वेगळा असला तरी. मातंगाचा उद्धार होणार होता म्हणून तसे घडले असे समजू.
युधिष्ठीर पुढे विचारतो, अशा अनौरस बालकाचे शुद्धीविधी कसे ठरतात. तो कोणत्या वर्णाच्या मुलीशी लग्न करू शकतो. त्याबद्दल मला आणखीन सांगा.
भिष्म सांगतात, "त्या मुलाचे सगळे शुद्धीविधी त्याच्या पालक पित्याच्या वर्णाचे असतील. त्या मुलाने कोणत्या वर्णाच्या मुलीशी लग्न करावे त्याबद्दल असे सांगता येईल कीं, त्याच्या पालक पित्याच्या वर्णाच्या मुलीशी तो लग्न करू शकतो. परंतु, जर त्या मुलाची जन्मदात्री कोण हे समजले तर त्या बाईच्या वर्णाच्या मुलीशी तो लग्न करणे जास्त योग्य असें

समजले जाते. जे नियम मुलासाठी तेंच नियम अशारितीने सापडलेल्या मुलीला सुद्धा लागू होतात. दोघाच्या बाबत जर त्यांच्या जन्मदात्रीचा ठावठिकाणा व वर्ण समजला तर त्या मातेचा वर्ण त्या दोघांना लागू होतो. पालक पित्याचा त्या परिस्थितीत वर्ण लागू होत नाही. म्हणून अरे कुंतीपुत्रा , कर्णाने जे निर्णय घेतले पांडवांत न येण्याचे त्याची कारणं तुला समजू शकतील. मी तुला ते सगळे सांगितले जे अनौरस संततीच्या बाबत आपल्या शास्त्रात सांगितले आहे. परंतु, राजा त्याच्या विवेकांने वेगळे निर्णय घेऊ शकतो. मी आणखीन काय तुला सांगू ते विचार".

अनुशासन पर्व भाग पन्नासावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकावन्नावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "भूतदयेच्या प्रकारांची माहिती मला सांगा. कां भूतदया वाटली पाहिजे दुसर्या बद्दल ते सांगा. सहकार्याबद्दलची, परक्या बद्दलची, पशूं बद्दलची अशा किती भूतदया आहेत? त्याची तीव्रता आणि त्यामुळे काय करावे पंचव्रताच्या नियमाप्रमाणे ते मला समजावून सांगा".
भिष्म सांगतात, "त्यासाठी प्राचीन काळी राजा नहुष आणि ऋषी च्यवन ह्यांच्यात एक संभाषण झाले होते ते तुला सांगतो.
प्राचीन काळी च्यवन ऋषी उदवास व्रत करण्याचे ठरवतात. अहंकार, त्यातून उत्पन्न होणारा क्रोध, सुख आणि दुःख ह्या प्रतिक्रीयांचा तो त्याग करून वैराग्य धारण करून ते व्रत पाळण्याची मनाची तयारी करतो. ते व्रत बारा वर्षाचे होते. ऋषी त्याच्या पंचव्रतामुळे भोवतीच्या सगळ्या प्राण्यांना आपलेसे करतात. त्यांच्यात संतोष निर्माण करतात. ते गंगा आणि यमुना ह्यांच्या संगमावर तप करण्यासाठी पाण्यात उतरलेले होते. च्यवन ऋषी नदीच्या पाण्यात खांबासारखे उभे राहून तप करत असतात. संगमाच्या ठिकाणी पाण्याचा जोर फार होता. त्या पाण्याच्या जोराने ऋषी नदीच्या पात्रात कोसळतात तरी त्यांचे ध्यान किंचितही विचलित झाले नव्हते. त्या पाण्यातील सगळ्या माशांचा त्यांचा परिचय झाला होता व ते त्यांच्यात एकरुप झाले होते जसे काय, ते त्यांच्यापैकी एक आहेत.
एकदा कांहीं मासेमार त्यांची मजबूत बनवलेली जाळी घेऊन तेथे मासेमारीसाठी येतात. ते खूप असतात. मासे पकडण्यासाठी ते त्यांची जाळी नदीच्या संगमात टाकतात. त्यांच्या जाळ्यांनी दोनही नद्यांची पात्र व्यापलेली होती. ते स्वतः पाण्यात उतरतात. थोड्या वेळांनी ते ती त्यांची जाळी खेचण्यास सुरूवात करतात. एकमेकांना मदत करत ते एकत्रपणे त्यांची जाळी खेचत असतात. त्यात बरेच मांसे सापडलेले असतात. बर्याच मेहनतीने ते त्यांची जाळी त्यात सांपडलेल्या माशांसकट बाहेर काढतात. त्या जाळ्यात ते माशांबरोबर च्यवन ऋषीला सुद्धा खेचून बाहेर काढतात. त्यांना वाटते कीं त्याना फार मोठा मांसा गवसला आहे. म्हणून ते फार खूष होतात. परंतु, लवकरच त्यांना समजते कीं

तो एक ऋषी ध्यान करणारा त्यानी काढला आहे. च्यवनांच्या अंगाला शेवाळ, शिंपले चिकटलेले होते. त्यामुळे त्याना प्रथम समजले नाही कीं, त्याना एक मनुष्य काढला आहे. नंतर त्याना ते समजते. त्यांना संकोच होतो व ते ऋषीच्या पाया पडतात. ते हात जोडून त्याला बाहेर येण्याचे सांगतात. त्यांना फार भीती वाटते कीं काय हा ऋषी त्यांना शाप देणार तर नाही? ते ऋषीला बोलतात कीं, त्यांनी पाप केले आहे. परंतु, ते अज्ञानामुळे झाले आहे. म्हणून क्षम्य आहे तरी ते त्यांना क्षमा करतील. त्याकरता आपली काय आज्ञा आहे ते सांगा, असे ते मासेमार च्यवनला विचारतात.

भिष्म पुढे सांगतात त्या ऋषीच्या भोवती मासे सर्वकडे पडलेले होते. आणि त्यात च्यवन बसलेले होते. च्यवन त्या मासेमारी करणार्यांना सांगतात कीं, आपण मला ह्या माशांबरोबर काढले आहे तेव्हां आता तुम्ही मला सुद्धा त्या माशांबरोबर बाजारात विकून टाकावे. कारण मी ह्यांच्या बरोबर होतो व ह्यापुढेही रहाण्याचे ठरवले आहे. ते ऐकून मासेमार घाबरून गेले. त्यांचे चेहरे बघण्यासारखे झाले होते. त्यानंतर काय करावे ते ठरवण्यासाठी ते राजा नहुषाकडे जातात.

अनुशासन पर्व भाग एकावन्नावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग बावन्नावा

भिष्म पुढे सांगतात, "राजा नहुषाला ते समजल्यावर तो व त्याचे कारभारी त्या संगमाच्या ठिकाणी निघतात. राजा च्यवनांची पुजा करतो. राजा पंचव्रताचे पालन करणारा होता. राजा दुसरा इंद्र होता.

राजा नहुष बोलतो, "मला सांगा, आम्ही काय करावे ज्यांमुळे आपले समाधान होईल? कितीही अवघड असले तरी ते केले जाईल".

च्यवन त्याला बोलतात, "पहिल्या प्रथम हे मासेमार फार थकलेले आहेत, त्यांना त्यांच्या माशांचे पैसे देऊन त्यांना मोकळे कर".

राजा बोलतो, "माझे कारभारी त्या माशांसाठी एक हजार सुवर्ण मुद्रा देतील ह्या माशांसाठी".

च्यवन पुढे बोलतात, त्यात मी कसा येणार"? येथे प्रश्न आहे तुझ्या विचार करण्याचा. त्यांना खरी किंमत दे कारण त्यांनी मलासुद्धा त्यांच्या जाळ्यात पकडले आहे.

राजा नहुष बोलतो, "तसे असेल तर त्या निषादांना एक लक्ष मुद्रा द्या".

च्यवन बोलतात, "माझी किंमत योग्य लावलेली नाही. तुझ्या कारभार्यांना हिशोब करावयाला सांग".

राजा सांगतो, "त्या निषादांना एक कोटी मुद्रा द्या. जर ती सुद्धा किंमत कमी असेल तर तुम्ही सांगाल ती किंमत माझे कारभारी त्यांना देतील".

च्यवन बोलतात माझी किंमत कोटी किंवा त्यापेक्षाही जास्त असे नाही. त्यांना खरी किंमत तू दे.

नहुष बोलतो, "माझे राज्य देऊ कां? तेवढी तुमची किंमत होईल"?

राजा ऋषीला विचारतो, "अहो तुमचा काय विचार आहे ह्याबद्दल, ते तरी सांगा"?

च्यवन बोलतात, "माझी किंमत तुझ्या सगळ्या राज्या एवढी आहे कां जास्त ते तुझे ऋषी सांगतील त्यांना जाऊन विचार".

भिष्म पुढे सांगतात, ते ऐकून राजा फार कष्टी होतो. तो आणि त्याचे कारभारी एकमेकांत विचार विनिमय करू लागतात. त्यावेळी एक बैरागी ऋषी तेथे येतो जो गोवंशाचा होता आणि फलं कंदमुळं खाऊन रहात होता. तो मुनी राजाला सांगतो, "अरे राजा, मी तुझ्या शंकेचे समाधान करतो. त्या उत्तराने हा च्यवन ऋषीसुद्धा शांत होईल. मी कधी खोटे बोलत नाही. म्हणून मी जे सांगतो ते तू कर".

नहुष बोलतो, "बोला काय करावयाचे? मी मोठ्या संकटात सांपडलो आहे ह्या ऋषीच्या पेचामुळे. माझे राज्य सुद्धा संकटात पडले आहे. जर हा ऋषी रागावला तर काय होईल ते सांगता येणार नाही. माझे राज्य, माझा वंश सगळे खतर्यात आले आहे. माझी तपस्या कमी म्हणून हा प्रसंग माझ्यावर गुदरला आहे. माझे कारभारी आणि मंत्रीसुद्धा गुंग झाले आहेत. ह्या ऋषीची किंमत कशी ठरवावयाची ते सांगा"?

तो गोवंशी मुनी बोलतो ऋषीची किंमत नसते. ते अमुल्य असतात म्हणून त्यांची किंमत धनाने करता येत नाही. हे तू प्रथम लक्षात घे, राजा. म्हणून गाय ही ऋषीची किंमत समजली जाते. ते ऐकून राजा फार आनंदाने नाचू लागला. तो त्याच्या कारभारी आणि मंत्री ह्यांच्या सह च्यवनांच्या कडे जातात व त्यांची किंमत एक गाय अशी सांगतात.

ते ऐकून च्यवन बोलतात, बरोबर बोललास, मी उठतो. माझी खरी किंमत तू देत आहेस. अरे राजा, गाईच्या इतकी कशाचीच किंमत नसते. गाईचे दान केल्याने पुण्य मिळते. गाय हे समृद्धीचे चिन्ह असते. पवित्र मंत्र स्वाहा आणि वशट गाईवर आधारीत आहेत. यज्ञात गाय मुख्य असते. यज्ञाचे त्या मुख असतात. ती अमृत देते. पृथ्वीवर ती शक्तीच्या रुपाने असते. ज्या देशात गाय आहे तो देश समृद्ध होतो. गाय स्वर्गाचा सोपान आहे. तिच्या इतके श्रेष्ठ दुसरे कांही नाही.

भिष्म पुढे सांगतात, मी गाईचे महत्व तुला किती सांगू, त्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत.

राजा त्या निषादाने एक गाय देतो. ते ती गाय ऋषीस दान करतात आणि त्याच्या कृपेची मागणी करतात. ते बोलतात, आपल्या कृपेच्या पेक्षा श्रेष्ठ दुसरे कांहीं नाही. आम्ही आपल्याला शरण जात आहोत. ते च्यवनाला ती गाय घेण्यास सांगतात. राजाने त्यांच्या माशांचे एक हजार मुद्रा दिल्या होत्या त्यावर ते संतुष्ट होते.

च्यवन त्यांना बोलतात, मी ही गाय स्वीकारत आहे. तुम्ही निषाद सुद्धा मासे मारण्याच्या पापापासून मुक्त झाला अहात.

भिष्म पुढे सांगतात, ते निषाद आणि ती सगळी मासळी जीवंत होते त्या भृगू वंशाच्या ऋषीच्या कृपेने आणि लागलीच स्वर्गात जातात. राजा नहुष ते पाहून चकित होतो. त्यानंतर तो गोवंशाचा ऋषी आणि च्यवन राजाला अनेक आशिर्वाद देतात कीं, तो पुढे इंद्र होईल. त्याने तो पृथ्वीचा राजा समाधानी होतो. राजा त्या दोघांची पुजा करतो.

त्यानंतर च्यवन त्याचे उदवास व्रत पूर्ण केल्यानंतर त्याच्या आश्रमाकडे जातो.

गोवंशाचा ऋषीसुद्धा त्याच्या आश्रमाकडे जातो.

राजा नहूष ते अनेक आशिर्वाद घेऊन त्याच्या राजधानीकडे जातो.

भिष्म युधिष्ठीराला बोलतात, "अरे पंडूपुत्रा, चांगुलपणात आपला, परका असा भेद नसतो. म्हणून मला वाटते तुझ्या प्रश्नांचे समाधान मी केले आहे. ज्याच्या सहवासात आपण असतो त्यांचे भले करावयाचे असते असा संदेश ह्या कथेत आहे, त्यालाच भूतदया म्हणतात. कशाच्याही अपेक्षेशिवाय मदत करणे ह्यालाच चांगुलपणा व माणूसकी म्हणतात. च्यवनानी त्या माशांचा उद्धार केला होता त्यात पंचव्रतातील तीन व्रतं चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया येतात.

अनुशासन पर्व भाग बावन्नावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग त्रेपन्नावा

युधिष्ठीर पुढे विचारतात, "अहो पितामहो, तुम्ही सगळे जाणता, म्हणून मला सांगा जमदाग्नीच्या मुलाची, त्या रामाची जन्म कहाणी, मला त्याबद्दल फार कुतूहल आहे. जन्माने ते ब्राह्मण कुळातील होते. ते ब्राह्मण असून क्षत्रिय पिंडात का आले? रुचीकाच्या वंशात जन्मून तो क्षत्रीय कां झाला? कुशिक क्षत्रिय असून त्याच्या पोटी जन्मलेला क्षत्रिय पिंडाचा कर्माने ब्राह्मण कां झाला? ते त्याच्या नातवांच्या बाबत कां झाले"? ते त्यांच्या मुलांच्या बाबत न होता नातवांच्या बाबत कां झाले ते मला समजावून सांगा".

भिष्म सांगू लागतात, ते समजण्यासाठी तुला मी प्राचीन संभाषण जे झाले च्यवन आणि कुशिक राजामध्ये ते सांगतो. च्यवन भृगूवंशाचा ऋषी त्याच्या दिव्य दृष्टीने पहातो कीं कांहीं अध्यात्मिक दोषामुळे त्याच्या घराण्यात पुढे कोणी क्षत्रिय बाण्याचा वंशज जन्मणार आहे. त्याचे चांगले आणि वाईट परिणाम तो पहातो. च्यवन पहातो कीं, कुशिक राजाच्या वंशातील कांहीं दोषामुळे ते घडणार आहे म्हणून, च्यवन कुशीकाचा वंश संपवण्याचा विचार करत असतो. त्याकरता च्यवन कुशिक राजाला जाऊन भेटतो. त्याला सांगतो, कीं, त्याला कुशिकाच्या घरात त्याला रहाण्याची इच्छा होत आहे. ते ऐकून राजा कुशिक बोलतो, धर्मशास्त्रातील तरतुदीनुसार तू माझ्या घरात राहू शकत नाहीस. कारण तसे होण्यासाठी आपण नातेवाईक असणे जरूरीचे आहे. तरी चांगुलपणाच्या वृद्धीसाठी मी त्या संदर्भात कांहीं करण्याचा प्रयत्न करून पहातो.

भिष्म पुढे सांगतो, राजा च्यवनांसाठी आसन तयार करतो व तो त्याच्या पत्नीबरोबर त्याच्या पुढे उभा रहातो. एक पाण्याने भरलेला हंडा आणला जातो च्यवनांना त्यांचे पाय धुण्यासाठी. त्यानंतर राजा ते सगळे विधी करतो जे करावयाचे असतात ऋषीच्या स्वागतासाठी. कुशिक ऋषीला रिवाजाप्रमाणे मध आणि दही अर्पण करतो. अशारितीने तो च्यवनांचे स्वागत करतो. त्यानंतर ऋषीला बोलतो कीं ते उभयता (राजा आणि राणी) त्याच्या आदेशाची प्रतिक्षा करत आहेत. ऋषी तो सन्मान आनंदाने स्वीकारतो. आपल्याला आमच्या कडील काय पाहिजे ते नेऊ शकता. त्यात आमचा संतोष आहे. ते

ऐकून प्रसन्न झालेले च्यवन राजाला बोलतात, "मला तुझ्या धनदौलतीत अथवा राजसत्तेचा मोह नाही. परंतु, जर तू आणि तुझी पत्नी एक शपथ घेण्यास तयार असतील तर ते मला हवे आहे. ती अशी कीं, तू आणि तुझी पत्नी माझी सेवा विनातक्रार करत रहाल, जोवर मी तुमच्या येथे रहात आहे. ते ऐकून राजा आणि राणी त्यासाठी मोठ्या आनंदाने तयार होतात. ते पाहून ऋषीसुद्धा संतुष्ट होतो. त्यानंतर राजा ऋषीला त्याच्या दालनांत नेतो जेथे तो ऋषी रहाणार असतो. त्या खोलीचे आतील सगळे समान राजा च्यवनाला दाखवतो आणि बोलतो कीं, ते तेथे पाहिजे तितके दिवस रहू शकता. अशारितीने ते एकमेकांशी संवाद करत असतांना सूर्य मावळतीला सरकतो.

ऋषी च्यवन राजाला आज्ञा करतो कीं, तो कांहीं खाण्यापिण्याचा बंदोबस्त करील. राजा त्याला विचारतो कीं, त्यांना कशाप्रकारचे खाद्यपदार्थ आवडतात. ऋषी सांगतो कीं चांगले चविष्ट खाद्यपदार्थ आणा. ती आज्ञा ऐकल्यावर राजाचे सेवक ऋषीसाठी चांगले खाद्यपदार्थ आणतात. च्यवन त्याचे जेवण उरकतो. त्यानंतर थोड्या गप्पा मारल्यानंतर ऋषी राजाला सांगतो कीं, तो थोडा विश्राम करू इच्छीतो. त्यानंतर तो ऋषी त्याच्या बिछाईतीवर निजतो. राजा आणि राणी त्याच्या बिछान्याच्या जवळ खाली बसतात. ऋषी त्यांना सांगतो कीं, त्याची झोप मोडणार नाही असे पहा आणि सांगतो की, ते त्याचे पाय चेपत रहातील जोवर तो निजला आहे. राजा तसे करण्याचे बोलतो. राजा आणि राणी रात्रभर त्या बिछान्याशी च्यवनाचे पाय चेपत बसले होते. तसा तो ऋषी त्या बिछान्यावर एकवीस दिवस झोपलेला होता. त्या काळात त्याने एकदाही त्याची कुस बदलली नाही. राजा आणि राणी दोघे मोठ्या भक्तीभावाने त्याच्या पायाशी त्याचे पाय चेपत बसले होते त्या वीस दिवसभर. एकवीस दिवसानंतर भृगूचा मुलगा जागा झाला. ऋषी गुपचुप त्या खोलीतून राजा आणि राणीला समजणार नाही असा बाहेर पडला. राजा आणि राणी भुकेने व्यकूळ तेथे त्याच्या मागे जाऊ लागले. परंतु, ऋषी त्यांच्याकडे पहात नाही. थोडे अंतर ते तिघे त्या खोलीबाहेर आल्यानंतर ऋषी अदृष्य होतात. ते पाहून राजा खाली पडतो. त्याचे सेवक त्याला उचलतात व बसवतात. त्यानंतर राजा त्याच्या राणीसह ऋषीचा शोध घेण्यास सुरूवात करतो.

अनुशासन पर्व भाग त्रेपन्नावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग चौपन्नावा

युधिष्ठीर विचारतो, "ऋषी अदृष्य झाल्यानंतर, कुशिक राजा काय करतो आणि त्याची राणी काय करते"?

भिष्म सांगतात, च्यवन दिसेनासे झाल्यानंतर राजा फारच कष्टी होतो. थकलेला भुकेला असा तो राजा त्याच्या वाड्यात जातो. तो कोणाशी बोलत नाही. तो च्यवनाच्या वर्तणूकीचा विचार करत असतो. तेथे तो त्याच्या शय्यागृहात पहातो कीं च्यवन त्याच्या बिछान्यानवर पहूडला आहे. त्याला त्या ऋषीच्या विचित्र वागण्याचा अर्थ समजत नाही. परंतु, ऋषीला सापडलेला पाहून राजाचा थकवा बराच कमी होतो. पुनः राजा आणि त्याची पत्नी च्यवनाचे पाय चेपण्याचे काम करू लागतात. ऋषी मात्र शांतपणे त्याची निद्रा करत असतो. पुनः तसे एकवीस दिवस जातात. ह्यावेळी तो कुशीवर निजला होता. राजाचे दांपत्य कोणतीही त्रासाची प्रतिक्रीया न दाखवता त्याचे पाय चेपत असतात. च्यवन त्याच्या निद्रेतून कीं समाधीतून बाहेर येतो व राजाला बोलतो, तुम्ही माझे अंग तेलानी मालिश करा मला स्नान करावयाचे आहे. थकलेले ते दोघे राजाराणी कोणतीही तक्रार न करता जाऊन महागडे सुगंधी तेल आणतात. च्यवन बसला होता आणि राजा व राणी त्याच्या अंगाला तेल चोळत होते. भृगूचा मुलगा कांहीं बोलत नव्हता. तो पहातो मात्र कीं, त्याच्या तशा तर्हेवाईक वागण्याचा त्यांच्यावर कांहीं परिणाम झालेला दिसत नव्हता. अचानक ऋषी उठतो व राजाच्या खाजगी नहाणीगृहात शिरतो. तेथे राजाच्या योग्यतेचे महागडे साहित्य तयार होते आंघोळीसाठी. त्यांचा उपयोग तो करतो व पुन्हा एकदा गायब होतो. राजाच्या नजरेपुढे तो पुन्हा दिसेनासा होतो. ते करूनही राजाचे चित्त विचलित करण्यात च्यवन यशस्वी होत नाही. च्यवन संतुष्ट झाल्याचे त्यांना दाखवतो. त्यानंतर ते राजाचे दांपत्य ऋषीला चविष्ट भोजन देतात. ऋषी त्याना बोलतो कीं, माझे जेवण येथे आणा. त्याप्रमाणे राजा आणि राणी ते त्या ऋषीच्या ठिकाणी नेतात. त्या जेवणा मांसाचे आणि इतर रुचकर खाद्य पदार्थ असतात. त्यात शाकाहार सुद्धा असतो. त्यात नागरी खाद्य पदार्थांबरोबर वनवाश्यांचे खाद्य पदार्थ सुद्धा होते जे ऋषी साधारणपणे पसंत

करतात. फळं होती जी राजा खात असें. त्या जेवणाच्या बेतात सगळ्याप्रकारचे चविष्ट खाद्य पदार्थ होते. ऋषी शाप देऊ नये म्हणून ती सगळी व्यवस्था केली गेली होती. अशारितीने सगळे ठेवल्यानंतर च्यवन त्या सगळ्या खाण्याच्या चीजांना आग लावतो व ते भस्मसात होतात. धूर्त राजा आणि त्याची पत्नी कोणतीच नाराजीची प्रतिक्रीया देत नाहीत जणूकाय कांहींच झालेले नाही असे ते तेथे उपस्थित असतात. च्यवन पुन्हा एकदा अदृष्य होतात. ते उभयता त्याच जागी तसेंच रात्रभर उभे असतात. अशारितीने ते राजा राणी त्या ऋषीची सगळी व्यवस्था कित्येक दिवस तशींच करत असतात. च्यवनाला त्यांच्या वागण्यात कोणताही दोष सापडत नव्हता. राजा आणि राणीच्या संयमाचे त्याला नवल वाटत असते. परंतु, राजा व राणींची परीक्षा अजून संपलेली नसते. त्यानंतर तो ऋषी राजाला आज्ञा करतो कीं तो आणि त्याची पत्नी त्याची गाडी खेचत नेतील त्याला जेथे जावयाचे असेल तेथे. राजा त्यालासुद्धा तयार होतो. तो त्या ऋषीला शांतपणे विचारतो कोणता रथ पाहिजे कां युद्धातील रणगाडा पाहिजे आपल्याला ते सांगा. जो सांगाल तो हजर करतो. ऋषी रणगाडा आणावयाला सांगतो. त्यानंतर त्याची राणी डाव्या बाजूला आणि स्वतः राजा उजव्या बाजूला असे तयार होतात. त्या रणगाड्याचा चाबूक धारदार पात्यांचा असतो. राजा ऋषीला विचारतो सांगा कोठे जावयाचे आहे आपल्याला. ऋषी त्यांना सांगतो कीं, सावकाश खेचा म्हणजे मला धक्के बसणार नाहीत. मला जे भेटावयाला येतील त्यांना मला भेटता आले पाहिजे. त्या भेटणार्यांना मी जे दान करीन ते दान तुझ्या खजिन्यातून दिले जाईल, त्यात कोणतीही कसर होता कामा नये, असे ऋषी बजावतो. त्याप्रमाणे राजा त्याच्या कारभार्यांना आदेश देतो. त्याप्रमाणे त्या सगळ्या गोष्टी आणि प्रचंड हत्ती असा तो जामानिमा रस्त्याने जाऊ लागतो. राजाची प्रजा ते पाहून फार दुःखी झाली. ते जात असतांना च्यवन त्यांना चाबकाने मारू लागतो. तरी राजा आणि राणी कांहीं तक्रार करत नाहीत. ते दोघे तो रणगाडा खेचत नेत असतात. त्यांचे पाय थरथरत असतात कारण ते कित्येत दिवसाचे भुकेले होते. त्यांची शक्ती कमी झाली होती. तरी ते खरे क्षत्रिय दांपत्य हार मानत नाहीत. त्यांना ऋषी चाबकांने मारत होता त्यामुळें दोघे रक्ताने माखलले होते. त्याची प्रजा दुःखी झाली होती. तरी ऋषी शाप देईल ह्या

भयाने ते गप्प बसतात. त्यांना राजाच्या हिम्मतीचे कौतुक वाटत असते. राणीचे आणखीनच कौतुक होत होते. ऋषी मात्र त्याबद्दल कसलीच क्षिती दाखवत नसतो.
भिष्म पुढे सांगतात, राजा अजिबात दाद देत नाही ते पाहिल्यावर राजाने दिलेली संपत्ती च्यवन वाटण्यास सुरूवात करतो. तरी राजाच्या चेहर्यावर कांहीं त्याचा खेद दिसत नाही. ते पाहून तो भृगूवंशाचा ब्राह्मण समाधानी दिसत होता. तो रणगाड्यातून उतरतो व राजाचे गाडीला जोडलेले बंध काढतो. त्याना त्या जोखडांतून मुक्त करतो आणि म्हणतो, अरे राजा, मी तुला उत्तम आशिर्वाद देण्यासाठी राजी आहे. तुम्हा दोघांवर मी प्रसन्न झालो आहे. तो त्याचा हात राजा आणि राणीच्या अंगावरून अलगद फिरवतो तसे त्याच्या सगळ्या जखमा भरून येतात व ते पूर्ववत होतात.
राजा ऋषीला बोलतो कीं आम्हा दोघांना कसलेच कष्ट होत नव्हते जरी बाहेरून आम्ही फार कष्ट करत असल्या सारखे वाटत होते. च्यवन बोलतो मी कधीच खोटे बोलत नाही, गंगेचा हा भाग फार आनंददायक आहे. मी येथे कांहीं काळ विश्राम करणार आहे. तू तुझ्या जामानिम्यानिशी तुझ्या वाड्यात जा. तुम्ही दोघे फार थकला अहात म्हणून आता वाड्यात जाऊन आराम करा आणि उद्या येथे या. तू माझ्यावर रागाऊ नकोस. योग्य वेळी ह्याच्या बदल्यात तुला मोठे फळं मिळणार आहे. तुझ्या मनात जे आहे ते तुला प्राप्त होणार आहे. त्यावर राजा ऋषीला बोलतो, "आम्ही ते सगळे मोठ्या आनंदाने करत होतो. तुम्ही आमचे शुद्धीकरण करत होता हे मी समजत होतो. पहा आमचे अंग कसे तरूण झाले आहे. आम्ही दोघे चांगल्या अवस्थेत आहोत. आपल्या कृपेने आमचे जीवन संपन्न झाले आहे".
च्यवन त्यांना सांगतो की ते उद्या येथे येणार आहेत. त्यानंतर राजा त्याच्या पत्नीसह त्याच्या वाड्यात निघतो. तो मोठ्या आनंदात त्याच्या वाड्यात शिरतो. तो त्याच्या घरी ती रात्र शांतपणे काढतो. ते दोघे समजतात कीं, ते नव्याने पुन्हा यौवनात शिरले आहेत. ती रात्र ते एकत्र झोपतात.
तेथे ऋषी त्या गंगाकिनारी त्याच्या योगिक सिद्धीने अगणित संपत्ती उत्पन्न करतो. त्यात हरप्रकारचे रत्न, जवाहर, सुवर्ण, असतात. जे स्वर्गात असतात ते त्या गंगेच्या किनारी त्यांनी सिद्ध केले होते.
अनुशासन पर्व भाग चौपन्नावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग पंचावन्नावा

भिष्म बोलतात, "दुसर्या दिवशी सकाळी राजा त्याचे प्रातर्विधी उरकून त्याच्या पत्नीबरोबर त्या गंगा किनारी जाण्यास निघतो. तेथे राजा पहातो कीं, एक सुवर्णाचा राजमहाल उभा आहे. त्या महालाला हजार स्तंभ होते सोन्याचे आणि त्यावर रत्न जडवलेली होती. जसा गंधर्वांचा राजमहाल असावा. त्या वाड्याच्या प्रत्येक भागात स्वर्गीय कलाकुसर दिसत होती. त्याचे कमानी द्वार कुशल कारागिरांनी घडवलेले होते असे दिसत होते. महालाच्या आंतमध्ये तलाव आणि त्यात कारंजे थुईथुई पाणी उडवत होते. सगळे अप्रतिम सुंदर होते. वाड्या भोवती केतकी (Pandanus Odortissimus, Linn.), सहकर (Mangifera Indica, Linn.), उद्दलक किंवा सेलू किंवा वहुवर (Cordia Myxa Linn.), उद्दनक किंवा शिरीष (Mimosa Sirisca of Roxburgh.) धव (Conocarpus latifolia, Roxb.), अशोक (Saraoa Indica. Linn., syn. Jonesia Asoka, Roxb.), कुंद्द (Jasminum pubesoens, Linn.) अतिमुक्त किंवा माधवी (Gaertinera racemosa, Roxb.), चंपक (Miohelia Champaca, Linn.) अशी झाडं त्यांच्या फुलांनी डवरलेली दिसत होती. त्याशिवाय तिलक किंवा लोध्र (Symplocos racemosa, Roxb.), अश्वत्थ (Ficus religioea, Linn.) भव्य (कमळा सारखी फुलं देणारा वृक्ष), फणसं, व्यंजुलं, कर्निका, श्यामस, वर्णपुष्प, तसेंच अष्टपदिका वेली योग्य प्रकारे छाटून तयार केलेल्या होत्या. वाड्यात उन आणि शीत पाण्याचे झरे वहात होते. तेथे निरनिराळी खाद्य पेये नीट रचून ठेवलेली होती राजाच्या स्वागतासाठी. तेथे बोलणारे पोपट होते, भृंगराज, कोकीळ, छतपत्र, कोयष्टीक, कुकुभ, मोर, कोंबडे, जीवजीविक, दत्यूभ, चकोर असें देखणे पक्षी बागडत होते. चाक्रवाक, शरूस, आणि विविध प्रकारची माकडं तेथे होती. अनेक अप्सरा आणि गंधर्व सुद्धा तेथे होते. राजाला ते (अप्सरा आणि गंधर्व) कधी दिसत होते तर कधी ते अदृष्य होत होते. त्या वाड्यात सुमधूर धून राजाला ऐकू येत होती आणि एका जागी वेदाचे वाचन होत होते

तेसुद्धा त्याला दिसत होते. तलावावर नाचणारे बगळे तो पहातो. राजाला वाटत होते कीं, तो स्वप्नात आहे कां हा मनाचा भ्रम आहे. त्याला वाटते तो स्वर्गात गेला आहे. ते उत्तराकुरू आहे कां अमरावती आहे, असे विचार त्याच्या मनात येत होते. असें विचार त्याच्या मनात येत असतांना त्याला च्यवन दिसतात. त्या वाड्यात ऋषी एका मौल्यवान बिछाईतीवर पहुडले होते. तेवढ्यात ते पुन्हा अदृष्य झाले त्या बिछान्यासह. त्यानंतर तो पहातो कीं ऋषी दुसरीकडे आहेत. तेथे तो ऋषी कुस गवताच्या गादीवर बसलेले होते. तेथे एक मुंग्यांचे वारूळ सुद्धा होते. त्या ऋषीचे ते वागणे राजाला विस्मयचकीत करत होते. तो त्याच्या राणीला बोलतो, पहा हा नजराणा ऋषींच्या मायावी सिद्धीने तयार केला आहे. त्यांच्या तपस्येमुळे हे करणे त्याना शक्य होत आहे. तपस्येचे सामर्थ्य राजसत्तेपेक्षा जास्त मोठे असते. ते आपण पहात आहोत. च्यवन त्यांच्या किमयेने वेगळे जग निर्माण करू शकतात. मोक्ष सुद्धा प्राप्त करू शकतात. राजसत्ता शरीराच्या बळाने मिळवता येते परंतु, असे सिद्धीचे सामर्थ्य सहजसाध्य नसते. ते राजाचे विचार च्यवन समजतात. ते राजाला जवळ बोलावतात. राजा कुशिक आणि त्याची राणी च्यवनांच्या जवळ जातात. तेथे ते त्यांना वंदन करतात. च्यवन दोघांवर आशिर्वादाचे बोलतात आणि त्यांना त्यांच्या जवळ बसण्यास सांगतात. नंतर तो ऋषी राजाला सांगतो कीं अरे राजा, तू तुझ्या सगळ्या इंद्रियांवर नियंत्रण प्राप्त केले आहेस. ज्या भयंकर परीक्षेतून मी तुला नेले होते काल त्यामुळे ते घडले आहे. आता तू पूर्णतया निष्पाप झाला आहेस. आता मी निघतो, तुझ्या पाहूणचाराने मी पूर्ण समाधानी झालो आहे. मी जो आशिर्वाद देतो तो तू घे.

कुशिक बोलतो, आपल्या सहवासाने मी पुनीत झालो आहे. आपण माझ्यावर संतुष्ट अहात हांच मोठा आशिर्वाद मला मिळाला आहे. माझ्या जगण्याचे सार्थक झाले आहे. माझ्या वंशाचे कल्याण होईल असा दुवा द्या. आपण जर माझ्यावर संतुष्ट असाल तर मला कांही शंका आहेत त्यांचे समाधान आपण करावे.

अनुशासन पर्व भाग पंचावन्नावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग छप्पन्नावा

च्यवन बोलतात, "तू माझा आशिर्वाद स्वीकारला आहेस. त्याशिवाय तू म्हणतोस कीं तुला कांहीं शंका आहेत. मी त्यांचे समाधान करण्यास तयार आहे.
कुशिक बोलतो, "जर आपले समाधान माझ्याकडे रहाण्याने झाले असेल तर मला सांगा माझ्याकडे येण्याचे करण काय होते? मला ते जाणू घ्यावयाचे आहे. मी दिलेल्या बिछान्यावर एकवीस दिवस निजण्याचे काय प्रयोजन होते? त्यानंतर आमच्याशी न बोलता खोलीतून निघून जाण्याचे काय प्रयोजन होते? कांहीं कारण नसतां आपण वारंवार अदृष्य होत होता त्या मागची कोणती भूमिका आपली होती? असे अदृश्य होणे आणि पुन्हा दृष्य होणे ह्या मागील उद्देश कोणता होता. त्यानंतर पुनः बिछान्यावर एकवीस दिवस तुम्ही झोपला होता त्याचे काय प्रयोजन होते? त्यानंतर माझ्या राज्यातील नगरीतून जी माझी यात्रा काढलीत त्याचे काय कारण होते. आम्ही उभयतांना आपल्याला तेलाने मालिश केल्यावर कांहीं न बोलता माझ्या स्नानगृहात शिरलात तसे वागण्याचा काय उद्देश होता ते मला समजेल कां? त्यानंतर मी दिलेले चवीष्ट खाद्य पदार्थ आपण आपल्या मायावी अग्नीने जाळून टाकलेत, असें करण्यात आपला कोणता उद्देश होता ते मला समजून घ्यावयाचे आहे. त्यानंतर माझ्या राजधानीतून आपण जात असतांना तुम्ही मोठ्या प्रमाणात धन संपत्तीचे दान केलेत ते करतांना सत्पात्र अपात्र ह्याचे सुद्धा तुम्ही पाहिले नाही जे नियमानुसार आवश्यक असते, ते कां केलेत, तेसुद्धा मला समजून घ्यावयाचे आहे. त्यानंतर तुम्ही तुमच्या योगसिद्धीच्या महिम्याने जे वैभव वनात उभे केले त्याची काय आवश्यकता होती ते सगळे मला समजून घ्यावयाचे आहे. तुमच्या सारखे तपस्वी हे सगळे लिलया करू शकतात ह्याची मला कल्पना असल्याने मी त्यामुळे प्रभावित झालेलो नसलो तरी एक राजा म्हणून मला आपल्याकडून त्या सगळ्या आपल्या कृत्याची चौकशी करणे क्रमप्राप्त आहे, म्हणून मी आपल्याला विचारत आहे. तरी आपण ते सगळे काय कारणांने करत होता ते सांगावे. मला माझ्या प्रजेला त्याचे उत्तर देणे बंधन कारक आहे. अहो ऋषी, माझी प्रजा आपल्यावर नाराज आहे कारण आपण आमचा

विनाकारण उपमर्द माझ्या राज्यात माझ्या प्रजे समक्ष करत होता हे कोणत्याही नैतिक तत्त्वाच्या विरूद्ध होते. तेव्हां त्यासाठी माझ्या प्रश्नांची उत्तरं द्याल तर बरे होईल. त्या मागील आपला उद्देश मला समजला तर मी माझ्या जनतेचे समाधान करू शकेन".

च्यवन सांगू लागतात, "ऐक मी काय सांगतो ते, त्या सगळ्या गोष्टी मी कां केल्या त्याचे स्पष्टीकरण देतो. तुला ते सगळे समजलेच पाहिजे हे मी मान्य करतो. ते ऐक, फार प्राचीन काळी देवता एकत्र जमल्या होत्या त्यांना उद्देशून ब्रह्मदेव कांहीं बोलत होते. ते मी ऐकत होतो. ते मी तुला ऐकवतो. ते सांगत होते कीं, ब्राह्मण आणि क्षत्रियांतील वादाच्या संदर्भात ते होते. त्यात ब्रह्मदेव सांगत होते कीं, भृगूच्या ब्राह्मण वंशाला तुझा क्षत्रिय वंश नष्ट करणार आहे, ते ऐकल्यावर मी ठरवले कीं, मी तुझ्या वंशाचा नाश केला पाहिजे, त्यामुळे ब्रह्माचे भाकित खोटे ठरेल. त्यासाठी ते कपट मनात ठेवून मी तुझ्याकडे पाहूणचार करण्याच्या निमित्ताने आलो होतो. त्यात मी ठरवले होते कीं, मी तुला माझी सेवा करण्यास सांगणार आणि तू ती करणार परंतु, जर त्या सेवेत तुझ्या कडून कांहीं कमी झाले तर त्या निमित्ताने मी तुला नष्ट करणार होतो. त्यासाठी मी तुला सतावत होतो जेणे कारणे तुम्ही दोघे वैतागून जाल व मला तुम्हाला शाप देता येईल. परंतु, तू आणि तुझी पत्नी मला ती संधी देत नव्हते. तुम्हा दोघांना सतावण्यासाठी मी हरकाम प्रयत्न करत होतो परंतु, तू आणि तुझी पत्नी कोणतीही गैर प्रतिक्रीया न देता मोठ्या भक्तीभावाने माझी सेवा करत होते. मी हरलो होतो. अखेरीस मी समजलो कीं, तुम्ही पूर्णतया निर्दोष अहात. त्यामुळे मी अखेरीस तुमचा नाश करण्याचा विचार सोडून दिला. तुला तुझ्या सहनशीलतेची मर्यादा ओलांडावयाला लावणे हा माझा उद्देश होता, त्या तुझ्या शय्येवर निजणे, तू दिलेले जेवण जाळून टाकणे इत्यादि सगळ्या विचित्र कृत्यां मागचा उद्देश तुला क्रोधीत करण्याचा होता परंतु, तू क्रोधीत न होता उलट माझी मनापासून सेवाच करत होतास. एकवीस दिवस तुम्हा दोघाना मी दोनदा अनशन करावयास लावले त्याचा सुद्धा उद्देश तोंच होता पण तू बिनातक्रार ते सगळे मोठ्या भक्तीभावाने करत होता, तू नाही तर तुझी भार्या चिडेल व मला शाप देण्याची संधी मिळेल असे समजत होतो पण तुझी भार्या तुला साजेशीच निघाली. तेथेसुद्धा तू मला चीत केलेस. तू मला सतत जिंकत होतास व त्या द्वारा क्षत्रिय ब्राह्मणांपेक्षा श्रेष्ठ आहेत हे दाखवत होतास. अखेरचा प्रयत्न म्हणून मी

तुझी संपत्ती दानात वाटण्यास सुरूवात केली पण तू आणि तुझी पत्नी त्याबद्दल साधी नाराजीसुद्धा दाखवत नव्हते. शेवटी मी रणगाड्यातून उतरलो व माझी हार मान्य केली. मी ज्या पापबुद्धीने ते सगळे केले त्याचे प्रायश्चित्त मला पुढे करावे लागणार आहे. त्यासाठी मला घोर तपस्या, कठोर अनुष्ठानं करावी लागणार आहेत. मी तुझ्या वनात हा सोन्यचा महाल व हे सगळे वैभवशाली राजवाडे तयार केले तुला नुकसानभरपाई म्हणून देण्यासाठी. त्या वैभवशाली गोष्टी पाहून तू मोठा उत्तेजित होशिल अशी माझी अपेक्षा होती परंतु, तू ते वैभव पाहून अजिबात प्रभावित झाला नाहीस ती तुझी शेवटची परीक्षा मी घेतली व त्यातसुद्धा तुम्ही दोघे अडकला नाहीत. ती संपत्ती पाहून तुझ्या मनात यत्किंचितसुद्धा त्या बद्दल मोह उत्पन्न झाला नाही. तू ब्राह्मण होण्यास लायक आहेस हे मी समजलो. ब्राह्मण होण्याची तुझी मनिषा आहे. त्यानंतर ऋषी होण्याची तुझी इच्छा आहे, त्यापुढे बैरागी होणे त्याहूनही जास्त मुष्किल असते, परंतु, ज्या प्रकारे तुम्ही दोघे विचार करता तुम्हा दोघांना ते सगळे साध्य होणार आहे असे मला दिसत आहे. तुझ्या वंशात एक ब्राह्मण जन्म घेणार तुझा नातू म्हणून. तो तुझे नाव पुढे चालवेल. त्याच्यात भृगूची शक्ती असेल. तो साक्षात अग्नी असेल. त्याला सगळे दुष्ट लोक घाबरतील. असे बोलून च्यवन राजाला सांगतात कीं, त्यानी त्याच्या सगळ्या शंकांचे निरसन केले आहे. आता त्याला केल्या कर्माच्या प्रायश्चित्तासाठी तीर्थयात्रेला गेले पाहिजे.

कुशिक बोलतो, "असे सांगून तुम्ही मला एक वर दिला आहे असे समजतो. माझा नातू ब्राह्मण हो. अशारितीने माझ्या वंशात ब्राह्मण्य संचारो. नेमके कसे ते घडणार आहे माझ्या वंशात ते सांगा.

अनुशासन पर्व भाग छप्पन्नावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग सत्तावन्नावा

च्यवन त्याला सांगतात, "मी तुला सांगणार आहे त्या सगळ्या परिस्थितींची माहिती ज्यांमुळें मला तुझा वंश नष्ट करण्याची इच्छा झाली. तू जाणतोस कीं, क्षत्रिय भृगूच्या वंशज ब्राह्मणांच्या मदतीने युद्ध जिंकत असतात व बराचसा राज्याचा कारभार सुद्धा ब्राह्मणांच्या सिद्ध शक्तीने (ब्राह्मण तपस्या, ध्यान साधना, जपयज्ञ अशा उपक्रमाने मोठी अध्यात्मिक उर्जा संपादन करत असतात. त्यातून त्यांना विविध सिद्ध शक्ती प्राप्त होत असतात.) करत असतात. त्याना यज्ञासाठीसुद्धा ब्राह्मणांची गरज असते. परंतु, दैवाच्या अगतिकतेमुळे व मोठ्या गैरसमजामुळे त्यांच्यामध्ये भेद उत्पन्न झाला. कांहीं क्षत्रिय भृगूच्या वंशातील ब्राह्मणांचा संहार करण्यास तयार होतात. दैव गति अशी आहे कीं भृगूचा वंश नामशेष झाला. त्या संहारात ब्राह्मणांच्या लहान सहान मुलांना सुद्धा ते क्षत्रिय ठार मारतात. मातांच्या गर्भात असलेले सुद्धा मारले गेले होते. उरलेले ब्राह्मण स्त्रिया व बालकं लपून बराच काळ जगत असतं. त्या नंतरच्या काळी भृगूच्या वंशात एक ऋषी जन्म घेईल त्याचे नांव उर्वी असेल तो अध्यात्मिक तेजात फार प्रबळ असेल. त्याच्या शाप शक्तीने तो सगळी पृथ्वी तिच्या डोंगरा, समुद्रा सह नष्ट करू शकणारा असेल. थोड्या वेळासाठी तो त्याची शक्ती समुद्रात संचार करणार्या घोड्यांच्या तोंडात सोडेल. त्याला एक पुत्र होणार आहे, त्याचे नांव रुचिक असेल. तो सगळे अस्त्र, शस्त्र, मंत्रविद्या असे सगळे आत्मसात करेल. सगळ्या क्षत्रिय वंशाचा नाश करण्यासाठी तो सज्ज होईल. तो ते ज्ञान त्याच्या दिव्य सिद्धीने त्याच्या मुलाला देईल. त्याचे नाव जमदाग्नी असेल. जमदाग्नी सात्त्विक प्रवृत्तीचा, एका मुलीशी लग्न करील. ती मुलगी क्षत्रिय वंशाची तुझ्या घराण्याची असेल. ती गधीची कन्या असेल. तुझी ती नात असेल. त्या दोघाना एक पुत्र होईल ज्यात क्षात्रतेज भरपूर असेल. त्याच वेळी तुझ्या घरात एक क्षत्रिय मुलगा जन्म घेणार आहे ज्याचा कल ब्राह्मण वर्णा कडे होईल. तो तुझा पुत्र गधी ह्याच्या मुलगा असेल. त्याचे नाव विश्वामित्र असेल. विश्वामित्र बृहस्पती सारखा ओजस्वी असेल. रुचिक तुझ्या त्या मुलाला तपस्या

करण्याची शक्ती देईल. त्या मुलांच्या अदलाबदलीला (क्षत्रिय मुलगा ब्राह्मणाच्या घरात आणि ब्राह्मण मुलगा क्षत्रियाच्या घरात) कारण असतील दोन स्त्रिया तुझ्या घरातील. ते सगळे ब्रह्मदेवाच्या मर्जीने होणार आहे. त्याप्रमाणे तुझ्या पासून तिसर्या पिढीपासून तुमचा वंश ब्राह्मण समजला जाईल ज्यांना तुझ्या नावांवरून कौशिक ब्राह्मण म्हणून ओळखले जाईल. अशारितीने तू भार्गवांचा रक्ताने नातेवाईक होशिल.

भिष्म पुढे सांगातात, च्यवनांची ती भविष्यवाणी ऐकून राजा कुशिकाला फार आनंद होतो. तो उद्गारतो, "तथास्तु". च्यवन कुशिकला तो आशिर्वाद स्वीकारण्यास सांगतात. राजा बोलतो ह्या तुमच्या आशिर्वादामुळे माझी इच्छा पूर्ण होणार आहे. माझे घराणे ब्राह्मण वर्णात समाविष्ट होणार ह्याचा मला आनंद होत आहे. माझे वंशज पंचव्रताचे आचरण करतील असा मी विश्वास करतो. त्यानंतर च्यवन पश्चात्ताप करण्यासाठी तेथून तीर्थयात्रेला जातात.

भिष्म बोलतात कीं, त्यांनी ते सगळे सांगितले आहे ज्याबद्दल युधिष्ठीर विचारत होता. त्या कथेत भार्गवाचा जन्म (परशूराम) आणि विश्वामित्राचा जन्म ह्याची मूळ कथा सांगितली आहे.

अनुशासन पर्व भाग सत्तावन्नावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग अठ्ठावन्नावा

युधिष्ठीर पुढे बोलतो, "ही कथा ऐकून मी स्तिमीत झालो आहे. अहो आजोबा, आपल्या युद्धामुळे मोठ्या प्रमाणात क्षत्रियांचे शिरकाण झाले आहे. जे फार समृद्ध होते. त्यांच्या विनाशामुळे मला फार दुःख होत आहे. म्हणून पृथ्वी जिंकून सुद्धा, मला आनंद वाटत नाही. लक्षावधी लोकांचा मी संहार केला आहे. त्या विधवांचा मी जेव्हां विचार करतो, त्या मुलांचा ज्यांचे पिता, बंधू मी ठार मारले आहेत ते आमचे आप्त होते, कोणी मित्र होते, माझे डोके सुन्न होते. मला फार मोठी तपस्या करावी लागणार आहे. त्या दृष्टीने मी तुमच्या कडून कांहीं मार्गदर्शन घेणार आहे".

वैशंपायन पुढे सांगतात, युधिष्ठीराचे ते हताश होऊन बोलणे ऐकल्यावर भिष्म त्याला म्हणतात, तुझा हा निर्णय ऐकून मला फार संतोष वाटत आहे. ह्या जन्मात केलेल्या कृत्यांचा परिणाम स्वरुप त्या जीवात्म्याला त्याच्या पुढच्या जन्मी काय भोगावे लागते हा मोठा रहस्यमय विषय आहे. कित्येक ऋषी त्यांवर त्यांचे भाष्य करत असतात. चांगल्याला चांगला आणि वाईटला वाईट परिणाम हा साधारण ठोकताळा सगळे मान्य करतात. परंतु, त्याच्या बारीक तपशिलात मात्र अनेक मतभेद त्यांच्यात असल्याचे दिसून येते. तपस्येने कांहीं स्वर्ग गाठतात. त्याशिवाय त्याला प्रसिद्धी मिळते. कांहीं वेळा तपस्या करणार्याला दीर्घ आयुष्य मिळते. कांहीं सांगतात कीं, तपस्येने ऐहीक सुख मिळणे सोपे होते. चांगले आरोग्य प्राप्त होते. त्यात मौनी व्रताचे फार मोठे महत्व असते. दानं करून पुण्य जमा होते. असे कांहीं सांगतात की, केवळ फळं आणि कंदमुळं खाणारा देवतांना प्रसन्न करत असतो. केवळ पानं खाणारे मृत्यूनंतर स्वर्गात जातात. केवळ जलाहार करणारा लवकरच स्वर्गात जातो. गुरूची सेवा करणारा ज्ञान प्राप्त करतो. पितरांचे श्राद्ध दररोज करणारा (पितरांच्या नांवाने कावघास देणे, गरीबांना दान करणे, वैद्य असाल तर विनामुल्य औषधी देणे इत्यादि) भरपूर संतति प्राप्त करतो. दिवसातून तिनदा विधीपूर्वक स्नान करणार्याला अनेक बायका मिळतात. जो ब्राह्मण पवित्र मंत्रोच्चार करत स्नान करतो त्याला दक्षाची कृपा मिळते. वनात असलेल्या देवतांना प्रसन्न करणारा राज्यसत्ता मिळवतो. अनशन करून

देहत्याग करणारे स्वर्गात जातात. तपस्या करणारा जर योगाभ्यास सुद्धा करत असेल तर त्याला सुखासिन जीवन प्राप्त होते. त्याला मृत्यूनंतर ब्रह्मलोकात जागा मिळते. दगडा मातीवर निजून जो तपस्या करतो त्याला चांगले घर रहाण्यासाठी (पुढच्या जन्मी) मिळते. फाटक्या चिंध्यात राहून तप करणारे त्यांच्या पुढच्या जन्मी श्रीमंती जीवन प्राप्त करत असतात. केवळ भाज्या खाणार्याला पुढच्या जन्मी चांगले मांसाहाराचे खाणे मिळत राहिल. उदवास व्रत करणारे स्वर्गात मजेत रहातात. जो फक्त सत्याचा आग्रह धरून त्याचं जीवन जगतो त्याला मृत्यूनंतर देवतांशी संवाद साधता येतो. दुष्टपणाचा त्याग करून जो त्याची कामं करतो त्याला आरोग्यपूर्ण जीवन प्राप्त होते. तहानलेल्याला पाणी देणे, भुकेलेल्याला खाद्य देणे, जखमीला औषध लावणे, मुक्या प्राण्यांना जगणे सोपे करणे (पंचव्रतात हे सगळे येतात) अशी तपस्या करणारा मुक्तीच्या दिशेने जात असतो. देवतांची मनोभावे पुजा करणारा स्वर्गात जातो त्याच्या मृत्यूनंतर. जो आनंद वाटतो (देतो) त्याला आनंद मिळत असतो. ज्ञान देण्याने त्याच्या ज्ञानात भर पडत असते. यज्ञ करणारा, उपवास करणारा स्वर्गात जातो. सुवर्णाचे दान करणारा स्वर्गात जातो. जे युद्धात लढत मरतात ते ब्रह्माच्या लोकात जातात. असे ऋषी सांगतात.
वैशंपायन पुढे सांगतात, आजोबाच्या तोंडून ते शेवटचे ऐकल्यावर युधिष्ठीर योद्ध्याचा मृत्यू मिळावा असें समजतो. त्याचा धारातीर्थी पडलेल्यांबद्दलचा शोक कमी होतो. गृहस्थ जीवनाबद्दलचा त्याचा रोष सुद्धा कमी होतो. त्यानंतर तो त्याच्या भावंडांना आज्ञा करतो कीं, ते आजोबा सांगतात त्याप्रमाणे आपण सगळे जगणार आहोत. त्यावर सगळे पांडव आणि द्रौपदी त्याला अनुमोदन देतात.

अनुशासन पर्व भाग अठ्ठावन्नावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकोणसाठावा

युधिष्ठीर बोलतो, "पंचव्रतात जो चांगुलपणा अभिप्रेत आहे त्यानुसार राजासाठी झाडं लावणे आणि तलाव बांधणे, धरणं बांधणे, रस्ते करणे हे येते ते कसे ते सांगा.

भिष्म सांगतात, सुपीक, प्रसन्न अशी जागा ज्यामध्ये विविध प्राणी रहातात, जेथे खनिज मिळतात ती रहाण्यासाठी उत्तम समजली जाते. त्यातील योग्य जागा तलाव खोदण्यासाठी राजा निवडेल. पुढे मी तुला सांगीन विविध प्रकारच्या तलावांबद्दल. सगळ्या प्रकारच्या प्राण्यांना त्यातील पाणी उपयोगी येईल असे असले पाहिजे. जो पाण्याची व्यवस्था करतो तो पुण्यवान ठरतो. पाण्याने भरलेला तलाव हे चांगले स्थान असते. त्या माणसाला देवतांची मेहेरबानी प्राप्त होत असते. सगळ्या लोकांना, प्राण्याना जो पाणी उपलब्ध करून देतो तो पंचव्रताचे (चांगुलपणा, माणूसकी, भूतदया, प्रामाणिकपणा आणि कृतज्ञता) पालन करतो असे समजले जाते कारण पाणी देणे ह्यात ते सगळे येतात. विस्तीर्ण तलाव त्या प्रदेशाची शोभा वाढवतो. विस्तीर्ण तलावाकडे आदिभौतिक प्रजाती जसें गंधर्व, राक्षस, पितृ, उरग येत असतात. त्याशिवाय विविध वनस्पती तेथे वाढतात. ते सगळे त्या तलावाचे काम करणार्याला दुवा देत असतात. म्हणून सरोवर तयार करणे आणि त्यातील पाणी चांगले स्वच्छ ठेवणे अशी कामं करणारा पुण्य कमवत असतो. तलाव स्वच्छ ठेवणे हे तलाव बांधण्या इतकेच महत्वाचे असते ते करणारे सुद्धा पुण्यवान होतात. जर तशा तलावात मांसे असतील तर आणखीनच चांगले असते. तलाव जितका जास्त विस्तीर्ण तितके पुण्य जास्त मिळत असते. त्या तलावाकडे ऋषी आकर्षीत झाले तर ते आणखीनच चांगले समजले जाते. असे पुण्यप्राप्ती करणारे तलाव तीर्थक्षेत्र बनू शकते. म्हणून विस्तीर्ण तलाव खोदणे राजासाठी एक महत्वाचे काम असते. तशा तलावात अनेक विहीरीचे झरे लागतील अशी जागा त्यासाठी निवडावयाची असते. अग्निहात्र यज्ञ केल्याचे लाभ तसे तलाव खोदणार्या राजाला मिळतात. हजार गाईचे दान करण्याचे श्रेय मिळते त्याला जो तलावातील पाणी शुद्ध राखतो व त्याची नीगा राखतो. ज्या तलावात बारमासी पाणी

असते त्या तलावाच्या राखणार्याला अनेक दान केल्याचे पुण्य लाभत असते. त्या राजाला अग्निश्तोम यज्ञ, अतिरत्र यज्ञ केल्याचे भाग्य लाभते. उन्हाळात भरपूर पाणी असलेल्या तलावाच्या धन्याला अश्वयज्ञ केल्याचे पुण्य मिळत असते. ज्याच्या तलावावर जनावरं पाणी पिण्यासाठी येतात तो स्वर्गात जातो. जो तलावात पाणी खराब करतो तो नरकात जातो. ज्याच्या तलावात कोणीही पाणी भरू शकतो तो स्वर्गात जातो. सगळ्या दानात पाण्याचे दान सर्वश्रेष्ठ असते. म्हणून तलाव बांधणे हे पुण्याचे काम असते.

आता सांगतो झाडं लावण्याबाबतचे श्रेय कोणते. त्यात येतात, वृक्ष, झुडपं, वेली, त्वक्सर, कंद हे सगळे वनस्पतीमध्ये येतात. वृक्ष लावल्याने राजाची ख्याती वाढत असते. त्यांत अनेक प्रकार असतात. ज्या प्रदेशात आहे त्या प्रदेशाची खास झाडं असतात ती लावावीत. कोणतीही वनस्पती लावण्याने तो प्रदेश प्रसन्न होतो आणि तेथील देवता तेथे रहाणार्याला मदत करू शकतात. कारण त्या देवता झाडांवर बसत असतात. विविध वनस्पती निरनिराळ्या प्रकारच्या देवतांना वस्ती करण्यासाठी योग्य असतात. त्यात पिशाच्च, पितर, यक्षदेवता, राक्षस देवता, गंधर्व देवता, वास्तु देवता अशा अनेक आहेत. त्याच्यामुळे तेथे असणार्या लोकांना मदत होत असते. कांहीं झाडं माणसाला फळं देतात त्यामुळे त्यांचा उपयोग सिद्ध होतो. म्हणून माणसाने नेहमी झांडं, झुडप, वेली, कंदमुळं लावावयाची असतात त्याच्या रहाण्याच्या जागी, राजाने त्याच्या राज्यात उपवन तयार करावयाची असतात. वेली आणि झुडपं फुलं देतात. ती पुजेसाठी उपयोगाची असतात. म्हणून राजा तलावा भोवती उपवन तयार करील आणि त्या भागातील वास्तुदेवतांची कृपा प्राप्त करेल. राजा आणि रहिवाशी त्या झाडांची निगा त्यांच्या मुलांसारखी करतील, त्यामुळे त्या परिसरात पुण्य प्रभाव वाढत जाईल. अनेक वनस्पती पवित्र होम (यज्ञ) आणि शिजवण्याच्या अग्नीसाठी उपयोगाची असतात. त्याकरता राज्यात मोठ्या प्रमाणात विविध प्रकारच्या झाडांची वन वाढवणे राजाचे एक काम असते. म्हणून तलाव खोदणे आणि झाडे लावणे हे पुण्ण्याचे काम ठरते.

अनुशासन पर्व भाग एकोणसाठावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग साठावा

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा आजोबा, तुमच्या दृष्टीने कोणती भेट सर्वात मौल्यवान असते वेदातील दिलेल्या भेटीपेक्षा? मला सांगा, भेट देणारा व घेणारा त्यांच्या नंतरच्या जन्मात पुन्हा भेटतात कां"?

भिष्म सांगतात, चांगुलपणाने, माणूसकीने आणि भूतदयेने समाजात रहाणे ही सर्वात मोठी भेट कोणी कोणाला देत असतो. विशेषकरून खर्या गरजूला देणे हे जास्त महत्वाचे असते. सत्पात्र ते झाला पाहिजे व गोदान, भूदान, सुवर्ण दान ही पापाचे नाश करणारी आहेत असें समजले जाते जर ती ब्राह्मणाला केली असतील तर. अशी दान (भेटी) केल्याने मोठी अरिष्टे टळतात. सत्पात्र ते होणे मात्र जरूरीचे आहे. अपात्र दान त्याउलट पाप कारक समजले जाते. जो इतरांचे भले करत असतो त्याचे भले यथाक्रम होणार असते. ह्या नाहीतर नंतरच्या जन्मात ते होत असते. जशास तसे ह्या न्यायाने ते होत असते. चांगले कोणाचे केले हे महत्वाचे नसते, कारण सगळे अखेरीस ब्रह्मात जात असते. म्हणजे जे चांगले केले ते ब्रह्माला मिळाले व म्हणून ते ब्रह्माकडून नंतरच्या जन्मात परत येत असते. ज्याचे भले केले तो कारणमात्र असतो. म्हणून खर्या गरजूंना मदत करण्याने भविष्यात तुम्हाला कोणी कशी मदत करेल ते सांगता येणार नाही, जसे चांगल्या कर्माच्या परतफेडीचे तेंच वाईट कर्माचेसुद्धा होत असते. जेवढ्यास तेवढे असे ते असते. चांगले करतांना त्याची परतफेड होणार आहे ह्या अपेक्षेने जे केले तो धंदा झाला त्यामुळें त्यापासून पुण्यलाभ होत नाही तरी परतफेडीच्या नियमानुसार तो चांगुलपणा त्याला त्याच्या नंतरच्या जन्मात परत मिळणार असतो. पण जर निरपेक्षपणे मदत केली असेल तर त्याचे द्विगुणीत फायदे असतात कारण त्यात पुण्यसुद्धा मिळून मदत करणार्याची अध्यात्मिक शक्ती वाढत असते. तो मोठा फायदा होत असतो. फक्त मदत सत्पात्र होत आहे त्याची दक्षता बाळगावयाची असते. म्हणून कधीही मदत करतांना निरपेक्षपणे ती करावी असे ऋषी सांगतात. अपात्र दान केल्याने पाप लागत असल्यामुळे त्याबद्दल विशेष दक्षता बाळगली पाहिजे. दानं करतांना ती पितरांच्या नांवाने करावीत अथवा देवतेच्या

नांवाने करावीत म्हणजे त्याच्या लक्षात ते रहाते त्याचा जास्त फायदा होतो. अशा दानाने ते पितर, दैवतं दान करणार्याचे उतराई रहातात. म्हणजे ते यथावकाश त्याची परतफेड कशातरी चांगल्या फळांनी करत असतात. ते नेमके कसे, ते मात्र सांगता येणार नाही. ज्याला मदतीची गरज नाही अशांना ती करणे हे अपात्र दान ठरते. जे सदोष आहेत अशांना दान करणे हे अपात्र दान ठरते. ज्या दानाचा गैरवापर होणार आहे ते अपात्र दान असते. अशी अपात्र दानं करू नयेत. तुझ्यावर उपकार करणार्याला (मदत करणारा) तू दान केलेस तर ते सत्पात्र दान असेल. ज्याला मदतीची खरोखरच गरज आहे व तुझ्याकडून तशी अपेक्षा करत आहे त्याला देणे हे सत्पात्र दान असते. जो दान घेतल्यावर तुझा मित्र बनतो ते दान सत्पात्र समजावे. जो मदतीची परतफेड करण्याचा प्रयत्न करतो त्याला दान करणे सत्पात्र दान समजावे. जो कृतज्ञ आहे त्याला मदत केली तर ती सत्पात्र झाली असे समज. जो कृतघ्न आहे त्याला मदत करणे हे अपात्र दान समजावे.

अरे युधिष्ठीरा, मी ब्राह्मणांना नेहमी दानं केली कारण ते सत्पात्र होते. त्यामुळे मला फार समाधान आहे कीं मी त्या ब्राह्मणांना दान करत आलो आहे ज्यामुळे मी त्या लोकांत जाणार आहे जेथे ब्राह्मण स्वतः जातात, माझ्या मृत्यूनंतर.

अनुशासन पर्व भाग साठावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकसष्ठावा

युधिष्ठीर पुढे विचारतात, "मला सांगा दोन ब्राह्मणांपैकी कोणता दानासाठी योग्य असतो एक दानाची अपेक्षा करत नाही आणि दुसरा अपेक्षा करतो. बाकीच्या गुणात ते दोघे सारखेच आहेत असे समजा".

भिष्म सांगतात, "असे सांगतात ज्ञानी लोक कीं, जो अपेक्षा करत नाही त्याला दान करणे जास्त श्रेयस्कर असते. समाधानी मनुष्य दानासाठी जास्त योग्य असे मला वाटते. ब्राह्मणांमध्ये जे अभिमानी असतात ते दानाची अपेक्षा करत नाहीत. म्हणजे त्याना गरज नसते असे समजणे योग्य नसते. केवळ तो अभिमानी आहे म्हणून मागत नाही असा ब्राह्मण दानासाठी जास्त योग्य असें मी समजतो. क्षत्रिय दान करतो त्या मागे त्याचा सुद्धा एक मतलब असतो तो साध्य व्हावा असे असेल तर तशा ब्राह्मणाला दान करावे. बर्याच वेळा गरज नसतांना सुद्धा लोभापोटी कांहीं ब्राह्मण दानाची अपेक्षा करत असतात तशांना दान करणे निरर्थक असते. म्हणून कां मागत नाही व कां मागतो ते तपासून त्याच्या निर्णया वरून ठरवावयाचे असते. जे दान भूतदयेपोटी केले त्यात मोठे पुण्य असते मग ते कोणाला केले ते महत्वाचे नसते. ते पंचव्रताचा भाग असते. जे स्वाभिमानापोटी दान अपेक्षित नाहीत त्यांना मुद्दाम बोलावून दानं, मदत करावयाची असते. त्यामुळे ब्रह्माची सेवा केल्याचे भाग्य लाभते. दान आपल्याला मिळेल कां नाही ह्या शंकेमुळे बहुधा स्वाभिमानी याचक पुढे होत नाही. परंतु, हावरट ब्राह्मण लोचटासारखा दानं सतत मागत असतात. त्यांना न देता शोधून काढून सत्पात्र दान करण्यात सूज्ञपणा असतो. चांगले पुण्य दाना मार्फत मिळवावयाचे असेल तर नेहमी लायक भिक्षेकरी शोधत असले पाहिजे. ब्राह्मणाला तीन दिवसापेक्षा जास्तचे साठवता येत नसल्याने तसे व्रतस्थ ब्राह्मण नेहमीच लायक असतात दान करण्यासाठी. जे ब्राह्मण तो तीन दिवसाचा नियम पाळत नाहीत त्याना दान करण्याची आवश्यकता नसते कारण त्यांच्या कडे भरपूर भिक्षा साठवलेली असते. दान करणार्याला दान घेणार्याची तपासणी करण्याचा हक्क असतो. त्या चाचणीतून योग्यता सिद्ध झाली कीं, मगच त्या लायक ब्राह्मणाना दानं करावीत ज्यामुळे तुला पुण्य

प्राप्त होईल. चाचणी करतांना त्यांचा अवमान होणार नाही ह्याची दक्षता दात्याने बाळगावयाची असते. नाहीतर पाप लागण्याचा धोका असतो. ब्राह्मणांना दान करतांना त्याच्या बद्दलच्या सन्मानाची भावना असणे जरूरीचे असते. मेहरबानी केल्याचा अविर्भाव त्यामध्ये असणे पापकारक ठरते. अन्नदान करावयाचे असल्यास ते सगळ्या कुटूंबासाठी करावयाचे असते केवळ त्या ब्राह्मणाला देऊन चालणार नाही. जर ब्रह्मचारी असेल तर त्याला तीन पवित्र अग्नी पेटवल्याचे भाग्य लाभते. गृहस्थाकडे दान देण्याचा विधी असेल तर तो दुपारी करावा. ब्राह्मणांना जेवू खावू घालून त्यानंतर गोदान करावे सोने द्यावे, वस्त्र द्यावे. अशारितीने ब्राह्मणांना संतुष्ट केलेस तर इंद्र तुझ्यावर प्रसन्न होईल. तुझा तिसरा यज्ञ होईल ज्यामध्ये तू देवता, पितर आणि ब्राह्मणांना अर्घ्य देऊन त्याची पुजा करशिल. त्यामुळे विश्वदेव तुझ्यावर प्रसन्न होतील. सर्व प्राण्याबद्दल अनुकंपा असणे हे मोठे दान समजले जाते कारण त्यात तू तुझ्यातील मद, मत्सर, अहंकार ह्यांचे दान केल्यासारखे असते. दान केलेल्या गोष्टी परत घ्यावयाच्या नसतात त्याप्रमाणे भूतदयेने जे मद, मत्सर आणि अहंकाराचे दान तू महादेवाला करतोस त्यामुळे त्या दोषांचा तुला पुन्हा अंगिकार करता येत नाही. त्या दाना सारखे दान नसते. त्या दानानंतर कोणी भूतदया सोडली तर ते महत्पाप ठरते. दानं करणारा त्याग बुद्धीने ते करत असला पाहिजे त्यातून कांहीं मिळवण्याचा त्याचा उद्देश असेल तर ते दान व्यर्थ गेले असे समजावे. अरे पंडूपुत्रा, असें दानयज्ञ तू नेहमी करत रहा. येथे दान हा शब्द भीक देणे, ह्या अर्थी समजावा. कारण त्या देण्याच्या बदल्यात दाता चांगुलपणा शिवाय कांहीं अपेक्षा करत नसतो.

अनुशासन पर्व भाग एकसष्ठावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग बासष्ठावा

युधिष्ठीर पुढे बोलतो, "दान, त्याग व यज्ञ ह्या सत्कृत्यांची फळं केव्हां मिळतात? ह्या जन्मी कां नंतरच्या जीवनात, त्याबद्दल कोणते नियम आहेत? ते सांगा. त्यातील जास्त प्रभावी कोणते आहेत? कोणाला दान केल्याने जास्त चांगले परिणाम अनुभवास येतात? कशारितीने ते केले तर चांगले असते? त्यासाठी कोणता समय उत्तम असतो? दान अथवा त्याग करण्याचे काम कोणत्या ठिकाणावरून केले तर ते जास्त परिणामकारक असते? अशा सगळ्या दान आणि त्यागाच्या संदर्भात माझ्या शंका आहेत त्यांचे निरसन आपण करावे कारण, आपल्या इतका सूज्ञ कोणी नाही ह्या विषयांवर अधिकारवाणीने बोलू शकेल असा".

भिष्म सांगतात, "अरे पंडुपुत्रा, क्षत्रिय बहुधा क्रौर्याचे काम करण्यासाठी असतात. म्हणून त्यांच्या त्या पापकर्माचे निरसन करण्यासाठी त्यांनी दानं करणे त्यांच्या अध्यात्मिक उद्धारासाठी जरूरीचे असते. त्या कृत्यामुळे ते क्रूर नसून केवळ कर्तव्याच्या अनुषंगात ते तसे क्रूर होत असतात हे त्यांना दाखवण्याची संधी असते. त्यासाठी ब्राह्मणांबरोबर इतर वर्णाच्या लोकांना विशेषकरून शुद्राना सुद्धा दानं करून क्षत्रिय त्यांच्या पापाचे क्षालन करत असतात. त्यातून ते चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया हे तीन जे पंचव्रतात आहेत त्याचे पालन करतात असे ब्रह्माला दाखवत असतात. त्यासाठी राजे मोठे यज्ञ करून त्याद्वारा मोठी दानं आणि त्याग कर्मे दक्षिणेच्या रुपात करून ते सिद्ध करत असतात. त्यातून त्यांचा सदाचार व्यक्त होत असतो. मी क्रूर नाही मी कृपाळू सुद्धा असतो हे त्या दक्षिणांच्या माध्यमातून प्रजेला व देवतांना दाखवत असतात. जर समाजातील सदाचारी लोक त्या दानांचा स्वीकार करतात तर ते लोकांनी मान्य केले असे होईल व जर लोक राजाची तशी दिखाऊ दानं स्वीकारत नाहीत तर मात्र राजाला त्याच्या वागणूकीचा पुनर्विचार करावा लागतो. ती दानं व ती त्यागवृत्ती जनता मान्य करत असेल तर राजाच्या त्या क्रूरतेच्या पाप कर्मातून त्याची सुटका होते असे ऋषी सांगतात. त्याकरता राज्यातील

सदाचारी ब्राह्मणांच्या सद्बुद्धीची सुद्धा परीक्षा ब्राह्मदेव करत असतो. जर ब्राह्मणांनी राजाच्या पापकर्माला सूट दिली तर त्यामुळे ते ब्राह्मणसुद्धा राजाच्या पापात सामील आहेत असे समजले जाते. दान देणं हा एक प्रकारचा यज्ञ असतो. त्यामुळें ज्या ब्राह्मणांना तू दानं करशिल त्यांनी केलेल्या यज्ञात तुला हिस्सा मिळतो हा मोठा फायदा असतो. म्हणून यज्ञ करणार्या ब्राह्मणांना तू नेहमी दान करत असशील. सदाचारामुळें एकंदर चांगुलपणा वाढत असतो. त्यामुळें त्या समाजाची अध्यात्मिक क्षमता वृद्धींगत होत असते. तसे झाले कीं, त्या समाजाच्या वर अस्मानी संकटं येण्याची शक्यता कमी होते. केवळ दुर्दैवाने जे ब्राह्मण त्यांची योग्यता असूनही दरिद्री असतात त्यांना तू शोधून काढून मदत करशिल, भीक देशिल, तसे केलेस तर तुला जास्त फायदा होईल. राजसूय यज्ञापेक्षा त्या सत्कर्मामुळें तुला जास्त फायदा होईल. असे सगळे केलेस तर तू स्वर्गात जाशिल. जो राजा त्याच्या खजिन्याचा उपयोग त्याच्या प्रजेच्या भल्यासाठी करतो तो अधिक समृद्ध होतो. प्रजेच्या भल्यासाठी राजा खजिना खर्च करतो तेसुद्धा एका प्रकारे त्याग आणि दान असते. त्यामुळें जर सदाचार वाढत असेल तर ते मोठे पुण्यकर्म असते. ब्राह्मण श्रीमंत झाला कीं, तो त्याला व समाजाला घातक होऊ शकतो. असा ब्राह्मण राज्याला आणि राजाला सुद्धा घातक होऊ शकतो. अतिसमृद्धी नाशास कारणीभूत असते त्याचा अनुभव राजास अशा ब्राह्मणांच्या वागण्यांने येत असतो. यज्ञ करतांना अशा श्रीमंत ब्राह्मणांना काम देऊ नकोस. स्त्रियां व अबालवृद्धांच्या संपत्तीचे संरक्षण करणे ह्यात सुद्धा दानाचे श्रेय आहे. राजाने ते आवर्जून करावे. त्यामुळें अश्वयज्ञ केल्याचे भाग्य लाभते. राजा परिस्थितीमुळे एकट्या जगणार्या सज्जन बायकांच्यावर कोणताही कर लावणार नाही. अशा प्रजेवर कर लावणे हे दान आणि त्याग ह्यांच्या विरुद्ध कर्म आहे म्हणून ते तू करू नकोस. प्रजेला सुरक्षा देणे हे यज्ञ करण्यापेक्षा जास्त मोठे कार्य असते. राज्यात लहान मुल, वृद्ध, गरीब उपाशी असतील तर ते दान करण्याच्या विरुद्ध असते म्हणून कोणी उपाशी रहाणार नाही असे पहा. त्यात दानाचे पुण्य असते. राजा सिवा एकदा म्हणाला होता, ज्या राजाच्या राज्यात लोक उपाशी रहातात तो नरकात जातो त्याचे सगळे यज्ञ व्यर्थ असतात. अशा राजाला त्याची जनता ठार मारील तर त्यात त्या प्रजेला पुण्य प्राप्त होते. मनू सांगतो, जो राजा त्याच्या प्रजेचे संरक्षण करतो व त्याच्या राज्यातील प्रजा

सुखी असेल तर त्या प्रजेने जे पुण्य कमावले असेल पवित्र जीवन जगून त्याचा सहावा भाग त्या राजाला मिळतो. त्याच प्रमाणे जनतेच्या पापाचासुद्धा सहावा भाग राजाला भोगावा लागत असतो. त्याचा क्षालनासाठी राजा योग्य ब्राह्मणांना दानं करत असतो त्या दानात वेगळा व्यवहार असतो.

युधिष्ठीरा, तू अशारितीने राज्य कर कीं, तुझ्या राज्यात सगळे येण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे तुझी किर्ती होईल. तेथे देवतासुद्धा येतील. तुझ्या राज्यातील वृक्षांवर ते येऊन रहातील. राक्षस जसे कुबेराच्या राज्यात येतात व शांतपणे रहातात जेथे सत्पात्र दानं होत असतात. जेथे इंद्र सुद्धा येतो असे राज्य तू करशिल तर तुझे व तुझ्या पूर्वजांचे कल्याण होईल.

अनुशासन पर्व भाग बासष्ठावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग त्रेसष्ठावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "श्रृतीमध्ये दिले आहे कीं, हे दान केले आणि आता हे दान केले, असे बोलत विविध दानं करण्याचे त्यागसत्र चालू असते. राजानी निरनिराळ्या लोकांना विविध प्रकारची दानं करावयाची असतात. मला सांगा, त्यातील कोणते दान उत्तम परिणाम साध्य करणारे असते"?

भिष्म सांगतात, सगळ्या दानात पृथ्वीचे दान (भूदान) सर्वश्रेष्ठ समजले जाते. पृथ्वी स्थायी आणि अनश्वर असते. ती तिच्या मालकाला बर्याच गोष्टी देत असते. तिच्यातून जे सगळे मिळवता येते जे माणसाला सुखाने जगण्यासाठी आवश्यक असते. अन्न धान्यापासून कपडे, दागदागिने, रहाण्याची घरं त्याशिवाय चैनीच्या चीजा असे सगळे पृथ्वी देत असते जेव्हां तिच्यावर योग्य प्रकारे मनुष्य कष्ट करतो. म्हणून त्यापेक्षा श्रेष्ठ दान नाही. अरे युधिष्ठीरा, माणसाची समृद्धी त्या जमिनीवर अवलंबून असते. पृथ्वी समृद्धीची देवता आहे. जो तिला सांभाळतो तो तिचे दान ब्राह्मणाला दक्षिणा म्हणून करतो तो त्याच्या पुढच्या जन्मी मोठा जमिनदार म्हणून जन्म असतो. आधीच्या जन्मात जी दानं केली त्याच्या प्रमाणात त्याला ह्या जन्मी संपत्तीचे सुख मिळत असते, असें शास्त्र सांगते. क्षत्रिय पृथ्वीचे दान करेल अथवा युद्धात लढत मरण स्वीकारतो. अशा दोन गोष्टीनेंच त्याचे कल्याण होत असते. भूदानाने ब्रह्महत्त्येचे पातक सुद्धा धुतले जाते असें श्रृती सांगते. थोडक्यात कोणत्याही भयंकर पापाचे क्षालन भूदानाने होत असते. खरे ब्राह्मण पापी राजाकडून फक्त भूदान स्वीकारत असतात. त्यामुळे त्या पापी राजाची पापं धुतली जातात. म्हणून पृथ्वीचा उल्लेख ब्राह्मण प्रियदत्ता म्हणून करत असतात. ज्ञानी ब्राह्मणाला भूदान करून नंतर राजे युद्धाला जातात म्हणजे त्यांची त्या युद्धात जीत होते असे समजले जाते. ज्ञानी ब्राह्मण राजाने दिलेल्या जमिनीत रहात असल्यामुळें ते राजाला त्यांच्या सिद्धीने त्याच्य कारभारत मदत करण्यास बांधले जातात. जे राजे त्यांच्या कामाच्या निमित्ताने अनेक पापकृत्य करतात त्यांनी नेहमी भूदानं करावयाची असतात. अश्वयज्ञ कराणारा आणि भूदान करणारा एक समान समजले जातात. जाणकार समजतात कीं,

भूदानाच्या योग्यतेचे कर्म नाही जे माणसाला त्याच्या पापांपासून वाचवू शकेल. सुवर्ण दान, कपड्याचे दान, रत्न दान, वेदाचे पठण, यज्ञ करणे, लोभ मोह सोडणे, ज्येष्ठांचा सन्मान करणे अशा कितीतरी पुण्य कर्मापेक्षा भूदान सरस असते. भूदान करण्याने जे पुण्य प्राप्त होते ते युद्धात मरण्याने मिळणार्या पुण्यापेक्षा जास्त असते. भूदान करणार्याला मृत्यू, वैकींकर, दंड, तम आणि अग्नी स्पर्श करत नाहीत. तसा मनुष्य त्याच्या पितरांना मुक्त करत असतो. भूदान एक यज्ञ करण्यासारखे असते. जो मनुष्य तयार पीक असलेली जमीन ब्राह्मणाला देतो त्याच्या सगळ्या इच्छा पूर्ण होत असतात. अग्नी सांभाळणार्या व्रतस्थ ब्राह्मणाला भूदान करण्याने कधी कोठल्याही अडचणीत येत नाही. ह्या प्राचीन समजूती मानणारा जमदाग्नीचा मुलगा पृथ्वीचे दान करतो काश्यपाला. त्यात पृथ्वी भार्गवाला सांगते कीं, माझे दान करून तू मला पुन्हा प्राप्त करत असतोस. ह्या जन्मात ज्याचे दान करतो ते पुढच्या जन्मी परत येत असते. जो ब्राह्मण श्राद्धात हे वेदातील वचन गातो त्याला मोठे श्रेय प्राप्त होत असते. दुसर्याचे नुकसान करणारा जर भूदान करत असेल तर त्या पापापासून तो मुक्त होतो. भूदान करणारा त्याच्या आधीच्या व नंतरच्या दहा पिढ्यांचे कल्याण करत असतो, त्यांचा उद्धार करत असतो. पृथ्वी एक पंचमहाभूत आहे. सगळ्या जीवांचे मूळ आहे. राजाचा राज्याभिषेक करतांना त्याला हे सांगावयाचे असते कीं, तो कधी सदाचारी लोकांची जमीन त्यांच्या कडून कढून घेणार नाही. राजाला सांगितले जाते कीं, तो जे राज्य सांभाळत आहे ते ब्राह्मणाच्या मालकीचे असते. तो फक्त सांभाळणारा आहे. राज्याच्या सुखासाठी राजा तत्वनीष्ठ, पंचव्रताचे पालन करणारा असेल. राजाचे काम पृथ्वीचे संरक्षण करण्याचे असते. अनाचारी लोकांपासून तो पृथ्वीला संरक्षण देईल. अशी बंधन घालून त्याचा राज्याभिषेक केला जातो. ज्या प्रजेला असा राजा मिळाला ती सुखाने झोपत असते व त्यांची कर्तव्ये करत असते. वाईट राजाच्या कडून पृथ्वी काढून घेऊन चांगल्या लोकांचे संरक्षण करतो तो राजा धन्य असतो. जेथे जमीन चांगल्या प्रकारे पिकवली जाते त्या जमिनीच्या मालकावर आदित्य, वरूण, विष्णू, ब्रह्म, सोम, हुताशनि आणि महादेव कृपा करतात. पृथ्वी सगळ्या प्राणिमात्रांची मायबाप आहे. तिच्या शिवाय त्यांचे अस्तित्व शक्य नसते. सर्व महाभूतात पृथ्वी श्रेष्ठ असते हे सांगणारा एक संवाद फार पूर्वी बृहस्पति आणि इंद्र ह्यांच्यामध्ये झाला होता. त्यावेळी इंद्र त्याच्या

प्रत्येक यज्ञात दक्षिणा देत असतांना विष्णूची स्तुती करत असे. त्यावेळी मेघावत बृहस्पतिला विचारतो, "अहो ज्ञानी, कोणत्या दानाने मी स्वर्गात येऊ शकतो आणि मोठे सामर्थ्य प्राप्त करू शकतो ते मला सांगा".

भिष्म पुढे सांगतात, समृद्ध, पवित्र, गुणवान अशी तयार झालेली पृथ्वी जो सदाचारी ब्राह्मणाला देतो त्याला स्वर्गात कायम स्थान मिळते. अनेक पाप केलेला जर त्याची सुपीक जमीन ब्राह्मणांना देत असेल तर त्याची सगळी पाप धुतली जातात. कारण त्या दानाबरोबर ब्राह्मण त्या पापाचा सुद्धा ग्राहक झालेला असतो. पुढे तो ब्राह्मण तपस्या, यज्ञ वगैरे करून त्यातून मुक्त होईल अशी अपेक्षा असते. भूदानाने जे श्रेय प्राप्त होते ते अग्नीश्तोम यज्ञानेसुद्धा मिळत नाही. जो ब्राह्मणाकडून सुपीक जमीन काढून घेतो त्याचे आधीचे व नंतरचे असे दहा पिढ्या बरबाद होतात. त्याचे पाप त्याला लागते. सदाचारी ब्राह्मणाला भूदान करण्याचे आश्वासन देतो परंतु, ते पाळत नाही तो नरकात खितपत पडतो. परंतु, यज्ञ करणार्या व्रतस्थ ब्राह्मणाला भूदान करतो त्याला यमदूत त्रास देत नाहीत. सुपीक आणि खनिजांनी भरलेली जमीन जो राजा दान करतो ब्राह्मणांना तो भूयज्ञ करत असतो. त्यामुळें सगळी पापं धुतली जातात व तो कायम स्वर्गात रहातो. युद्धात शत्रूला तोंड देत माघार न घेता जे लढतात ते क्षत्रिय स्वर्गात जातात तेथे त्यांचे दैवी फुलांनी स्वागत केले जाते. गंधर्व आणि अप्सरा त्यांचे मनोरंजन करतात. त्यानंतर ते ब्रह्मलोकात जातात. भूदान करणार्याचे स्वर्गातील स्थान निश्चित असते. मातेची सेवा करणे आणि पृथ्वीची सेवा करणे सारखेच श्रेयस्कर असते.

भिष्म पुढे सांगतात, ते बृहस्पतीचे ऐकून इंद्र पृथ्वीचे दान करतो. हे आख्यान ज्यात पृथ्वीचे महात्म्य वर्णिले आहे, श्राद्धात गातो, त्याना राक्षस, असुर त्रास देऊ शकत नाहीत. त्याशिवाय पितर संतुष्ट होतात ते आणखीन चांगले होत असते. म्हणून श्राद्धात हे आख्यान शहाणे आवर्जून गातात. त्याचे त्यांना फायदे मिळतात. अशाप्रकारे मी श्रेष्ठ दानाची महति तुला सांगितली आहे. आणखीन काय मी तुला सांगू ते बोल.

अनुशासन पर्व भाग त्रेसष्ठाला संपला.

# अनुशासन पर्व
# भाग चौसष्ठावा

युधिष्ठीर पुढे विचारतात, "जेव्हां राजाला दानं करण्याची इच्छा होते, त्यांने सिद्ध ब्राह्मणांना कोणती दान करावीत ते सांगा. ज्यामुळे ते सिद्ध ब्राह्मण लगेचच संतुष्ट होतील. ते कोणता वर राजाला देण्याची शक्यता असते? मला दानांची आणखीन काय महति असते ते सांगा. देवतेला दिलेला कोणता प्रसाद ह्या आणि नंतरच्या जीवनात जास्त उपयोगाचा असतो ते सांगा".

भिष्म पुढे सांगतात, हांच प्रश्न एकदा नारदांना मी विचारला होता. ते काय सांगत होते ते तुला आता सांगतो. नारद बोलले, देवता आणि ऋषी खाण्याचे प्रसाद जास्त पसंत करतात. सृष्टीचे सगळे व्यवहार आणि बुद्धीची क्षमता ह्यागोष्टी अन्नाशी निगडीत असतात. भोजनासारखा प्रसाद नसतो. म्हणून मनुष्य नेहमी खाद्यपदार्थांचा प्रसाद देवांना चढवत असतो. ऐहिक जगात अन्न सगळ्या जोमाचे कारण असते. जीवन खाण्यावर अवलंबून असते. सगळे चार वर्णाचे आणि आश्रमाचे लोक भोजनावर विसंबून असतात. प्राण अन्नावर अवलंबून असतो. हे त्रिवार सत्य आहे. म्हणून तुला समृद्धी हवी असेल तर तू भोजनाचे दान ब्राह्मणांना केले पाहिजेस. ब्राह्मण जेवला म्हणजे देव जेवला असे समजतात. अशारितीने सत्पात्र ब्राह्मणाला जो जेवण देतो त्याला पुढच्या जन्मी समृद्धी प्राप्त होत असते. त्यासाठी घोर तपस्या करणारे ब्राह्मण निवडावयाचे असतात. गृहस्थ थकलेल्या म्हातार्या वाटसरूला मोठ्या आदराने (त्यात महादेव आहे असे मानून) घरी नेऊन जेवू घालेल तर त्याचा संसार जास्त सुखाचा होईल. त्याची मुलं बाळ त्याची काळजी करतील त्याच्या म्हातारपणी. असे ऋषी सांगतात. पंचव्रताचे पालन करणारा गृहस्थ जर अन्नदान गरजूना करत असेल तर त्याचा उत्कर्ष होतो. गृहस्थाने त्याच्या दारात येणार्या भुकेलेल्याला जेवण द्यावे म्हणजे त्याच्या संसारातील अडचणी कमी होतात. मुक्या प्राण्यांना त्यांचा अपमान न करता खाणे द्यावे त्यामुळें तुमच्या वर येणारी अस्मानी संकटं कमी होतात. ती सुसह्य होतात. अपमान न करणे म्हणजे सन्मानाचे दान करण्यासारखे

असते. सत्पात्र ब्राह्मणाला अन्न दिल्याने पुण्य वाढते (अध्यात्मिक शक्ती वाढते) शुद्राला दिल्याने जीवनात सुख वाढते. लहान मुलांना अन्न दिल्याने उत्तम संतति प्राप्त होते पुढच्या जन्मी. शेती करणारा वैश्य अन्नदान करतो तेव्हां त्याच्या शेतात पीक जास्त येते. पाऊस पाणी चांगले होते. पिकावर रोग पडत नाहीत. पशू पक्षी अन्नदानाने शेतकऱ्याला आशिर्वाद देतात. त्यामुळे त्याची शेती सुधारते. माणसाचे पुर्वज त्याच्या कडून दान अपेक्षित असतात. ते श्राद्धाच्या निमित्ताने करावयाचे असते. जे दान न मांगता दिले ते उच्चप्रतिचे दान समजले जाते. मागितल्या नंतर जे दिले त्याला भीक म्हणतात. ते नीच प्रकारचे दान असते. देवाची पुजा म्हणून केलेले दान आणि कांहीं अपेक्षेने केलेले दान ह्यात पुजेचे दान श्रेष्ठ असते. मिठाईचे दान करणारा देवतांच्याकडून गौरविला जातो. अन्न दान केल्यानंतर त्या दान घेणार्याचा अपमान केल्याने दान करणारा खात्रीने नरकात जातो. अन्न देणे ही ब्रह्माची सेवा असे समजणारे ब्रह्मलोकात जातात. अन्न नसेल तर कांहींच नसते. जीवनाचा आधार अन्न असते. पंचमहाभूतांच्या विविध कृत्यांमुळें पृथ्वी (एक महाभूत) अन्न देते मांसाहार, शाकाहार अशा विविध रुपात. त्यातून विविध जीव पोसले जातात आणि सजीव सृष्टी व्यक्त होते.

भिष्म पुढे सांगतात, असे नारद सांगत होते मला, त्याप्रमाणे कोणतीही अपेक्षा न ठेवता तू अन्नदान करत रहा. ते कधीच व्यर्थ जाणार नाही. स्वताच्या आणि इतरांच्या सुखासाठी अरे पंडूपुत्रा, तू नेहमी अन्नदान करत रहा. त्यामुळे तुझे हे आणि नंतरचे जन्म सुखात जातील. तुला कशाचीही कमी रहाणार नाही.

अनुशासन पर्व भाग चौसष्ठावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग पासष्ठावा

युधिष्ठीर विचारतो, "मी अन्नदानाबद्दलचे संकेत काय आहेत ते समजलो. आता मला सांगा, दान करण्यासाठी काळ–वेळ–मुहूर्त, ह्यांचे कांही संकेत असतील तर ते मला समजून घ्यावयाचे आहेत".

भिष्म सांगतात, "ह्या बाबतीत मी एक प्राचीन कथा तुला सांगणार आहे. त्यात देवकी आणि नारद ह्यांच्यात एक संभाषण झाले होते ते सांगतो. एकदा नारद मुनी जे सगळे जाणत होते द्वारकेला गेले होते. देवकी नारदांना ह्याबद्दल विचारत होती. त्यावेळी नारदांनी काय सांगितले, ते मी तुला आता सांगतो".

नारद सांगतात, पायस (भात, साखर आणि दूध ह्याची खीर) तूप घालून तयार केलेली कृत्तिका नक्षत्रात जर सत्पात्र ब्राह्मणाला खाण्यास वाढली तर मोठा लाभ होतो. रोहिणी नक्षत्री जर तेंच केले तर ब्राह्मणांच्या ऋणातून तो मुक्त होतो. पायसाबरोबर इतर योग्य खाद्य आणि पेये द्यावीत तशा ब्राह्मणांना. मृगशिरस (सोमदैवत) नक्षत्री गाय वासरासह देण्याने दाता स्वर्गात निश्चितपणे जातो. अहो देवकी, भाताचे लाडू व इतर साजेसे खाद्य पदार्थ पुनर्वसू नक्षत्री ब्राह्मणाला दान केल्याने तो पुढच्या जन्मी फार देखणा जन्मतो आणि असा परिवारात निपजतो जेथे कशाचीच कमी नाही. पुश्य नक्षत्रावर सोन्याचे दागिने दान केल्याने सोमासारखा तेजस्वी निपजतो त्याच्या पुढच्या आयुष्यात. आश्लेषा नक्षत्रावर चांदीचे दान केल्याने तो धिरोदत्त आणि यशस्वी होतो. मघा नक्षत्रावर मातीची भांडी, मडकी, वर्धमान (भाजलेले मातीचे पसरट भांडं), सर्वर ( भाजलेले मातीची बशी), तीळ भरून ह्यांचे दान केल्याने त्याला चांगली मुलं होतात व त्याच्याकडे पशूधन वाढते पुढच्या जन्मी. पूर्वा फाल्गुनी नक्षत्रावर ब्राह्मणाला उसाचा रस आटवून तयार केलेले स्वादिष्ट फनिता इतर खाद्यपदार्थां बरोबर दान केल्याने त्यावेळी तो स्वतः मात्र उपवास करत असला पाहिजे, त्याला ह्या आणि पुढच्या जन्मी समृद्धी प्राप्त होते. उत्तरा फाल्गुनी नक्षत्रावर शस्थिका (तूप, दूध, भात ह्यांची खीर) दान केल्याने त्याला स्वर्गात मोठे स्थान मिळते. उत्तरा फाल्गुनीत दिलेले दान फार चांगले फळं देते. हस्त नक्षत्रावर उपवास करून

जो वाहन, घोडा, उंट, असे दान करतो ब्राह्मणाला तो त्याच्या नंतरच्या आयुष्यात संपन्न होतो. त्याच्या सगळ्या इच्छा पूर्ण होतात. चित्रा नक्षत्रावर जो बैलाचे आणि सुगंधी अत्तराचे दान करतो त्याला मृत्यूनंतर अप्सरात खेळावयाला मिळते. तो नंदनवनात रहातो. स्वाती नक्षत्रावर संपत्तीचे दान केल्याने तो नंतरच्या जीवनात उच्च कोटीचे सुख प्राप्त करत असतो. विषाखा नक्षत्रावर दुभती गाय आणि बैल ह्यांचे दान केल्याने पितर शांत होतात. असे दान करणारा स्वर्गात जातो. ब्राह्मणांना दान केल्याने दाता नेहमी सुखी होतो. त्याला नरकात जावे लागत नाही. असे स्मृती सांगते. अनुराधा नक्षत्रावर मौल्यवान वस्त्रांचे दान केल्याने तो स्वर्गात शंभर युग रहातो. ज्येष्ठा नक्षत्रावर कलसक नांवाची भाजी दान केल्याने त्याचे मृत्यूनंतरचे जीवन सुखात जाते. आत्मसंयमन करून मुळा नक्षत्रावर फळं आणि कंदमुळं ह्याचे दान करावे त्यामुळे पितर संतुष्ट होतात. पूर्वाषाढ नक्षत्रावर वेदशास्त्र संपन्न ब्राह्मणाला दही भरलेला हंडा दान करावा, दाता त्या काळात उपवास करत असला पाहिजे, तो त्याच्या पुढच्या जन्मी अशा घरात जन्म घेतो जेथे पुष्कळ पशूधन आहे. नक्षत्र उत्तराषाढ असताना जो जवसाची पेज, तूप आणि उसाचा आटवलेला रस असे हंडी भरून ब्राह्मणाला दान करतो त्याच्या सगळ्या कामना पुढच्या जन्मी पूर्ण होतात. अभिजित नक्षत्रावर दूध, मध आणि तूप असे सदाचारी ब्राह्मणाला दान केल्याने त्याला स्वर्गात फार मानमरातब मिळतात. श्रावणात (पावसाळ्यात) मोठ्या घोंगड्या दान कराव्यात त्यामुळे तो उच्च लोकात जातो. धनिष्ठा नक्षत्रावर वाहन, मौल्यवान कपडे असे दान केल्याने तो निश्चितपणे स्वर्गात जातो. सत्भिषा नक्षत्रावर सर्वप्रकारची सुगंधी अत्तरं द्यावयाची असतात. त्यामुळे मृत्यूनंतर तो थेट अप्सराच्या लोकात जाऊन पडतो. पूर्वाभाद्रपदा नक्षत्रावर राजमा ह्या कडधान्याचे (Vinga sinensis, syn. Dihchcos sintnsis Linn.) दान करावयाचे असते. त्यामुळे त्याचे त्या जगातील जगणे सुखरुप होते. पुढच्या जन्मात तो अशा घरात जन्म घेता जेथे सुबत्ता आहे. उत्तरा नक्षत्रावर ब्राह्मणाला मांसाची सागुती असलेले जेवण द्यावयाचे असते त्यामुळे दात्याला अपूर्व श्रेय मिळते. रेवती नक्षत्रावर गायदान करावी. तांब्याची भांडी द्यावीत असे केल्याने दिलेले सगळे, त्याला त्याच्या पुढच्या जन्मी दुप्पटीने परत मिळते. पुढच्या जन्मीच्या त्याच्या इच्छा पूर्ण होतात. आश्विनी नत्रावर त्याने वाहनाचे दान करावयाचे असते. असे केले

म्हणजे तो दाता त्याच्या पुढच्या जन्मी अशा घरात जन्म घेतो जेथे हत्ती, घोडे, रथ अशी सगळी सुबत्ता आहे. भरणी नक्षत्रावर ब्राह्मणाला गाय किंवा तीळाने भरलेले पोते दान केल्याने पुढच्या जन्मी तो एका समृद्ध घरत जन्म घेतो.

भिष्म पुढे सांगतात, असें नारद देवकीला सांगत होते. तिने त्या बाबत प्रश्न नरदाला विचारले होते. देवकी ती माहिती नंतर इतरांना सांगत होती. तिच्या सुना (कृष्णाच्या बायका) ते ऐकत होत्या.

अनुशासन पर्व भाग पासष्ठावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग सहासष्ठावा

भिष्म पुढे सांगतात, "ब्रह्मदेवाचा मुलगा अत्री सांगतो कीं, जे सोन्याचे दान करतात ते सर्वांचेच दान करतात असे समजले जाते. राजा हरिश्चंद्र सांगत, सोन्याच्या दानाने सर्व प्रकारच्या पापांचे क्षालन होत असते. त्यामुळे पितरांचे समाधान होत असते. परंतु, मनू सांगतात कीं, पाण्याचे दान हे त्याहूनही श्रेष्ठ आहे. म्हणून जो राजा तळी, तलाव, धरणं, विहीरी असें तयार करतो ज्यात सदैव जल असते तो उच्च कोटीच्या लोकांत जातो त्याच्या मृत्यूनंतर. जर तशा जलाशयात विविध प्राणी पिण्यासाठी येत असतील तर तो जलाशय तीर्थक्षेत्र बनतो. उन्हाळ्यात जर तशा जलाशयात सगळे पाणी भरण्यासाठी येत असतील तर तो जलाशय बनवणारा त्याच्या सगळ्या पापांपासून मुक्त होतो. त्यानंतर चांगले दान आहे तुपाचे. ते औषधी सुद्धा आहे. त्याचे दान ब्राह्मणाला केल्याने दात्याला त्याच्या पुढच्या जन्मी सर्वसुख प्राप्त होतात. आश्विन महिन्यात तुपाचे दान ब्राह्मणाला केल्यास तो पुढच्या जन्मी देखणा दिसतो. त्याला राक्षसांचा त्रास होत नाही जर तो तुप घातलेले पायस ब्राह्मणाला देईल. तहानलेल्याला पाणी पाजणारा तहानेने कधीच व्याकूळ होणार नाही. ब्राह्मणाला दान केल्याने व जर तो ब्राह्मण त्याने आनंदी झाला तर त्या ब्राह्मणाचे पुण्याचा सहावा भाग दात्याला मिळतो. ब्राह्मणाला सरपण दान करणारा, थंडीत उन पांघरूण देणारा जीवनात नेहमी यशस्वी होतो. तो त्याच्या विरोधकांचा नाश करतो. अशा दात्यावर अग्नीदेवता प्रसन्न असते. ब्राह्मणाला छत्रीचे दान करणारा चांगली संतति प्राप्त करतो त्याच्या पुढच्या जन्मी. ह्या जन्मात त्याला नेत्र व्याधीचा उपद्रव होत नाही. त्याला हृदय विकार होत नाहीत ह्या जन्मात. त्याच्या अनेक ऐहीक अडचणींवर तो मात करतो. असें ऋषी शांडिल्य सांगत असतं. त्यांच्या मते रथाचे दान सर्वात उत्तम दान आहे.

अनुशासन पर्व भाग सहासष्ठावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग सदुसष्ठावा

युधिष्ठीर पुढे सांगतात, "मला सांगा, अनवाणी जाणार्या ब्राह्मणाला पादत्राणाचे दान करणार्याला कोणता लाभ होतो".

भिष्म सांगतात, त्या दात्याला त्याच्या आयुष्यात कोणतीही मोठी बाधा उत्पन्न होत नाही. त्याचे जीवन सुखकर होते. तो त्याच्या शत्रूंवर मात करतो. त्या दात्याला वाहन दिल्यासारखे श्रेय प्राप्त होत असते.

युधिष्ठीर पुढे विचारतो, "मला सांगा पुन्हा एकदा, तीळाचे दान, भूदान आणि अन्नदानाची श्रेये कोणती आहेत"?

भिष्म सांगतात, "असे सांगतात कीं, ब्रह्माने पितरांसाठी उत्तम पोषण म्हणून तीळ निर्माण केले. म्हणून असें समजतात कीं, पितरांना संतुष्ट करण्यासाठी तीळाचे दाणे वापरावयाचे असतात. माघ महिन्यात ब्राह्मणांना तीळाचे दान करण्यांने दात्याला कधीच नरकात जावे लागत नाही मग त्याचे पाप कितीही असो. जो तीळाचे दान करून पितरांचे श्राद्ध करतो त्याला सगळ्या देवतांची पुजा केल्याचे श्रेय मिळते. असें सांगतात, कीं, तीळ काश्यपमुनीच्या पायातून उत्पन्न झाले. म्हणून अन्नाच्या दानांत तीळाचे स्थान फार वरचे असते. अपस्तंभ, कंख, लिखीत आणि ऋषी गौतम हे सगळे तीळाच्या दानामुळें स्वर्गात पोहोचले विनासायास. ब्रह्मचर्य आचरण ठेवत जे ब्राह्मण तीळाचे अर्घ्य देऊन होम करतात ते प्रवृत्तीत यशस्वी होतात. एकदा फार प्राचीन काळी तूप मिळत नव्हते तेव्हां ऋषी कुशिक ह्याने त्याच्या तीन यज्ञात हवीच्या (तुपाच्या) ऐवजी तीळ दिले होते. त्याचे यज्ञ कामयाब झाले होते. तेव्हां पासून तुपाच्या ऐवजी तीळ होमात देण्याची प्रथा सुरू झाली. तीळाचे महत्व मी तुला सांगितले. पुन्हा आणखीन काय सांगतो ते ऐक, पूर्वी कधी देवतांना यज्ञ करण्याची इच्छा झाली होती. त्या ब्रह्माला विचारतात, पृथ्वीवर त्यांना यज्ञ करावयाचा आहे त्यासाठी थोडी जमीन त्याना हवी होती. त्या सांगतात ब्रह्माला की, त्यांना यज्ञासाठी जमीन मिळावी. त्या देवता त्याला सांगतात कीं, त्याना जमिनीवर एक यज्ञ करण्यासाठी जागा त्यांने द्यावी. असें विचारण्याचे कारण ज्या जमिनीवर यज्ञ

करावयाचा ती यज्ञ करणार्याच्या मालकीची असावी लागते. दुसर्याच्या जागेत केलेले यज्ञ व्यर्थ जातात. त्या देवता ब्रह्माला भूदान करण्याचे आवाहन करतात. ब्रह्मदेव त्यांना एक जमिनीचा तुकडा दान करतो. त्या देवता त्याला बोलतात कीं, आम्ही तेथे यज्ञ करू व तुला मोठी दक्षिणा सुद्धा देऊ. परंतु, ऋषीस त्याच्या जमिनीचा लोभी होता. ते होत असतांना तेथे इतर ऋषी पोहोचतात, त्यात अगस्त्य, कण्व, भृगू, अत्री, वृषकपी, असित आणि देवल होते. त्यांच्या उपस्थितीत त्या तेजस्वी देवता त्यांचा यज्ञ आरंभ करतात. ते त्यांचा यज्ञ पूर्ण करतात यथासांग हिमालयाच्या शिखरावर. त्या देवता त्यांच्या यज्ञाच्या श्रेयातील सहावा भाग ऋषींना देतात. अशारितीने दान करणार्याचे नेहमी भले होत असते. ब्राह्मणाला चांगले सुरक्षित घर दान करतो त्याला कशाचीच ददात होत नाही. त्या घरात रहाणारा ब्राह्मण वेदशास्त्र संपन्न असेल आणि उच्च कुलिन असेल तर दाता उच्च लोकात सुखाने रहातो त्याच्या मृत्यूनंतर. वैराण, नापिक जमिनीचे दान कधी करू नये. तसेंच स्मशनाच्या शेजारात असलेल्या ठिकाणची जमीन दान करू नये. ज्या जमिनीत पापाचरण करणारे लोक रहातात जेथे भूतपिशाच्च ह्यांचे वास्तव आहे अशी जमीन दान करण्यासाठी अयोग्य असते. स्वताच्या जागेत केलेले श्राद्ध पितरांचे समाधान करते. त्याच प्रमाणे वनभूमि, पहाडी प्रदेश जेथे कोणी रहात नाही, नद्यांचे तट, तीर्थक्षेत्रे अशांना कोणी मालक नसतो. अशा जमिनी ज्या ब्रह्माच्या समजल्या जातात तेथे श्राद्ध करणे उचित समजले जाते जर जमीन खरेदी करणे शक्य नसेल तर. गाई गुरं परमेश्वराची आवडती असतात म्हणून महादेव त्यांच्या सानिध्यात राहून त्याचे तप करत असतो. त्या पशूपासून माणसाला दूध, तूप, लोणी, दही, ताक, गोबर, मुत्र असे मिळते त्याचा उपयोग तो त्याच्या जीवनात करत असतो. त्याशिवाय ती जनावरं माणसाला कामात मदत करत असतात, जसे शेती करणे, ओझी वाहणे, वाहन खेंचणे त्याशिवाय ते वृद्ध झाल्यावर त्याला मारून त्याचे मांस, हाडं, शिंग आणि केस मनुष्य त्याच्या उपयोगात आणत असतो. अशारितीने हि जनावरं मनुष्याला सतत उपयोगी असतात. ते गोधन माणसाच्या जीवनाचा एक भाग आहे. त्यांच्याशिवाय मनुष्य राहू शकत नाही. म्हणून गोधन मोठी संपत्ती असें समजले जाते. त्या सजीव संपत्तीचे दान ही मोठी पवित्र गोष्ट मानली गेली आहे. जसे सोने चांदी, रत्न ही अचेतन संपत्ती असते तशी ही सचेतन संपत्ती ब्रह्माने

माणसाला दिलेली आहे. गोधनात इतर प्राणी जसे घोडे, गाढव, खेचर, कुत्री सुद्धा येतात, त्यांचे वेगळे उपयोग आहेत. पंचव्रतात त्या प्राण्यांशी कसे वागावयाचे ते दिले आहे. त्यांना थंडी आणि उष्णता ह्यांचा त्रास होत नाही म्हणून त्यांचे संवर्धन करणे सगळ्या मोसमांत सुलभ असते. माणसावर त्या प्राण्यांचे मोठे उपकार होत असतात त्यासाठी त्याना भूतदया ह्या व्रतानुसार सांभाळावयाचे असते. फार पूर्वी ते पशू यज्ञात बळी दिले जात पण एकदा राजा रंतिदेवाने हजारो पशू मारले व त्यामुळे त्यांच्या बळीचे वाईट परिणाम माणसाला समजले तेव्हां पासून यज्ञात गोधन बळी देण्याचे कमी झाले आहे. त्यानंतर ते प्राणी दानासाठी योग्य समजले जाऊ लागले. जीवंतपणी त्या पशूंचा मोठा उपयोग असतो ते पहाता ऋषींनी संकेत दिले कीं, गोधनाची हत्या फक्त ते वृद्ध झाल्यावर करावयाची त्यांच्या मांसासाठी. तरूण जनावर मारावयाचे नाही. यज्ञात त्यांचे दूध, तूप, लोणी, दही वापरण्याची प्रथा सुरू झाली. गाईच्या दुधाला पृथ्वीवरील अमृत समजले जाऊ लागले. म्हणून गोदान हे भूदाना इतकेच श्रेष्ठ समजले जात आहे. कृषी साठी बैल मोठा उपयोगाचा असतो त्याच प्रमाणे तो वाहनं खेचण्यासाठी मोठा कामाचा असतो त्यामुळे गाई इतकाच बैल महत्वाचा ठरला. त्याचे यज्ञात बळी देणे बंद करण्यात आले. प्राचीन अर्थव्यवस्था गाई आणि बैलांवर मोठ्या प्रमाणात विसंबून होती. त्यांना कृतज्ञतेच्या कारणाने मनुष्य देवता समजू लागला. पुढे त्याचा अतिरेक झाला. ब्राह्मणाला अशा गाई द्यावयाच्या ज्या धष्टपुष्ट आहेत ज्या दूभत्या आहेत, ज्यांची वासरं मरत नाहीत आणि जी रोगट नाही. अशाप्रकारे उपयुक्ततेच्या कारणांमुळें तीळ आणि गाई दानासाठी महत्वाच्या ठरल्या आहेत. आता अन्नाच्या दानाबद्दलचे संकेत कोणते व ते कां ऋषींनी दिले ते सांगतो. भुकेल्याला अन्न देणे हे मोठे पुण्यकर्म समजले आहे. अन्नदानामुळे राजा रंतिदेव स्वर्गात गेला होता. जे पुण्य सोने चांदी दिल्याने मिळत नाही ते अन्नदानाने मिळते. विशेष असें कीं. इतर दानं फक्त ब्राह्मणांना केली तर उपयोग होतो पण अन्नदान कोणालाही केले तरी त्याचे श्रेय सारखेच असते. मग तो ब्राह्मण असो नाहीतर क्षत्रिय असो वा वैश्य वा शुद्र असो किंवा कोणी पशू असो. हे त्या दानाचे विशेष आहे. ऋषी पराशर सांगतात, कोणत्याही देवतेला प्रसन्न करण्यासाठी तिला प्रथम तिचे आवडते खाद्य द्यावयाचे असते. कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षात अन्न दान केल्याने विशेष फायदा होतो असा समज

आहे. देवतेला आवडणारे खाद्यपदार्थ तिची आठवण करून खाल्ल्याने भक्ताची इच्छा लवकर पुरी करते ती देवता कारण, त्या देवता तिच्या भक्ताच्या माध्यमाने तो प्रसाद खात असतात. भुकेल्या मनुष्याला तसेंच इतर प्राण्याला त्याचे आवडते खाद्य दिल्याने दात्याची सगळी पापं धुतली जातात.

अशाप्रकारे मी तुला तीळाच्या दानाचे महत्व, भूदानाचे महत्व आणि अन्नदानाचे महत्व काय व कां ते समजावून सांगितले आहे. त्याशिवाय गोधनाचे महत्वसुद्धा तुला सांगितले आहे.

अनुशासन पर्व भाग सदुसष्ठावा संपला.

## अनुशासन पर्व
## भाग अडुसष्ठावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "आपण मला विविध दानांचे श्रेयक्रम सांगितले ते मी समजलो. अन्नदान हे सर्वश्रेष्ठ आहे हेसुद्धा समजलो. परंतु, पेयाच्या दानाचे श्रेयक्रम तुम्ही सांगितलेले नाहीत. त्याबद्दल सांगा".

भिष्म सांगू लागतात, पेयदानाच्या बाबत कोणते निकस आहेत ते सांगतो, अन्न आणि पेय दानांची तुलना इतर कोणत्याही दानाशी केली जात नाही. म्हणून त्या दोनांच्या पेक्षा श्रेष्ठ दान नसते हे तू लक्षात घे. जीवाच्या संवर्धनासाठी खाद्य आणि पेय आवश्यक असतात. त्याबद्दल सावित्री काय सांगते ते सांगतो, ती सांगते कीं, जे याचक स्वतः खातो व पितो तेंच त्याने त्याच्या आराध्य देवतेला द्यावयाचे असते. त्यासाठी दशरथाच्या रामाचे उदाहरण प्रसिद्ध आहे, त्यात त्याला शबरीने आंबट तुरट बोरं दिली होती ती राम आनंदाने स्वीकारतो. जे रामाने केले तेंच कोणतीही देवता तिच्या भक्तासाठी करत असते. पिशाच्च लोक मारलेल्या प्राण्याचे मांस खातात व तेंच त्याच्या आराध्य देवतेला प्रसाद म्हणून देतात ह्यावरून देवाला काय प्रसाद चढवावयाचा त्याचे ठोकताळे तू समजू शकतोस. वेदातील मंत्र सांगतात कीं, "अन्नाच्या दानात दाता जीवन दान करत असतो. जीवन दानापेक्षा श्रेष्ठ दान नसते".

लोमस ऋषी सांगतात, प्राचीन काळी सिवीने कबुतराला जीवन दान केले म्हणून त्याचा उद्धार झाला. म्हणून जे प्राणी खाण्यासाठी खाटीक मारतो त्या प्राण्यांचे आत्मे स्वर्गात जातात. खाद्य आणि पेय ह्यात कोणी जास्त श्रेयस्कर नसते, ते दोन सारखेच समजले जातात. कारण माणसाच्या पेयांत प्रामुख्याने पाणी असते जे सर्वश्रेष्ठ जीवनदाई समजलेले आहे. परंतु, पोषणासाठी मात्र खाद्य पदार्थ पेयांपेक्षा जास्त उपयोगाचे असतात हे सुद्धा वेद मान्य करतात. सोम देव पाण्यातून आला आहे, वरुण पाण्याची देवता आहे. अमृत, सुधा आणि स्वाध, दूध हे खाद्य पदार्थांप्रमाणे पोषणाचे काम करत असतात. देवता अमृत पितात. पाण्यातून सगळे जीव उत्पन्न होत असतात, नाग सुधा पितात, पितर स्वाध

पितात. चरणारे प्राणी पाला खातात जे पाण्याने भरलेले असते आणि पाणी स्वतः सगळ्या सजीवांसाठी आवश्यक आहे.

जलदानासारखे श्रेष्ठ दान नाही हे सर्वमान्य आहेच. ते आपण आधी पाहिलेले आहे. म्हणून खाद्य आणि पेये सारखीच समजली जातात.

युधिष्ठीर विचारतो, पंचव्रताची माहिती सांगा.

भिष्म सांगतात, कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच **माणूसकी** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरूद्ध जे वागणे त्याला अमानुषपणा असे म्हणतात.*

मला समाजाने कसे वागवावे असें मला वाटते, तसेंच मी समाजातील लोकाशी वागणे ह्याला **चांगुलपणा** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो. ह्याच्या विरुद्ध जे वागणे त्याला वाईटपणा असे म्हणतात.*

सर्व प्राणिमात्रांबद्दल सन्मानाची भावना बाळगून त्या प्रमाणे जगणे आणि सर्व प्राणिमात्रांचा आदर करणे ह्याला **भूतदया** असें म्हणतात. *जे त्या विरुद्ध वागतात ते दुष्ट समजले जातात.*

जो हे तीन नियम पाळून त्याचे जीवन जगतो तो पुण्यवंत समजला जातो. पुण्य कमावण्याचे हे तीन मार्ग सांगितले आहेत हिंदू नितीशास्त्रात.

त्याशिवाय प्रामाणिकपणा आणि कृतज्ञता असे मिळून पांच नियम पाळून जगतो तो मोक्षाचा मानकरी होतो म्हणून त्या व्रताला पंचव्रत असे म्हणतात. पंचव्रत हा हिंदू निती शास्त्राचा गाभा आहे.

अनुशासन पर्व भाग अडूसष्ठावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकोणसत्तरावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "मला पुन्हा सांगा तीळाचे दान आणि प्रकाश दान ह्यांचे महत्व काय असते. त्याशिवाय वस्त्र आणि खाद्य दानाचे महत्व जे निरनिराळ्या परिस्थितीत लक्षात घ्यावयाचे असते त्याबद्दल सांगा.

भिष्म सांगतात, त्यासाठी मी तुला एक प्राचीन संभाषण सांगणार आहे जे ब्राह्मण आणि यम ह्यांच्यात झाले होते. एके काळी गंगा आणि यमुना ह्यांच्या दुआबाच्या प्रदेशात एक मोठे नगर होते ज्यात प्रामुख्याने ब्राह्मणांची वस्ती होती. त्या नगराचे नांव होते पर्णसल. ते फारच सुंदर होते. एके दिवशी मृत्यूचा देव त्याचे काळे कपडे घालून त्या नगरात आला होता. त्याचा एक संदेशवाहक जो कावळ्यासारखा दिसत होता, यमाकडून आज्ञा घेतो कीं, त्या नगरात एक ब्राह्मण रहात आहे ज्याचे नांव शर्मिन होते व तो अगस्त्य ऋषीच्या कुळातील आहे. शर्मिन मोठा तपस्वी होता. त्याचा वेदाचा व्यसंग होता, तो त्याच्या स्नातकांना वेद शिकवत असे. त्याला आणण्याची आज्ञा होते व त्यात यम सांगतो कीं, फक्त त्यालाच आण दुसर्या कोणाला त्याच्यासारखा दिसतो म्हणून आणू नकोस. त्याला सन्मानपूर्वकपणे आणण्याचे त्याला सांगितले जाते. त्याला इतर पाप्याना जसे ते यमदूत खेचून नेतात तसे न आणण्याचे सांगितले जाते. परंतु, तो कावळ्यासारखा दिसणारा यमदूत नेमके त्याच्या उलट करून ज्याला नाही आणण्याचे यमाने निक्षून सांगितले होते त्यालाच घेऊन जातो व यमापुढे सादर करतो. यम त्या ब्राह्मणाचे स्वागत करतो. त्यानंतर यम त्याच्या दूताला सांगतो कीं, हा तो नाही व त्याला पुन्हा परत नेण्याची आज्ञा करतो. यमदूताला यम सांगतो कीं, तो त्यालाच आणेल ज्याला आणण्याची आज्ञा झाली आहे. परंतु, तो ब्राह्मण यमाला सांगतो कीं, त्याचे वेदाचे अध्ययन पूर्ण झाले आहे व त्याला परत त्या जगात जाण्याची इच्छा नाही. म्हणून जर माझा काळ झाला नसेल तर मला परत न पाठवता येथेच राहू द्यावे.

यम त्याला बोलतो, "मी सांगू शकत नाही किती काळानंतर तुझा काळ येणार आहे. म्हणून मला ते करता येणार नाही. त्याकारणाने तुला परत जावे लागणार आहे. तुला आणखीन काय मला सांगावयाचे आहे ते बोल".

ब्राह्मण बोलतो, "अहो मृत्यूदेव मला सांगा मोठे श्रेय मिळवण्यासाठी माणसाने काय केले पाहिजे"?

यम सांगतो, संकेत असे आहेत कीं, ब्राह्मणाला तीळाचे दान दररोज करण्याने मोठे श्रेय प्राप्त होत असते. त्यामुळें जी अध्यात्मिक उर्जा दात्याला मिळते ती श्रेयस्कर असते. तसे त्यांने दररोज करावयाचे असते, सत्पात्र ब्राह्मणाला ते दान करावयाचे असते. वैशाख महिन्यात शुक्ल पक्षातील पोर्णिमेच्या दिवशी जे दान होईल ते उत्तम. तीळाचे पदार्थ तो खाण्यात ठेवत असला पाहिजे. त्याच प्रमाणे तो पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करत असला पाहिजे. त्यासाठी जागोजागी तलाव, विहीरी खोदण्याचे काम तुझ्या राजाने केले पाहिजे. महामार्गावर पाणपोयी तयार केली पाहिजे.

भिष्म पुढे सांगतो, "ते संभाषण झाल्यानंतर यमदूत त्या विद्वान ब्राह्मणाला त्याच्या शरीराकडे घेऊन जातो. तो ब्राह्मण परत जीवंत झाल्यानंतर यमाने सांगितलेल्या गोष्टी करण्यास सुरूवात करतो. त्यानंतर यम शर्मिनला बोलावतो. तो यमदूत शर्मिनला यमापुढे आणतो. यम त्यालासुद्धा तोंच संदेश देऊन परत मृत्यूलोकात पाठवतो. शर्मिनसुद्धा त्या संदेशाप्रमाणे तीळाचे पदार्थ (लाडू, चिकी इत्यादि) करून ब्राह्मणांना देऊ लागतो  त्याच प्रमाणे तो त्याच्या घरा पुढे वाटसरूंसाठी एक पाणपोयी तयार करतो ज्यामुळे येणारा जाणारा तहानलेला तेथे पाणी पित असे. ते झाल्यानंतर यम पितरांसाठी रात्रीच्या समयी प्रवास करणार्यांसाठी दिवे लावण्याचे पुण्यकर्म करण्याचे आदेश देतो. त्यामुळे रात्रीच्या प्रहरी दिवे लावण्याने त्याचे पितर संतुष्ट होत असतात, असे यम सांगतो. ते एकप्रकारचे श्राद्ध असते. त्यानंतर येतात, रत्न. त्यांचे दान सुद्धा दात्याची अध्यात्मिक शक्ती वृद्धींगत करत असते. ब्राह्मण त्याला दानात मिळालेला रत्न विकत असतो व त्या पैशाने यज्ञ करत असतो. त्यामुळें ह्या दानामुळे अप्रत्यक्ष रित्या दात्याला पुण्य प्राप्त होत असते. गृहस्थाने वस्त्राचे दान करावयाचे असते ग्रहणाच्या काळात त्यामुळे पापाचा नाश होत असतो. अशा दानाने त्याचे गृहस्थी जीवन सुखी होते. अनुशासन पर्व भाग एकोणसत्तरावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग सत्तरावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "अहो कुरु वंशाचे मुख्य मला भूदानाबद्दलचे आणखीन ऐकावयाचे आहे. असें समजता कीं, क्षत्रिय फक्त भूदान ब्राह्मणाला देऊ शकतो जो ब्राह्मण तत्वनिष्ठ जीवन जगत आहे. ते दान तो ब्राह्मण योग्य विधीपूर्वक स्वीकारेल. ते मला माहीत आहे पण जर इतर वर्णाच्या माणसाला भूदान करावयाचे असेल तर त्यासाठी शास्त्रात काय सांगितले आहे ते मला समजून घ्यावयाचे आहे.

भिष्म सांगतात, तीन प्रकारच्या दानांचा उल्लेख वेदात आहे. त्या आहेत गाय, जमीन आणि ज्ञान. त्याचे कारण असे आहे कीं, गो ह्या शब्दाचा वापर त्यांसाठी केला आहे. गो ह्या शब्दाचे तीन अर्थ होतात ते असे गाय, जमीन आणि तिसरा अर्थ आहे ज्ञान. त्यामुळे वेदाला नेमके कोणते दान ह्या शब्दाने सुचवावयाचे आहे ते अभ्यासकाला समजले पाहिजे. ते असे, तो अर्थ घ्यावयाचा जो त्या संदर्भात लागू होतो. कांहीं जाणकार म्हणतात कीं, त्याचा अर्थ ती तिनही दान समान मुल्याची समजावीत. जनावरांशी पंचव्रतातील भूतदया ह्या व्रतानुसार वागावयाचे असते. नांगरणी करतांना बैलाला चाबकाने मारावयाचे नसते. त्याच्या मांडीवर हाताने चापट्या मारत त्याला चालण्यासाठी उद्युक्त करावयाचे असते. जनावरांना कधी लाथ मारावयाची नसते. त्याचे पाप कधी धुतले जात नाही, त्याची शिक्षा भोगावीच लागते. विश्रांती घेणार्या प्राण्यांना हकलवून लावणे वर्ज (अमान्य) समजले आहे वेदांत. जनावरांना पाणवठ्यावर पिण्यास कोणी मना करणे चुकीचे समजले आहे आणि जर प्राण्याला कोणी त्रास दिला तर तो प्राणी त्या माणसाना मारत असेल तर त्या लोकांना कोणी वाचवू नये कारण ते त्यांच्या पापकृत्याची शिक्षा भोगत असतात. देवतांच्या जागा गाईच्या शेणांनी सारवल्या जातात ह्यावरून त्याच्या शुद्धतेची कल्पना करावी. स्वतः जेवण्याआधी गोवंशाच्या प्राण्यास हिरवे गवत खाण्याला देतो त्याचे पितर त्याच्यावर खूष होत असतात. त्यामुळे त्याच्या कुळाचा उद्धार होत असतो.

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा कशा गाई दानात द्यावयाच्या असतात, कोणत्या मोकळ्या सोडावयाच्या असतात, कोणत्या प्रकारच्या माणसांना त्या द्यावयाच्या असतात? ते कोण आहेत ज्यांना गाई द्यावयाच्या नसतात"?

भिष्म सांगतात, "ज्या माणसात चांगुलपणा नाही अशा माणसाला कधीही गोधन देऊ नये. जे पापमय जीवन जगतात, जे लोभी आहेत, जे खोटे बोलतात, जे स्वतः कधी दान करत नाहीत, जे त्यांच्या पितरांची श्राद्ध करत नाहीत, देवतांची पुजा करत नाहीत.

त्या गरीब ब्राह्मणाला गाय दान करावी जो पवित्र अग्नी सांभाळत आहे, ज्याला बरीच मुलं झाली आहेत, जो यज्ञयागादि कामात व्यस्त असतो, जो दानाची कदर करतो.

पंचव्रताचे आचरण करणार्या कोणालाही दानं करावीत जरी तो ब्राह्मण नसला तरी त्या दानात ब्राह्मणाला केल्यासारखे श्रेय असते. ज्याच्या मालकीत दहा गाई आहेत त्याला गरीब समजावयाचे नसते. असे श्रृती सांगते.

सदाचारी माणसाला गोदान करण्याने जे श्रेय प्राप्त होते तितक्या योग्यतेचे पाप त्या माणसाला लागते जो ब्राह्मणाकडे चोरी करतो. तसेंच दान देण्याचे आश्वासन देऊन नंतर दान करत नाही".

अनुशासन पर्व भाग सत्तरावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकाहत्तरावा

भिष्म सांगतात, "ब्राह्मणाचे नुकसान केल्याने राजा नृगावर मोठी कयामत गुजरली होती त्याचा किस्सा सांगतो तुला म्हणजे ब्राह्मणांना त्रास देण्यामुळे कसा संकटात मनुष्य पडतो ते तू समजशील. कांहीं काळापूर्वी यदू वंशाचे कांहीं युवक वनातून जात असतांना तहानल्याने पाण्याचा शोध घेऊ लागतात, त्यावेळी ते एका जुन्या विहीरीकडे पोहोचतात जिच्यावर गवत वाढलेले होते. पाणी पिण्याच्या उद्देशाने ते ती जागा साफ करू लागतात. विहीरीच्या तोंडावरील गवत काढून टाकल्यावर ते आत पहातात ते तेथे एक भलीमोठी पाल अडकलेली होती. बर्याच मेहनतीने ते त्या पालीला त्यातून वाचवण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्याना यश येत नाही. ते जनार्दनाकडे जाता. ते त्याला सांगतात कीं, त्या विहीरीत एक भलीमोठी पाल आहे जी सगळी विहीर व्यापून आहे. ते पुढे सांगतात की, त्यांना बरीच मेहनत घेतली तिला बाहेर काढण्यासाठी परंतु, त्याना यश आलेले नाही. ते ऐकल्यावर वासुदेव तेथे गेले. ते त्या पालीला बाहेर काढतात व विचारतात कां, "ती कोण आहे"? ती पाल सांगते कीं, ती प्राचीन राजा नृगाचा अवतार आहे. ज्या नृगाने अनेक यज्ञ केले होते आणि जो फार समृद्ध राजा होता. ते ऐकल्यावर माधव बोलतात, तू अनेक चांगुलपणाचे कर्म केले आहेस, तू कांहीं पाप केलेले मला दिसत नाही मग तुझी अशी अवस्था कशी झाली"? तू त्याबद्दल कांहीं सांगू शकशिल कां"? मी समजतो कीं, तू तुझ्या यज्ञाच्या वेळी शेकडो गाई ब्राह्मणांना दान करत आला आहेस. असे असतांना तुझी अशी अवस्था कां झाली ते मला समजत नाही. ते ऐकल्यावर पालीच्या अवतारातील नृग त्याला सांगतो, एका वैदाचार्य ब्राह्मणांची गाय तो कोठे गेला असतांना त्याच्या गोठ्यातून पळून गेली होती. ती गाय नंतर त्या खिल्लारात घुसली जे मी यज्ञात ब्राह्मणांना दान करण्यासाठी जमा केले होते. मला त्या बद्दल कांहीं समजले नव्हते. ती गाय इतर

गाईबरोबर माझ्याकडून इतर कोण्या ब्राह्मणाला दान झाली होती. त्या गाईचा मालक ते समजतो. तो तेथे येतो, तो त्याच्या गाईला ओळखतो व त्या दुसर्या ब्राह्मणाकडून ती परत मागू लागतो. त्यांच्यात वाद होतो. त्यातील एक ब्राह्मण मला बोलतो कीं, मी ते कृत्य केले आहे. तू माझी गाय चोरली आहेस. मी त्या दान घेतलेल्या ब्राह्मणाला ती परत करण्यास सांगतो व तिच्या बदल्यात आणखीन कित्येक गाई देण्याचे आश्वासन देतो. तो ब्राह्मण मला बोलतो कीं, ज्या मुहूर्तावर ती गाय त्याला मिळाली आहे त्यासाठी तो ती गाय परत करण्यास तयार नाही. दोघे त्यांच्या मुद्द्यावर अडून बसतात. तो ब्राह्मण नृगाला सांगतो कीं, त्याला त्याची ती दुभती गाय कोणत्याही परिस्थितीत पाहिजे. मी त्याला सोन्याचे आमिष दाखवतो पण तो त्यांना बधत नाही. त्याचा आग्रह चालून रहातो.

तो वाद मिटला नव्हता अशा वेळी मला काळाचे बोलावणे आले व मी ईहलोकातून निघून गेलो. पितृ लोकातून वाट काढत मी यमापर्यंत पोहोचलो. यम माझे स्वागत करतो व बोलतो, तुझा कर्मयोग उत्तम आहे पण एक पाप अनवधानाने तुझ्या कडून झाले आहे. त्याचे प्रायश्चित्त तुला आता करावयाचे आहे कां नंतरच्या जन्मात ते सांग. तू जेव्हां तुझा राज्याभिषेक झाला तेव्हां आश्वासन दिले होतेस तुझ्या प्रजेला कीं, तू सगळ्या प्रजेचे संरक्षण करशिल, परंतु त्यात कांहीं कमी राहून गेले आहे जेव्हां तू त्या ब्राह्मणाला त्याची गाय देऊ शकला नाहीस. त्यामुळे तुझ्या हातून दोन पाप झाली आहेत. एक चोरलेली गाय तू दान केलीस आणि दुसरे असें कीं, तू तुझ्या प्रजेच्या गोष्टींचे संरक्षण करण्यात कमी पडलास. ते ऐकल्यावर मी यमास बोललो, "मी प्रथम प्रायश्चित्त करू इच्छिते त्यानंतर माझ्या चांगल्या कामाचे फळं चाखू इच्छितो. ते बोलल्या बरोबर मी पुन्हा पृथ्वीवर फेकला गेलो. ते होत असतांना मला यमाचे ते उद्गार ऐकू आले त्यात तो सांगत होता कीं मला जनार्दन त्या पापातून मुक्ती देईल एक हजार वर्षानंतर. त्यानंतर तुझ्या सदाचारामुळे तुला जे लाभणार आहे ते मिळेल. त्यानंतर मी पृथ्वीवर पडलो ते डोक्यावर आणि ह्या विशाल विहीरीत, त्यावेळी माझे ह्या महाकाय पालीत रुपांतर झाले होते. माझी स्मृति मात्र शाबूत आहे. म्हणून मला ते सगळे आठवत आहे. पुढे नृग जनार्दनाला बोलतो, "तू मला त्यातून बाहेर काढले आहेस जसे यमाने सांगितले होते. आता मला स्वर्गात जाण्याची परवनगी दे.

जनार्दनाच्या संमतीने तो स्वर्गात गेला. हा किस्सा कृष्णाने नंतर सगळ्याना सांगितला व बोलला कीं, कोणीही अनवधानानेसुद्धा ब्राह्मणांच्या गोष्टींची चोरू करू नये. अरे पार्था, चांगले कर्म केले म्हणून वाईट कर्माचे फळं मिटत नाहीत. ते सुद्धा भोगावे लागते. राजानेसुद्धा ब्राह्मणांचा अपराध करू नये हे लक्षात घे.

अनुशासन पर्व भाग एकाहत्तरावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग बाहत्तरावा

युधिष्ठीर पुढे बोलतो, "गोदानाचे आणखीन काय श्रेय असते त्याबद्दल मला ऐकावयाला आवडेल".

भिष्म सांगतात, "त्या करता मी तुला उद्दलकी व नचिकेता ह्याची कथा सांगतो. एकेकाळी, उद्दलकी त्याचा पुत्र नचिकेता ह्यास यज्ञासाठी सामुग्री आणण्याची आज्ञा करतो. तो सांगतो कीं, तो वनातून यज्ञासाठी संमिधा (सरपण), गवत (दूर्वाचे गवत) आणि कुसाचे गवत गादी करण्यासाठी आणण्यास विसरलो आहे तरी तू वनात जा आणि ते सामान घेऊन ये. त्याशिवाय पुजेसाठी फुलं आणि नदीवरून पिण्याचे पाणी आण. नचिकेता नदी किनारी जातो परंतु, तो पहातो कीं, नदीच्या पाण्याला आलेल्या जोरामुळे ते सगळे पाहून गेले होते. नचिकेता रिकाम्या हाती परत येतो. ते पाहून त्याचा पिता उद्दलकी रागावतो आणि त्याला यमाकडे जा असा शाप देतो. नचिकेता हात जोडून क्षमा याचना करणार इतक्यात उद्दलकीच्या वाणीने जो शाप फेकला गेला त्याच्यामुळें नचिकेता मरून पडतो. तो मरून पडला आहे हे पाहून उद्दलकीला त्याच्या क्रोधाचा पश्चात्ताप होतो व त्याच्या मुलाच्या मृत शरीरावर अश्रू ढाळत बसतो. तसा तो एक दिवस आणि रात्र अश्रू ढाळत असतो त्यामुळे नचिकेता त्या अश्रूंनी भिजला होता. दुसर्या दिवशी नचिकेता जीवंत होतो. ते दोघे कुस गवताच्या गादीवर होते. त्या अश्रूंमुळे त्या गवतातून नवीन पेरे उगवत होती. त्याचे शरीर सुगंधाने दरवळत होते. तो गाढ निद्रेतून उठत असल्यासारखे दिसत होते. ऋषी उद्दलकी त्याला बोलतो तुझ्या भल्या कर्माने तू उच्च कोटीला जाऊन आला आहेस. तू परत आला आहेस माझ्या भाग्याने. तुझे शरीर आता ते पूर्वीचे राहीलेले नाही. त्यानंतर नचिकेता तेथे असलेल्या ऋषींच्या समक्ष त्याने जे अनुभवले त्या एका दिवसात ते सांगण्यास सुरूवात केली.

तो सांगतो, "मी यमाच्या अतिसुंदर वाड्यात गेलो होतो. तो वाडा कित्येक योजने लांब आणि रुंद होता. त्याचे वैभव अवर्णनीय होते. मला यम पहातो व बोलतो, तुझ्या पित्याने तुला मला भेटण्यास सांगितले आहे म्हणून तू येथे आला आहेस. असे बोलून तो मला

यमदूतांतील एक चांगले आसन बसण्यासाठी देतो. मी थोडे लाजत त्याला विचारतो, मी आपल्याकडे आलो आहे तेव्हां मला कोणत्या लोकांत जावे लागेल ते सांगा. ते ऐकून यम बोलतात, तुझी वेळ आलेली नाही. परंतु, तुझ्या पित्याने तुला माझी भेट घेण्यासाठी पाठवले म्हणून तू आला आहेस. तुझ्या पित्याची अध्यात्मिक शक्ती अफाट आहे तिला मी नाकारू शकत नव्हतो म्हणून तू येथे अवेळी आला आहेस. तेथे तो मात्र केल्या कर्मासाठी रडत बसला आहे. तू माझा अतिथी आहेस. तुला जे पाहिजे ते मी तुला देणार आहे, म्हणून बोल तू काय इच्छा करत आहेस. ते ऐकून मी त्यांना बोलतो, मी अशा ठिकाणी आलो आहे जेथून कोणी परत जात नाही. परंतु, आपण मला संधी देत अहात म्हणून मी सांगतो कीं, मला तो लोक दाखवा जेथे पुण्यात्मे जातात त्यांच्या देहावसानानंतर. ते मी बोलल्यानंतर मला एका उंची रथात बसण्यास सांगितले व माझी त्या स्वर्गीय प्रदेशांतून सैर सुरू झाली जेथे पुण्यात्मे त्यांच्या निधनानंतर जातात.

तेथे मोठे मोठे महाल होते. ते मौल्यवान रत्नांनी सजवलेले होते. त्यातूल कांहीं टोलेजंग होते. त्याच्या मधल्या भागात सुंदर वनराई होत्या. त्या वनराईतील वृक्ष पाहिजे ती फळं देत होती. तेथे नद्या होत्या. तसे मी कधी अनुभवलेले नव्हते. तेथे दूधाच्या नद्या होत्या त्यापाहून मी विचारले, ते कोणासाठी"? त्या पुण्यात्म्यांच्या सोयीसाठी आहेत. तेथे दुःख नव्हते. तेथे मोठा भाग होता त्यात गाईचे दान करणार्याची व्यवस्था केलेली होती. जे यथोचित ब्राह्मणांना दान करतात ते निधनानंतर येथे आराम करत असतात.

कोणाला गोदान करावयाचे व  कसे करावयाचे त्याची माहिती त्याला यमदूत सांगत होते. पंचव्रताचे आचरण असणार्या ब्राह्मणाला गाई दान करावयाच्या असतात ज्यामुळे त्या गाईचा अपमान आणि छळ होणार नाही. बैलाचे सुद्धा तसेंच असते. सामाजिक रिवाजानुसार गोदान योग्य प्रकारे करावयाचे असते.

नचिकेता ते सगळे ऐकत होता वैवस्वात सांगत होता. नचिकेता विचारतो, "जर देण्यासाठी गोधन नसेल तर त्याने काय करावयाचे"?

वैवस्वात सांगतो, गाय नसेल तर तुपाची गाय बनवून ती द्यावी. नाहीतर तीळाची गाय बनवून ती द्यावी. असे सगळे मृत्यू देव मला सांगत होते. तो जे कांहीं मला दाखवत होता त्यामुळें मला फार हर्ष होत होता. त्यानंतर नचिकेता त्याच्या पित्याला सांगतो कीं, त्याने

जो शाप दिला तो वस्तुतः वनदान होता माझ्यासाठी. कारण त्यामुळेंच मी त्या लोकांत जाऊ शकलो. तेथे गेल्यामुळे दान केल्याने मृत्यूनंतर काय फायदा होतो ते मी प्रत्यक्ष पहात होतो.

मी ह्यापुढे नित्य नेमाने दान करण्याचा प्रयत्न करणार आहे. नेहमी देत जावे देण्याची दानत माणसाला पुण्याकडे नेत असते. घेण्यासाठी कांहीं लागत नाही पण देण्यासाठी दानत असावी लागते, देवता माणसाची ती दानत तपासत असतात. देण्याची ऐपत असणे आणि दानत असणे ह्या दोन गोष्टी महत्वाच्या असतात. ऐपत असून जो दानत ठेवत नाही तो अध्यात्मिक दृष्ट्या खोटा ठरतो. फुल न फुलाची पाकळी देण्याची दानत असली तर देवता त्याला मदत करत असतात. असे वैवस्वात सांगत होते. पंचव्रताचे आचरण हे सुद्धा एका प्रकारचे दान असते. श्राद्ध वगैरे विधी माणसाची दानत तपासण्यासाठी उपयोगी येत असतात. पंचव्रताचे पालन करण्यात दानाचे श्रेय आहे. जो त्या व्रतात असतो तो सतत दान करत असतो असे समज असे मृत्यूदेव मला सांगतो.

त्या भेटीनंतर मी त्यांची रजा मागितली व त्याने मला पुन्हा पृथ्वीवर पाठवले. मी तुमच्या पायाशी आलो आहे.

अनुशासन पर्व भाग बाहत्तरावा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग त्र्याहत्तरावा

युधिष्ठीर पुढे विचारतात, "आपण मला दानेचे व त्यामागील दानतीचे महत्व सांगितले. नचिकेताच्या कथेतून. राजा नृगावर कशी आफत कोसळली ते सुद्धा सांगितले. त्या अनवधानाने झालेल्या प्रमादाची त्याला फारच मोठी सजा भोगावी लागली होती. त्यातून कृष्णा त्याला मुक्त करतो तेसुद्धा मी समजलो. परंतु, मला एक शंका आहे ती गाईच्या दानामुळें दात्याला कांहीं विशेष लोकात स्थान मिळते त्या बद्दलची आहे. त्या बद्दल कांहीं विशेष खुलसा आपण केला तर बरे होईल.

भिष्म सांगू लागतात, "ते समजण्यासाठी ब्रह्मदेव आणि इंद्र ह्यांच्यात एक संवाद झाला होता तो सांगतो".

इंद्र ब्रह्माला बोलतात, "मला पटत नाही कीं, गोदान करणारे इतर स्वर्गवासींपेक्षा श्रेष्ठ असल्या सारखे वागत असतात. त्या बद्दल मला आक्षेप आहे. ते गोदानाचे लोक कोण असतात? त्या माझ्या शंकेचे निरसन आपण करावे". असे शक्र ब्रह्माला बोलतो. "त्या लोकाचे असे काय विशेष आहे ते मला सांगा. त्या लोकात रहाणार्यांना काय जास्त फायदे होतात? त्या लोकात रहाणारे किती काळ तेथे रहातात व नंतर परत पृथ्वीवर जातात त्याचा काय नियम आहे ते सांगा. कमी गाईचे दान करणारा आणि जास्त गाईचे दान करणारा ह्यात भेद कसा केला जातो? कधी गाय न देतासुद्धा त्याला गोदानाचे श्रेय मिळत असते ते कसे? त्या दक्षिणांमध्ये कसा भेद केला जातो यमाच्या हिशोबात? मला ते समजत नाही तरी ते सविस्तरपणे समजावून सांगा".

अनुशासन पर्व भाग त्र्याहत्तरावा संपला.

# अनुशसन पर्व
## भाग चौर्याहत्तरावा

ब्रह्मदेव सांगतात, गोदान करणार्यांना पाठवता येईल असा लोक तिनही जगात नाही. म्हणून त्यांचा विशेष लोक तयार करावा लागला आहे. असे कितीतरी लोक आहेत ज्यांची तुला कल्पना नाही. त्यातील कित्येक अदृष्य जगात आहेत. ते फक्त मी आणि यम पाहू शकतो. पंचव्रताचे आचरण करणारे ऋषी, ब्राह्मण त्या लोकात सदेह जाऊ शकतात. कांहीं ज्ञानी ते लोक त्यांच्या स्वप्नात पाहू शकतात. सुशुप्तीत (समाधी) जाऊ शकणारे सुद्धा त्यांचा अनुभव घेऊ शकतात. आता मी तुला सांगतो त्या लोकांचे विशेष गुण कोणते. तेथे काळ थांबलेला असतो. तेथे रहाणारे कधी आजारी, विकलांग, वृद्ध होत नाहीत. तेथे जरासेसुद्धा पाप घडू शकत नाही. तेथे असलेल्यांना जे हवे ते विनासायास मिळत असते. त्या लोकापेक्षा चांगला लोक स्वर्गात दुसरा नाही. ते लोक जे क्षमाशिल असतात, सगळ्या प्राणिमात्रांना सन्मानाने वागवतात, त्याना आपुलकीने सांभाळतात, जे त्याच्या शिक्षकाचा आदर करतात, जे मद आणि मत्सर विरहीत आहेत असे गुणी लोक त्या लोकाला जातात जेथे गोदान करणारे जातात. जे पंचव्रताचे आचरण निर्दोषपणे करत असतात, ज्यांच्या मनात कोणाबद्दल द्वेष नसतो, जे त्यांच्या ज्येष्ठांचा आदर करतात, जे वचनबद्ध असतात, जे ब्राह्मणांचा आदर करतात, ज्यांचा क्रोध संयमित आहे, जे परमेश्वराला स्मरून जगत असतात, जे अतिथीचा सन्मान करतात. असे सदाचाराचे गुण ज्यांच्यामध्ये स्वाभाविकपणे अंगीभूत असतात ते त्या लोकात जातात जेथे गोदान करणारे जातात.

जे खोटं बोलतात, जे जबाबदारीने वागत नाहीत, जे दुष्ट आहेत, ब्राह्मणांचा तिरस्कार करतात, जे पंचव्रताचा अवमान करतात, असे सदोष प्रवृत्ती असलेले त्या लोकांत कधीच जाऊ शकत नाहीत त्यांना त्या लोकाचे साधे दर्शनसुद्धा होणार नाही.

मी तुला गोदानाच्या स्वर्गाचे सांगितले आहे. त्यात कांहीं नियम आहेत ते असे, वारसा हक्काने मिळालेल्या अथवा स्वकमाईच्या धनाने खरेदी केलेले गोधन दान केल्याने त्याचे

पूर्ण श्रेय त्याला मिळते. द्युत खेळून त्या पैशात विकत घेतलेली गाय जो दान करतो त्याला गोदानाच्या स्वर्गात एक हजार वर्षे सुखात रहाता येते. ज्याला त्याचा यज्ञातील हिस्सा म्हणून गाय मिळाली असेल तर ती दान करून तो त्या स्वर्गात जाऊ शकतो. इंद्रियसंयमनाने जगणारा, ब्राह्मणांचा आदर  करणारा, पवित्र जीवन जगणारा गोदानाच्या स्वर्गात जातो गाईचे दान न करता. नित्य नेमाने महादेवाचे ध्यान करणारा जर एक गाय देईल दानामध्ये, त्याला एक हजार गाई दिल्याचे श्रेय मिळते. असे ऋषी सांगतात. सगळे उत्तम गुण असूनही जर तो गाईचे दान करत नसे तर त्याला त्या उत्तम गुणांचे श्रेय मिळत नाही. म्हणून असा इसम गोदान नियमितपणे करेल. असे श्रृती सांगते.

अरे शक्रा, ऐक मी काय सांगतो ते, केवळ गोवंशाबद्दल आदरभाव आणि प्रेम असणारा गाईचे दान केल्याचे श्रेय प्राप्त करू शकतो. जर तो गोवंशाच्या प्राण्याला नेहमी चारा घालत असेल. मुक्या प्राण्यांना खाणे घालण्याने व त्यांचा अपमान न करण्याने गोदानाचे श्रेय मिळते. युद्धात जिंकून आणलेल्या गाईचे दान करून तेवढेच श्रेय मिळते जेवढे श्रेय विकत घेऊन दान केल्याने मिळते. गाईचे अपात्र दान केल्याने पाप लागते म्हणून दान करण्या आधी घेणार्याचे चांगले परीक्षण केले पाहिजे. ज्याला गाई सांभाळण्याची अक्कल नाही अशा माणसांना गोदान करणे पाप करण्यासारखे आहे. खाटकाला गाईचे दान करणे महापाप समजले जाते. परंतु, परिस्थितीमुळे तो गाय विकू शकतो. जर शंका असेल कीं, गाईचे दान घेणारा ती खाटकाला विकणार आहे तर त्याला दान करणे पाप असते. गाय सांभाळून त्याद्वारा स्वताचे गुजराण करणार्याला गोदान करणे श्रेयस्कर असते. बेवारस असलेली गाय सांभाळण्याने पुण्य लागते. गाय चोरून विकणे मोठे पाप कर्म ठरते. इतर प्राणी विकून त्या पैशात विकत घेतलेली गाय दान करण्यासाठी योग्य समजली जाते. लग्नात हुंड्यात मिळालेली गाय दान करता येते. ब्राह्मणाला दान करावयाची गाय निरोगी, सुंदर, दूध देणारी, शांत स्वभावाची, दूध काढतांना त्रास न देणारी, पळून न जाणारी अशी असली पाहिजे. तिचे वासरू सुद्धा दान करावे लागते. सगळ्या गाईत कपिला श्रेष्ठ समजली जाते. तिचे दान ब्राह्मणाला केल्याने मोठे श्रेय प्राप्त होत असते.

अनुशासन पर्व भाग चौर्याहत्तरावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग पंच्याहत्तरावा

इंद्र ते ऐकून विचारतो, "जाणून बुजून गाय चोरणारा आणि ती विकणारा त्याचे मृत्यूनंतर काय होते ते सांगा".

ब्रह्मदेव सांगतात, "गाय चोरून विकणार्याचे काय होते ते सांगतो ते ऐक, त्यात चोरण्याचा आणि विकण्याचा असे जे उद्देश आहेत ते लक्षात घ्यावे लागतात. श्रुतीच्या संकेतां विरुद्ध जर तो गाय विकत असेल तर मग ते खाण्यासाठी अथवा पैसे कमावण्यासाठी अथवा ब्राह्मणाला दान करण्यासाठी असो, ती गोहत्त्या समजली जाते. परंतु, चोरलेली गाय ब्राह्मणाला दान केली तर मात्र तो स्वर्गात जातो. परंतु, त्या भोगानंतर मात्र त्याला गाईची चोरी केली म्हणून नरकात तितकीच वर्ष तडपडत रहावे लागते. गाईच्या दानाबरोबर सुवर्ण नाणी दक्षिणा देण्यामुळे त्याचे श्रेय द्विगुणित होते. ब्रह्मदेव इंद्राला बोलतो की, मी तुला दक्षिणेबद्दलचे ते सगळे सांगितले आहे".

भिष्म पुढे सांगतात, "असें ब्रह्मदेवाने शक्राला सांगितले होते. ते इंद्राने दशरथाला सांगितले. त्याने ते त्याचा मुलगा रामचंद्र ह्याला सांगितले. रघू वंशी रामाने ते त्याचा भाऊ लक्ष्मण ह्याला सांगितले. लक्ष्मणाने ते वनात असतांना तेथे असलेल्या ऋषीगणांना सांगितले. त्यानंतर हे श्रुतीतील संकेत पिढ्या दर पिढ्या पुढे सांगितले जात आहेत व माझ्या गुरूने मला सांगितले ते आता मी तुला सांगत आहे. हे गोधनाचे आख्यान जो ब्राह्मण ब्रह्मवृंदात गाऊन सांगतो यज्ञाच्या वेळी किंवा गोदान होत असतांना, त्या गाणार्याचे कल्याण होईल. असें ब्रह्मदेवांनी सांगितले आहे".

अनुशासन पर्व भाग पंच्याहत्तरावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग श्याहत्तरावा

युधिष्ठीर भिष्माना बोलतो, "आपण मला जे सांगितले ते मी समजलो परंतु, मला कांही शंका आहेत त्या विचारण्याची मला परवानगी द्यावी. श्रृतीमध्ये व्रताच्या पालना बाबत जे नियम आहेत ते मला कळत नाहीत तरी त्यांबद्दल सांगाल तर बरे होईल. त्याशिवाय व्रताच्या पालन करण्याचे काय फायदे असतात ते सांगा. वेदाच्या व्यसंग करण्याचे काय फायदे सांगितले आहेत शास्त्रा मध्ये ते सांगा. आणखीन मला समजून घ्यावयाचे आहे कीं, दान न स्वीकारण्याचे काय श्रेय असते कां? ज्ञानाचे दान करणार्याला काय श्रेय प्राप्त होते. मला आणखीन सांगा, चतुर्वर्णाचे पालन करणार्याला कांहीं विशेष श्रेय मिळते कां? ब्रह्मचर्य आचरणार्याला काय श्रेय प्राप्त होत असते. मातापित्यांची सेवा करणार्याला कोणते श्रेय प्राप्त होते. गुरूची सेवा करणार्याला कोणते श्रेय मिळते असे सगळे सांगा. युद्धात शत्रूला भिऊन पळणार्या क्षत्रियाची यमसदनात काय दखल घेतली जाते तेसुद्धा सांगा. पंचव्रताचे आचरण ठेवण्याला काय श्रेय मिळते"? मला ह्या सगळ्या गोष्टी एक राजा ह्या नात्याने समजून घ्यावयाच्या आहेत. ह्या विषयांवर अधिकार वाणीने बोलू शकेल असे आपणच अहात म्हणून मी तुम्हाला विचारत आहे".

भिष्म सांगतात, व्रताचे पालन करणार्याला त्या व्रताच्या अनुषंगाने जे श्रेय सांगितले आहे ते मिळते. प्रथम व्रत म्हणजे काय ते समजून घे. विशिष्ट नियमाचे बंधन पाळून जगण्याला व्रत पाळणे अथवा व्रतस्थ असणे असें समजले जाते. निरनिराळ्या उद्देशांने निरनिराळे नियम सांगितले आहेत, त्यांचे आचरणात ठेवण्याचा जो योग आहे ते व्रत म्हणून समजले जाते. उदाहरणार्थ, पंचव्रताचे पांच नियम असतात (माणूसकी, चांगुलपणा, भूतदया, प्रामाणिकपणा आणि कृतज्ञता) त्यांचे पालन करण्याच्या जीवन पद्धतीला पंचव्रत असे समजले जाते. जो त्यांचे कसोशीने आचरण करतो तो त्या व्रताचा व्रती (योगी) समजला जातो. अशी अनेक व्रतं वेदांत दिली आहेत. त्यांचे पालन करण्याच्या शिस्तीला शिष्टाचार असें समजले जाते. वेदाचा व्यासंग करणारा ह्या आणि नंतरच्या जगात धन्य होत असतो. अध्यात्म साधना करणार्याला अनेक व्रत करण्याचे वेदांत सांगितले आहे. त्यातील एक

आहे इंद्रिय संयमन. त्यामध्ये ब्रह्मचर्य हे व्रत येते. त्याची फलंश्रुती मोठी सांगितली आहे. कारण त्या व्रतांच्या आचरण्याने माणसाची अध्यात्मिक उर्जा वृद्धींगत होत असते. त्यामुळें लोकपाल देवतां आणि त्यांच्या उपदेवता (गण) व्रतीवर संतुष्ट होत असतात, त्याच्या वास्तविक गरजांचे उपशमन त्यामुळे विनासायास होत असते. औदासिन्य व्रतात योगी त्याच्या वासनांकडे दुर्लक्ष करत असतो त्यासाठी तो त्या वासनांच्या बद्दल तुच्छता मनात बाळगत असतो. औदासिन्य व्रत योग्याला ब्रह्मचर्य व्रताचे पालन करण्यात मोठी मदत करत असते. इंद्रिय संयमनाने विविध दानं केल्याचे श्रेय मिळत असते. ब्रह्मचर्य व बायकांसाठी कौमार्य अशी व्रतं त्या व्यक्तीला स्वर्गाचे द्वार उघडत असतात. अशा व्रतांत रहाण्याला तपस्या असे म्हणतात. प्रत्येक व्रताची तपस्या असते. ध्यान साधना करण्याच्या व्रताचे फळं फार श्रेष्ठ दर्जाचे असते. ध्यान साधना ह्या व्रतांने तो मोक्षापर्यंत जाऊ शकतो. षड्रीपू विमोचन हे व्रत फार मोठे म्हणून सांगितले आहे वेदांमध्ये. त्यात सहा दोषांचे (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) नियंत्रण करण्याचे नियम आहेत. औदासिन्याच्या व्रताने तो साध्य करावयाचे असतात. अरे युधिष्ठीरा, अशाप्रकारे अनेक व्रतं एकमेकांत अशी आचरण्यात ठेवण्याने मनुष्य मोक्ष साधना सिद्ध करत असतो. ब्रह्मचर्य अथवा कौमार्य, इंद्रिय संयमन, पंचव्रत अशी व्रत माणसास वेदांने सांगितली आहेत गृहस्थाश्रमी साठी. त्याच्या बरोबर षड्रीपू विमोचन व्रत आचरण्याने वानप्रस्थाश्रम, सन्यासाश्रम यशस्वी तो करत असतो. त्या शिवाय कांहीं व्रतं आगम शस्त्रात दिली आहेत त्यांच्या आचरण्याने विविध प्रकारच्या सिद्धीदेवता प्रसन्न होत असतात. त्यांच्या कृपाने तो साधक त्याचे बिघडलेले भाग्य सुधारत असतो. त्यात अनेक यज्ञ येतात जे क्षत्रियांसाठी सांगितले आहेत. त्यामुळे ते युद्धात यशस्वी होतात. वैश्य त्यांची व्रत करतात. त्यात दानं करणे व पंचव्रत बंधन कारक समजले जाते. सेवा करणे शुद्रासाठी व्रत म्हणून दिले आहे. त्यामुळे प्रसंगी तो मोक्षापर्यंत जात असतो. वेदांत निरनिराळ्या व्रतीं बद्दल श्रेय काय ते सांगितले आहे. ते काय सांगते ते ऐक, इंद्रिय संयमनाचे श्रेय मोठे असते. युद्धात लढत मरण्याचे व्रत क्षत्रियांसाठी दिले आहे, ते एक श्रेष्ठ व्रत समजले जाते. ज्ञानसाधना हे व्रत ब्राह्मणांसाठी सांगितले आहे. शिकणे आणि शिकवणे हे त्यात येते. देवतांना संतुष्ट करण्यासाठी ब्राह्मणांना यज्ञ करण्याचे व्रत सांगितले आहे. परमेश्वराची आराधना

करण्याच्या व्रताला सत्यव्रत म्हणतात. ते सर्वश्रेष्ठ व्रत समजले आहे. सर्व इच्छांच्या त्यागाचा सत्यव्रतात समावेश असतो. सत्यव्रतात सगळ्या देवतांची पुजा येते. पितरांची पुजा येते, पंचव्रत येते अशी अनेक व्रते सत्यव्रतात येतात.

मी तुला ते सगळे सांगितले ज्याने तुझे समाधान होईल. आता ब्रह्मचर्याचे महत्व काय ते सांगतो, जो आजन्म ब्रह्मचर्य (कौमार्य बायकांसाठी) पालन करतो त्याला कांहींहीं साध्य करणे अशक्य नसते. सत्यव्रतात ब्रह्मचर्याला फार मोठे स्थान आहे. ब्रह्मचर्य व्रतात तो सगळ्या बायकांत त्यांची माता, भगिनी अथवा कन्या पहातो व लैंगिक वासनांबद्दल औदासिन्य व्रतात रहातो. बायकांच्या कौमार्य व्रतात त्या सगळ्या पुरूषात पिता, बंधू अथवा पुत्र पहातात. लैगिक वासनांबद्दल औदासिन्य व्रतात रहातात. मोक्षमार्गीसाठी हे व्रत उत्तम मदत करणारे सिद्ध झाले आहे. असंख्य ऋषी ब्रह्मचर्याने मोक्षास गेले आहेत. निवृत्ती (मोक्षाच्या आधीची अवस्था) प्राप्त करण्यासाठी सुद्धा ब्रह्मचर्य व्रत मोठे उपयोगाचे असते. इंद्रिय संयमन व्रत आणि ब्रह्मचर्य व्रत मोक्ष साधनेचे महत्वाचे अंग समजले जाते. ध्यान साधना करण्यासाठीसुद्धा ब्रह्मचर्य चांगले उपयोगाचे असते. पूर्ण पापनाश करण्यासाठी ब्रह्मचर्य व्रत उपयोगाचे असते. अनेक सिद्धी ह्या व्रताच्या माध्यमाने साध्य केल्या जातात. ज्येष्ठांच्या सेवेचे व्रत पुत्र आणि कन्याना सांगितले आहे. त्या प्रमाणे मुलं आई व बापाची सेवा करण्याचे सांगितले आहे. ते व्रत आचरणारा कधी नरकात जात नाही. त्याची सगळी पाप ह्या व्रतांने धुतली जातात असे ऋषी सांगतात.

अनुशासन पर्व भाग श्याहत्तरावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग सत्याहत्तरावा

युधिष्ठीर पुढे बोलतो, "गोदानाबद्दल कांहीं संकेत निश्चित केले आहेत आणि त्यानुसार जर गोदान केले तर स्वर्गात उच्च जागी तो जातो असे समजले जाते. त्याबद्दल आपले काय मत आहे ते सांगा".

भिष्म सांगतात, गोदाना इतके श्रेष्ठ दुसरे दान नाही असे माझे मत आहे. वैध मार्गाने संपादन केलेले गोधन त्यासाठी वापरता येते. त्या दानाचा संबंध भूतदयेशी जोडला जातो. जसें मुलगी (कन्या लग्नामध्ये) देतांना गरीबाची श्रीमंताकडे द्यावयाची असते तसेंच गाय दान करतांना ती अधिक सुरक्षित ठिकाणी जाईल हे पहावयाचे असते. अशी परंपरा प्राचीन काळापासून चालू आहे. सुरक्षिततेबद्दलच्या मनुष्य स्वभावाच्या प्रवृत्तीनुसार ती प्रचारात आली आहे. त्या बद्दलचे एक कर्मकांड आहे त्याची माहिती तुला सांगतो.

प्राचीन काळी राजा मंधत्रीकडे गोदाना बाबतचे नियम करण्याचे काम होत असतांना कांहीं शंका पुढे आल्या होत्या. त्यात मुहूर्त ठरवण्या बाबतचे आणि कशा ब्राह्मणाला दान करावयाचे अशा मुद्द्यावर चर्चा झाली. त्यात बृहस्पती सांगतात कीं, आदल्या दिवशी त्या ब्राह्मणाची पुजा झाली पाहिजे. रोहीनी (लाल रंगाची) प्रकारची गाय दान केली पाहिजे. दान करण्याच्या आधीच्या रात्री दाता तिच्या गोठ्यात मातीवर गाईच्या पायाशी निजेल. त्या रात्री ती गाय तिचे वासरू आणि तिचा बैल असे सगळे दावणीत बांधलेले नसतील. रात्री तो तेथे गोठ्यामध्ये चावणार्या किटकांचा त्रास सहन करत तसा झोपेल जशी गाय तेथे रहाते. पहाटे तो उठेल आणि त्यानंतर गोदानाचा विधी संपन्न होईल. अशी पद्धत गोदाना बाबतची मंधत्रीने निश्चित केली. दान होतांना संमंग आणि वहुल नांवानी गाईचा उल्लेख केला जाईल. त्या विधीमुळे दाता गाईच्या पातळीला गेला होता असे मानले जाते व त्यानंतर त्याची सगळी पापं धुतली गेली असे समजले जाते. त्याचा स्वर्गाचा रस्ता मोकळा झाला आहे असे समजले आहे. दान करतांना गोवंशाच्या स्तुतीचे गान केले जाते कांहीं मंत्राच्या बोलण्याने. गोवंश माणसाला कसा मदत करतो त्याचे वर्णन (किर्तनाने) केले जाईल. तिची तुलना सरस्वती नदीशी केली जाते जसे ती गाय एक देवता आहे. गाईचे

पंचगव्य (दूध, दही, तूप, मुत्र आणि शेण), त्याचे कसे उपयोग आहेत त्याचे कौतुक केले जाते त्या मंत्रांच्या गाण्याने. दान करतांना आपल्याला कष्ट होत आहेत असे तो दाता बोलेल. घेणारा सुद्धा घेतांना त्या गाईची स्तुती करत असेल. गाईस चांगले सजवलेले असेल. तिच्या येण्याने घेणार्याची संमृद्धी होईल असे बोलले जाईल. ज्याच्याकडे दान करण्यासाठी गाय नाही तो तिच्या मुल्याइतके वस्त्र, दागिने दान (त्याला वैश्नवी असे म्हणतात) करेल व ते गाय समजून, घेणारा ब्राह्मण स्वीकारेल. वस्त्र आणि दागिने देणारा घेणार्याला विनंती करतो किं, गाय समजून ते भवितव्य स्वीकारेल. अशारितीने विधीपूर्वकपणे गोदान केल्याने मोठे पुण्य लाभत असते असे ब्रह्मदेव सांगतात. अशारितीने दान करणारा अनेक वर्ष स्वर्गात रहातो असे समजले जाते. गोदान करणारा व त्याच्या ऐवजी इतर वस्तु देणारा सुखात रहातो असें समजले जाते. त्यासाठी घेणारा ब्राह्मण त्या वस्तुंना गाईच्या जागी स्वीकारण्यास तयार असला पाहिजे. तो विधी भल्या पहाटे करावयाचा असतो. त्यावेळी सर्वात प्रथम तिघांना (दाता, घेणारा आणि गाय) आघोळ घातली जाते.

दाता त्यानंतर तीन रात्री त्या गाईबरोबर राहणार असतो (त्यानंतर ती घेणार्याकडे जाते) तो फक्त पंचगव्याचा उपयोग करील त्या सुमारास. बैलाचे दान केल्याने ब्रह्मचर्य व्रताचे श्रेय त्याला मिळते. यथाविधी जर गोदान झाले नाही तर गोदानाचे श्रेय मिळत नाही. ओझी वाहणारा मजबूत बैल दान करणे गाईइतकेंच पुण्याचे मानले जाते. मंधत्री सांगतो कीं, ज्यांचा ह्या विषयात विश्वास नाही त्यांच्याशी ह्या विषयावर बोलावयाचे नाही. त्यांच्याशी ह्या गोदाना बाबत बोलणे पापाला आमंत्रण देण्यासारखे समजावे. राक्षसांपासून हा विधी दूर ठेवावा.

ह्या पद्धतीने ज्या राजांनी गोदान केले व धन्य झाले त्यात बृहस्पति, उशिनर, विश्वगस्व, नृग, भगिरथ, आणि मंधत्री स्वतः आहेत. त्याशिवाय राजा मुचकुंद , भूरिद्यर्ण, नैशब्द, सोमक, पुरुरव, भरत, दशरथाचा मुलगा राम, दिलीप इत्यादि अनेक ख्यातनाम राजे त्यात येतात. ते सगळे अशा विधीपूर्वक गोदान केल्याने स्वर्गात गेले आहेत.

म्हणून पार्था, तू सुद्धा तसे कर. नेहमी सत्पात्र ब्राह्मणांना गोवंशाचे दान करत रहा.

पुढे वैशंपायन सांगतात, अशारितीने भिष्माने गोदान करण्याची योग्य पद्धत युधिष्ठीराला सांगितली. युधिष्ठीराने ते सगळे समजून घेतले जे राजा मंधत्रीने सांगितले होते. त्या नंतर तो नियमितपणे गोठ्यात झोपू लागला आणि पंचगव्याचे सेवन करू लागला त्यामुळे तो मोठा सम्राट झाला. तो जवस, शेण, गोमुत्र सेवन करू लागला.

त्याने त्याच्या राज्यातील गोवंशाचे संरक्षण करण्याचे नियम तयार केले. तो त्याच्या रथाला बैल जुपणे बंद करतो त्याच्या राज्यात. त्याच्या रथाला तो चांगले घोडे वापरू लागला.

अनुशासन पर्व भाग सत्याहत्तरावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग अठ्याहत्तारावा

वैशंपायन पुढे सांगतात, "राजा युधिष्ठीर मोठ्या आदरपूर्वक भिष्माचार्यांना दान ह्या धर्माचरणाबद्दल आणखीन प्रश्न विचारतो.

भिष्माचार्य सांगतात, सत्पात्र ब्राह्मणास चांगली दुभती गाय तिच्या वासरा आणि बैलासह चांगल्या उंची वस्त्राने पांघरून दान करण्याने दात्याची सगळी पापं धुतली जातात. त्याला कधी नरकाचे दर्शन होत नाही. परंतु, जर भाकड, म्हातारी, वासरं नसलेली गाय दान केली तर त्या दात्याला शाप लागतो त्या ब्राह्मणाचा व तो सदैव नरकात जातो. ते असे होते जसे कोरडी बिनपाण्याची विहीर दान करावी जे ब्रह्मणाचा अपमान करण्यासारखे असते. तशा गाई खाटकाला विकण्यातच शहाणपण असतो.

युधिष्ठीर पुढे विचारतो, गाईमध्ये कपिला श्रेष्ठ समजली जाते. इतर गाई आणि कपिला ह्यांच्या मध्ये दानाच्या दृष्टीने काय फरक असतो ते सांगा.

भिष्म सांगतात, माझ्या मुला, मी आता तुला सांगतो ती कथा जिच्यात कपिला गाय कशी तयार झाली ते सांगितले आहे.

फार प्राचीन काळी ब्रह्मदेव दक्ष ऋषीला विविध प्राणी उत्पन्न करण्याची आज्ञा करतात. प्राण्यांच्या भल्यासाठी दक्ष ऋषी वनस्पती उत्पन्न करतो. देवता त्याकाळात फक्त अमृत प्राशन करत असतं. दक्षाने उत्पन्न केलेल्या खाद्यांवर इतर प्राणी त्यांचा निर्वाह करत होते. त्यात चर प्राणी अचरांपेक्षा श्रेष्ठ समजले जात होते. चरांमध्ये मनुष्य आणि मनुष्यांत ब्राह्मण श्रेष्ठ समजले जातात. सगळे यज्ञ विधी ब्राह्मणांवर अवलंबून असतात. यज्ञातून अमृत तयार होते, यज्ञ गोवंशावर अवलंबून होते. देव यज्ञामुळें प्रसन्न होत होते. प्राण्यांना खाण्यासाठी खाद्य लागते. म्हणून ते सगळे ब्रह्माला भेटतात व खाद्याचा नियमित पुरवठा करण्याबाबत त्याला विनंती करतात. तेव्हां तो दक्ष स्वतः बरेच अमृत पितो. त्याने तो संतुष्ट झाला त्यानंतर त्याला ढेकर आले. त्या ढेकरातून सगळीकडे सुगंध पसरला. त्या सुगंधातून एक गाय तयार झाली. तिचे नाव त्याने ठेवले सुरभी. त्यामुळे ती सुरभी दक्षाची कन्या झाली. तिला अनेक गाई झाल्या यथावकाश. म्हणून सुरभीला जगाची माता समजले

जाते. त्यांचा रंग सोनेरी होता. म्हणून त्याना कपीला असे नांव मिळाले. त्यांच्यातून इतर प्राण्यांना खाद्य मिळत होते. त्या गाईची वासरं ते दूध पित तेव्हां त्यांच्या तोंडातून त्या दूधाचा फेस आला व तो महादेवाच्या माथ्यावर पडला कारण त्यावेळी महादेव पृथ्वीवर बसले होते. तो फेस त्यांच्या माथ्यावर पडला म्हणून त्यांना क्रोध आला. त्याने त्याच्या तिसर्या डोळ्याने त्या गाईकडे पाहिले. परंतु, त्या दक्षाच्या कन्या असल्यामुळे त्या मेल्या नाहीत पण त्या तेजामुळे त्यांच्यात विविध रंग त्यांच्या कातड्याचे झाले. अशारितीने विविध रंगाचे डाग असलेल्या गाई दिसू लागल्या. त्या गाई त्यानंतर सोमाच्या लोकात पळून गेल्या जेथे महादेवाचे ते तेजस्वी किरण पोहोचत नव्हते. दक्ष पहातो कीं, महादेव फार रागावले आहेत, तो त्याना शांत करण्यासाठी त्यांना बोलतो, "अहो भगवंत त्या अमृताने आपण भिजून गेला अहात. वासराच्या तोंडातून त्याचे उष्टे दूध अपवित्र नसते त्यामुळें आपण इतके रागावला हे बरोबर नाही. जसे वारा आणि अग्नी कधी अपवित्र (उष्टे) होत नाहीत तसे वासराने उष्टे केलेले दूध अपवित्र नसते. त्या दूधातून जे पदार्थ बनतात ते सगळे शुद्ध समजले जातात. ते ऐकल्यावर शंकर शांत होतात. त्यानंतर पिशाच्चांवर आरुढ होऊन प्रवास करणार्या महादेवांना दक्ष एक बैल देतो त्याचे वाहन म्हणून तोंच नंदी होता. त्यानंतर शांत झालेले महादेव नंदीलाच त्याचे वाहन आणि जोडीदार म्हणून मानतात. महादेवांनी त्याच्या पताकेवर नंदीची आकृती त्याचे चिन्ह म्हणून स्वीकरली. त्यानंतर महादेव दूधाचा अभिषेक स्वीकारतात. म्हणून महादेवाच्या पिंडीवर दूध, दही आणि तूपाचे अर्घ्य देण्याची प्रथा प्रचारात आली. महादेवांनी स्वीकारल्यानंतर गाईचे दान विशेष महत्वाचे झाले. गाय समृद्धीचे चिन्ह झाली कारण ती महादेवाच्या झेंड्यावर नंदीच्या रुपात विराजमान झाली. गाईच्या दानात हव्य आणि कव्य दिल्याचे श्रेय मिळू लागले. सगळ्या कर्मकांडांत दूधाचे महत्व प्रस्थापित झाले.

वैशंपायन पुढे सांगतात, ते भिष्मांचे ऐकल्यावर युधिष्ठीर व त्याचे बंधू गोदानाचे महत्व समजून नियमितपणे गोवंशाचे हजारोंच्या संख्येने दान करू लागले. त्यांचे पाहून इतर करू लागले.

अनुशासन पर्व भाग अठ्याहत्तारावा संपला.

# अनुशासन पर्व
## भाग एकोण ऐंशीवा

भिष्म पुढे सांगतात, "अति प्राचीन काळी इक्ष्वाकू घराण्यात राज सुदास झाला होता. तो त्यांचे राजगुरू वसिष्ठ जे त्यांच्या तपस्येसाठी ख्यतनाम होते, त्याना विचारतो, "अहो पवित्र ब्राह्मणा, मला सांगा, असे काय आहे सगळ्या तिनही जगात जे पवित्र असून ज्याचे गुणगान केल्यांने पुण्य मिळते"?

भिष्म पुढे सांगतात, राजा सुदास वसिष्ठांपुढे नतमस्तक उभा होता तेव्हां वसिष्ठ प्रथम गाईला वंदन करून स्वतःस शुद्ध करून त्या बाबतचे रहस्य सांगू लागतात.
वसिष्ठ सांगतात, गाईना एक सुगंध असतो तो त्याच्या घामाचा असतो. त्यांमध्ये अंगिभूत पावित्र्य असते. त्या समृद्धीचे चिन्ह समजल्या जातात. गाय तिच्या सगळ्या जीवनात सतत माणसाला उपयोगी पडत असते. अगदी अखेरच्या वेळी सुद्धा ती तिचे मांस अर्पण करून माणसाचे भोजन बनून स्वर्गात जात असते. तिच्या चामड्याने ऋषीमुनींची वस्त्र बनतात. अनेक लोक गाई विकून समृद्ध झाले आहेत. मंत्र जसे स्वांहा आणि वशट गाईमध्ये अगिभूत असतात. यज्ञात गाईचे बलिदान देऊन ती यज्ञ संपन्न करण्यात मदत करतात. जे इतर कोणताही पशू करू शकत नाही. गाईचे ब्रह्मणाला दान करून माणसे त्याचे त्यांच्या कुकर्मापासून सुटका करून घेत असतात. जो गाईचे दान करत नाही त्याने केलेले यज्ञ व्यर्थ असतात. गाईच्या मुत्रात आणि शेणात अमृत असते म्हणून त्याचे सेवन केले तर दीर्घायुष्य प्राप्त होते. आंघोळ करतांना गाईच्या शेणांने अंग घासून स्वच्छ करावे. जेवतांना तिच्या चामड्यावर बसून ते करावयाचे असते. यज्ञात गाईच्या तुपाचे अर्घ्य करावे. जेवणात नेहमी गाईचे तूप, दही आणि दूध ठेवावे. त्यामुळे आरोग्य उत्तम रहाते. अशारितीने गाईचा सन्मान करावा. खाण्यात कधी गाईचे (बैलाचे, वसराचे) मांस घ्यावे

त्यासाठी एरवी निरुपयोगी ठरलेली गाय (म्हातारी, भाकड, उनाड) ब्राह्मणाकडून वध करून घ्यावी. गाईचा वध फक्त ब्राह्मणांकडून करावा त्यामुळे पाप लागत नाही. तो करतांना वेदातील गोमति मंत्रांचे वाचन केले गेले पाहिजे. गाय तिला त्रास होणार नाही अशाप्रकारे (बेशुद्ध करून) व्याधाने अहिसक हत्त्या करून स्वर्गात पोहोचेल असे पहावे. ध्यान साधनेसाठी गाय उत्तम आहे. तिच्या हंबरड्यात ओमकार असतो तो ऐकावा.
नवी बाळंतीण आणि तिचे बालक सुरुवातीचे चाळीस दिवस गाईच्या गोठ्यात रहातील तर ते बालक आणि त्याची आई तेजस्वी होतील. बालक बुद्धिमान होईल. गाय पापी मनुष्य तिच्या उपजत बुद्धीने ओळखते त्याचा उपयोग राजाला न्यायदानात करता येतो. असे उत्तम गुण इतर प्राण्यात नसतात.

अनुशासन पर्व भाग एकोणऐंशीवा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग ऐंशीवा

युधिष्ठीर पुढे विचारतो, मी असे ऐकतो कीं, गाईच्या मुतात आणि शेणात समृद्धी देवता वास करत असते, त्याबद्दलची काय कथा आहे ती सांगा. तुमची सांगण्याची पद्धत मला फार प्रिय आहे.

भिष्म सांगतात, त्या बाबत एक कथा ऐकिवात आहे ती तुला सांगतो. ती गाई आणि समृद्धी देवतांच्यातील संभाषणाची आहे. एके काळी जेव्हां कृत युगात सगळे प्राणी गाई धरून माणसाची वाणी बोलत होते त्या काळातील ही कथा आहे. एकदा समृद्धी देवता गाईच्या कळपात गेली होती त्यांचे होणारे कौतुक पाहून. ती खूप सुंदर दिसत होती. गाया तीला पाहून नवल करत असतात. त्यावेळी त्या श्रीला विचारतात, अहो सुंदरी, तू खूप छान दिसत आहेस, आम्हाला तुला पाहून बरे वाटले. तू कोण आहेस ते आम्हाला सांग.

श्री त्यांना सांगते, "तुमचे भले हो, मला कोण नाही ओळखत"? सगळे माझी याचना करत असतात. त्यात इंद्र, विवस्वात, सोम, विष्णू, वरुण, अग्नी, मला प्रसन्न करून मोठे झाले आहेत. सगळे ऋषी, देवता, माझी याचना करतात म्हणून मोठे झाले आहेत. अरे गायांनो, जे मला मानत नाहीत ते नष्ट होतात. धर्म, वैभव, सुख त्यांना मिळते जेव्हा मी त्यांच्यावर प्रसन्न होते. परंतु मी येथे तुम्हाला भेटण्यास आले कारण मला तुमच्या मध्ये रहावयाचे आहे. मला सांगा मी तुमच्या शरीरात किंवा कोठल्या भागात राहू शकते"? तसे झाले म्हणजे तुमची उपयुक्तता तुमच्या धन्याला समृद्धी देईल.

गाई सांगतात, तू समृद्धी फार चंचल असतेस. आमच्या शरीरात तू राहू शकणा्र नाहीस पण जर तुला जमले तर तू आमच्या शेणात आणि मुतात राहू शकतेस. तेथे तुझा चंचलपणा आम्हाला बाधणार नाही. तू कोण हे सांगितले आहेस त्यामुळे आम्ही तुझ्यावर संतुष्ट आहोत. तू इतरत्र कोठेतरी जा. तुम्हाला माझी आवश्यकता नाही हे मी समजते. ते बोलतात ते खरे आहे कीं, जर कोणी स्वताहून आले तर त्याची किंमत नसते, देव, मनुष्य माझ्याकडे येतात म्हणून तेथे मला किंमत असते. येथे मी आले मग मला तुम्ही किंमत

देणार नाही हे बरोबर आहे. येथे मला गरज आहे म्हणून तुम्हाला किंमत आली व माझी किंमत कमी झाली हे मी समजू शकते. देव, दानव, पिशाच्च, गंधर्व, उरग, राक्षस असे सगळे माझ्या कडे याचना करत असतात म्हणून मला तेथे किंमत असते. येथे तुम्हाला माझी खरोखरच गरज नाही हे मी समजले आहे. तरी तुम्ही मला तुमच्या कोठल्या तरी भागात जागा द्या.

गाई तिला सांगतात, तुझा कांहीं तरी गैरसमज झाला आहे. तू चंचल आहेस ही वस्तुस्थिती आहे हे तुला मान्य करावे लागेल. आम्हाला तुझ्यामध्ये कांहीं आमच्या उपयोगाचे असेल असें वाटत नाही.

श्री त्यांना बोलते, तुम्ही जर मला असे टाकाऊ ठरवले तर माझी काय किमत राहील जगात"? मी सांगते कीं, मला तुमच्यात कोठतरी जागा द्या. एवढेच मी सांगत आहे. जर मी तुमच्यासाठी टाकाऊ असेन तर मी तुमच्या शेणात आणि मुतात शिरते. त्यात त्यानंतर समृद्धी प्राप्त होईल. त्यातून लोक संपत्ती कमवू शकतील.

भिष्म पुढे सांगतात, असे श्री बोलल्यानंतर त्या गाया तिला त्यांच्या शेणात आणि मुतात शिरण्याची परवनगी देतात. ते दोन जरी आमच्या दृष्टीने त्यज्य असले तरी तेसुद्धा पवित्र असतात. असे गाया तिला सांगतात. त्यामध्ये कोणताही अशुभ जीव (रोग जंतु) शिरू शकत नाही. त्यामध्ये तू जाऊन राहू शकतेस.

श्री ते ऐकल्यावर गोवंशाचे आभार मानते व त्यांच्या शेणात आणि मुतात शिरते.

भिष्म पुढे सांगतात, अशारितीने समझौता झाल्यावर श्री अंतर्धान पावते. असे आहे गाईच्या शेणाचे व मुताचे महत्व.

अनुशासन पर्व भाग ऐंशीवा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग एक्यांऐंशीवा

युधिष्ठीर बोलतो, आपण मला गोदानाचे महत्व सांगितले. राजाला त्याची कर्तव्ये करण्यात अनेक अशा गोष्टी अपरिहार्य म्हणून कराव्या लागतात ज्या पापास कारणीभूत असतात अशा वेळी गोदानाने व भूदानाने ते पाप धुता येणार असेल तर ते राजांसाठी एक मोठी सुविधा ठरू शकते. ऋषी नचिकेता सांगतात कीं, गोदान आणि भूदान ब्राह्मणांना दक्षिणा म्हणून दिल्याने राजाचे पाप कमी होत असते. त्याबरोबर जर सोन्याचे दान करता आले तर ते जास्त चांगले असते. आता मला सांगा, सोने कशाला म्हणावयाचे? ते कसे पृथ्वीमध्ये आले? त्याचे मूळ काय? त्याची देवता कोण? त्याची आराधना कशी करावयाची? त्याला सर्वश्रेष्ठ कां समजतात? ज्ञानी सोन्याचे दान कां श्रेष्ठ समजतात? सगळ्या यज्ञांत सोन्याची दक्षिणा उत्तम समजली जाते. पाप क्षालनासाठी गाई, भू ह्यांच्या पेक्षा सोने जास्त उपयुक्त कां समजले आहे पूर्वीपासून"? माझ्या ह्या शंकांचे आपण निरसन कराल तर बरे होईल.

भिष्म सांगतात, ऐक मी काय सांगतो ते, त्यासाठी मी तुला एक कथा सांगणार आहे, त्यातून तुझ्या सगळ्या शंकांचे समाधान होईल. जेव्हां माझे पिताश्री ह्या जगातून निवृत्त झाले तेव्हां मी माझ्या आई बरोबर जान्हवी बरोबर गंगाद्वारी गेलो त्यांचे श्राद्ध करण्यासाठी. मी श्राद्धाची तयारी केली होती त्यात माझ्या आईने मला मदत केली होती. त्यावेळी अनेक ऋषी, बैरागी आम्ही आमंत्रित केले होते. मी श्राद्धाच्या प्राथमिक विधी सुरू केल्या होत्या. त्यात जलदान आणि भूदान झाले होते. शास्त्रात दिलेल्या प्रमाणे ते होत होते. त्यानंतर पिंडदान मी केले. त्यावेळी एक देखणा हात ज्याच्यावर सोन्याचे दागिने होते जमिनीतून बाहेर आला. ते पाहून मला अश्चर्य वाटले. मला वाटले कीं माझे पिताश्री स्वतः पिंड घेण्यासाठी आले आहेत. त्यावेळी मला आठवले कीं, श्राद्ध होतांना असा हात आला तर त्यात पिंड द्यावयाचे नसते. पितर अशारितीने पिंड घेण्यासाठी येत नसतात. संकेत असा आहे कीं, पिंड कुसाच्या गवताच्या गादीवर सोडावयाचे असते. मी त्या माझ्या पित्याच्या

हाताकडे दुर्लक्ष करणायाचे ठरवले आणि त्याप्रमाणे मी ते पिंड कुसाच्या गवताच्या गादीवर ठेवले. मी जे केले होते ते शास्त्राप्रमाणे योग्य होते. त्यानंतर तो माझ्या पित्याचा हात अदृष्य झाला क्षणार्धात. त्यानंतरच्या रात्री माझे पितर माझ्या स्वप्नात आले. म्हणाले त्यांना पिंड मिळाले आहे व ते संतुष्ट आहेत. तू वेदांचा व त्याबरोबर देवतांचा आदर केला आहेस. तू गोदान आणि भूदान केले आहेस आता सोन्याचे दान केले पाहिजेस. त्यामुळें तुझे सगळे पूर्वज निर्दोष सिद्ध होतील. ते ऐकल्यावर मी दुसर्या दिवशी सोन्याचे दान करण्याचे ठरवले. ही कथा तुला सोन्याचे महत्व पटवू शकेल असें मी समजतो. दुसरी कथा सांगतो ती प्रथम भार्गवाला जो जमदाग्नीचा मुलगा होता, समजली होती. तो रागाच्या भरात क्षत्रियांचे शिरकांड करून राहीला होता. सगळी पृथ्वी त्यांने जिंकली होती. तो अश्वयज्ञ करण्याच्या तयारीत होता. जो करणार्याला सगळे साध्य होते, असे ब्राह्मण समजतात. तो केल्याने तो शुद्ध झाला होता. तरी त्याच्या मनात खात होते कीं, त्याने खोटी हिंसा केली आहे. तो ज्ञानी ऋषींना भेटतो व त्यांना विचारतो. तो त्यांना बोलतो, "मी जे पाप केले आहे त्याच्या क्षालनासाठी कोणते दान योग्य असेल"?

ते ज्ञानी सूज्ञ ऋषी त्याला सांगतात कीं, अरे रामा, अश्वयज्ञ केल्यानंतर सुद्धा तुझे समाधान झालेले नाही म्हणून तू हे विचारत आहेस, तू तुझ्या समाधानासाठी वसिष्ठाना, अगस्त्याना आणि काश्यपांना जाऊन विचार, ते सांगतील. तो त्याना जाऊन विचारतो कीं, त्याचे त्या यज्ञामुळें खरोखरच पापक्षालन झाले आहे कां"? मी काय करावे म्हणजे माझे क्षालन खर्या अर्थाने होईल ते सांगा.

ऋषी त्याला सांगतात, त्यांच्या माहितीप्रमाणे गोदान आणि भूदान पुरेसे आहे परंतु, जर तुला जास्त खात्री करून घ्यावयाची असेल तर जे अग्नीने नष्ट होत नाही ते असे आहे ज्याचे दान त्या दोनांपेक्षा जास्त श्रेष्ठ समजले जाते. सगळी दानं अग्नी फस्त करत असतो शिवाय सोने. म्हणून सोन्याचे दान नित्य समजले जाते. तू त्याचे दान ब्राह्मणांना करत जा म्हणजे तुझे मन शांत होईल. कारण सोने अग्नीचा मुलगा आहे. तो त्याला जाळू शकत नाही. ते वसिष्ठ सांगतात व त्यानंतर सोने कसे आले त्याची माहिती सांगू लागतात. ते सांगतात, सोम आणि अग्नी ह्यांच्या संगमातून सोने तयार झाले प्रथम. पुढे तो ऋषी सांगतो, बोकड अग्नीचे प्रतिक असते, मेंढा वरुणाचे आहे. घोडा सूर्याचे, हत्ती नागांचे, रेडा

असुरांचे, कोंबडा आणि वृषभ राक्षसांची प्रतिक असतात. पृथ्वी हे एक दान क्षेत्र आहे. गाई, पाणी आणि सोम ह्यांच्या दानात पृथ्वाचे दान केल्याचे समजले जाते. असें स्मृती सांगतात. सोने ब्रह्माचे प्रतिक आहे. म्हणून ते सर्वश्रेष्ठ आहे दानासाठी. म्हणून त्याच्या दानाने सगळे देवता, गंधर्व, उरग, राक्षस, पिशाच्च आणि मनुष्य सोन्याने बद्ध करता येतात. त्या सगळ्या देवता सोन्याच्या तेजाने चमकत असतात. ब्राह्मणाला दक्षिणा देण्यासाठी सुद्धा सोने सांगितले आहे.

वसिष्ठ पुढे सांगतात भार्गवाला त्याना पुराणात ते समजले. त्यात प्रजापति स्वतः सांगतात, जेव्हां त्रिशूळ धारी रूद्राचे लग्न झाले हिमालयाच्या कन्येशी, उमाशी, तेव्हां देवतां बोलतात कीं तुम्हा दोघांची तपस्या कमाल आहे तेव्हां तुमचा पुत्र तसांच शक्तिमान निपजणार. तो रागावला तर सगळे जग भस्म करील. कांहीं उरणार नाही. तेव्हां महादेव त्या घाबरलेल्या देवतांना एक वर देतात, त्याप्रमाणे महादेव त्यांचे वीर्य स्तंभित करतात. त्यामुळे महादेवाचे नांव झाले उर्ध्वरेता. ज्यामुळे त्याना संतती होणार नाही. हे समजल्यानंतर उमा रागावते व सगळ्या देवतांना शाप देते कीं, तेसुद्धा अपत्यहीन रहातील. परंतु, तो शाप दिला तेथे जमलेल्या देवतां मध्ये अग्नी उपस्थित नव्हता.

जरी महादेवाचे वीर्य बद्ध झाले होते तरी त्यातून किंचित रेत मातीवर पडतात. त्याचे अग्नीत रुपांतर झाले व ते पसरू लागले.

ते होत असतांना देव त्यांच्या इंद्रासह युद्धात असुरांकडून हरवला गेला होता. त्या असुराचे नांव होते तरकासूर. आदित्य, वसू, रुद्र, मरुत, अश्विनी, सांध्य असे सगळे देव चिंतीत झाले होते तारकासुराच्या चढाईमुळें. जो दितीचा मुलगा होता. त्या पराजया नंतर देवांचे सगळे रथ, वाडे, ऋषींचे आश्रम, असे सगळे दैत्य भ्रष्ट करू लागले. सगळे देव फार दुःखी झाले होते. ते ब्रह्माकडे मदत मागतात.

अनुशासन पर्व भाग एक्यांऐशीवा संपला.

# अनुशासन पर्व
# भाग ब्यांऐशीवा

देवतां ब्रह्माला बोलतात, "दैत्य तारक नांवाचा ज्याला आपण आशिर्वाद दिला आहे, आम्हाला व ऋषींना फार त्रास देत आहे. आपण त्याच्या मृत्यूची घंटा वाजवाल तर बरे होईल. आम्हाला तुमच्या संरक्षणाची गरज आहे".

ब्रह्मदेव त्यांना बोलतात, "माझ्यासाठी सगळे प्राणी समान असतात. परंतु, जर त्याचे वागणे पंचव्रताचे उल्लंघन करणारे असेल तर मात्र मी तुमच्या तक्रारीची दखल घेणार आहे. वेदांचा नाश करणारे जीवंत रहाणे सृष्टीच्या भल्यासाठी योग्य नाही. त्यासाठी जे उचित आहे त्याचे संकेत मी काळाला दिले आहेत. आता तुम्ही शांत व्हा".

देवता त्यावर बोलतात, "आपण दिलेल्या आशिर्वादामुळे त्याला अभय मिळालेले आहे त्याचा त्याला दिमाख झाला आहे. त्याला सहजपणे मारणे शक्य नाही. अशा परिस्थितीत त्याचा मृत्यू कसा आपण साध्य करणार"? तारकाला ब्रह्मदेवाने जो दुवा दिला होता त्याप्रमाणे त्याला देव, असुर, मनुष्य आणि राक्षस मारू शकत नाहीत. त्याच वेळी महादेवाच्या अर्धांगाने देवांना संतती न होण्याचा शाप दिला आहे. त्यामुळे ते जर मेले तर त्यांच्या पिढ्या पुढे वाढणार नव्हत्या. ब्रह्मदेव बोलतात, "जेव्हां तो शाप तिने दिला होता तेव्हां त्या जमलेल्या देवांत ज्यांना तिने शाप दिला होता त्यांत अग्नी उपस्थित नव्हता. त्यामुळे तो त्या शापाने बाधित नाही. तो देवांच्या शत्रूंचा नाश करण्यासाठी संतती उत्पन्न करू शकतो. अग्नीची मुलं जी त्यांच्या अस्त्रांनी त्याला ठार मारू शकतात. तुमचे सगळे शत्रू तो मारून टाकेल. इच्छा हि मोठी शक्ती असते. त्यालाच काम म्हणतात. जो शंकराच्या वीर्यातून उत्पन्न झाला आहे. त्यातील एक अग्नीच्या उग्र दाहक स्वरुपात वाढत आहे. तो दुसरा अग्नीच आहे. त्याचे वीर्य तो गंगेत टाकेल जे गंगा वाढवेल. ते देवांच्या शत्रूचा नाश करतील. अग्नीला शोधा तो कोठे आहे. त्याच्या संततीकडून तारकाचा नाश करून घ्या असे ब्रह्मदेव देवांना सांगतात. पुढे ते बोलतात कीं, त्यांनी मार्ग सांगितला आहे आता त्याची यशस्वी अंमलबजावणी करणे देवांचे काम आहे. इच्छा किंवा आवड अथवा कामना जी अग्नीची रुप असतात, फार प्राचीन काळी उत्पन्न झाली होती. अग्नी सगळ्या

सजीवात असतो. त्याचा नाश करता येत नाही. परंतु, तो सगळ्यांचा नाश करू शकतो. तो रुद्रापेक्षा जास्त प्राचीन आहे. अशा यज्ञाच्या हुताशनिला शोधा. ब्रह्मदेव आज्ञा करतात. देवांना ती आज्ञा ऐकल्यावर फार आनंद होतो. त्यांचा उद्देश सिद्ध होणार ह्याची त्यांना खात्री वाटू लागते. देव तिनही जगं अग्नीचा सोध घेतात, परंतु, तो त्यांना सापडत नाही. ते भृगूच्या वंशाचे ऋषी त्या शोध कर्मात सामील असतात. त्यांना अग्नी सांपडत नाही. अग्नीने स्वताला स्वतामध्ये (पाण्यात करण, पाणी हे अग्नीचे एक रुप आहे) लपवलेले होते. शोधाशोध जोरात चालू होती त्या सुमारास पाण्यात रहाणारा एक बेडूक पाण्याच्या पृष्ठभागावर येतो. कारण पाण्यात लपलेल्या अग्नीमुळे त्याला त्रास होत होता. त्या बेडकाला समजते कीं देव अग्नीला शोधत आहेत. तो त्यांना सांगतो अग्नी कोठे लपला आहे. त्याचा दाह मला सहन झाला नाही म्हणून मी पाण्याच्या बाहेर आलो आहे. पाण्यातील सगळे रहिवाशी त्याच्या उष्णतेने त्रस्त झाले आहेत. तुम्हाला त्याच्या बरोबर कांही काम असेल तर तो तुम्हाला पाण्यात मिळेल. मला अग्नीची फार भीती वाटते. असे देवांना सांगून तो पुन्हा पाण्यात शिरतो. अग्नीला ते समजते कीं, बेडकांनी चुगली केली आहे. अग्नी बेडकाला शाप देतो कीं, ह्यापुढे तुम्हाला जीभेने बोलता येणार नाही. तुम्ही कांहींही खात रहाल. असा शाप देऊन तो इतरत्र लपण्यासाठी निघतो.

देवांना अग्नीचे रहस्य समजल्यानंतर ते त्या जीभ हरवलेल्या बेडकाला आशिर्वाद देतात कीं, तो जीभ नसली तरी विविध आवाज काढू शकेल. त्या आवाजांने तो त्याचे संकेत देऊ शकेल. ते चिखलात रहातील आणि रात्री खाद्य शोधण्यासाठी अधारात फिरतील. ते झाल्यानंतर देवता सगळी पृथ्वी हिंडतात अग्नीचा सुगाव काढण्यासाठी. तरी त्याना तो सांपडत नाही. त्यांना एक प्रचंड आकाराचा हत्ती भेटतो तो सांगतो कीं, त्यांनी अग्नीला एका अश्वत्थ वृक्षाच्या डोलीत बसलेला पाहिला आहे. अग्नीला ते समजते तसा तो सगळ्या हत्तीवंशाला शाप देतो कीं त्यांची जीभ उलटी होईल. तो शाप दिल्यानंतर तो यज्ञाचा देव शमी वृक्षात जाऊन लपतो. अग्नीला तपस्या करावयाची असते म्हणून तो सगळ्यांना टाळत होता. देवांच्या शोधसत्रामुळे त्याला तप करता येत नव्हते म्हणून तो त्रस्त झाला होता. हत्ती देवांना अग्नीचा ठिकाणा सांगतो म्हणून ते देव त्याला बक्षिस म्हणून त्याला आशिर्वाद देतात कीं, जीभ उलटी असली तरी त्याला खाण्यात अडचण होणार नाही. तो

चांगला चित्कार करू शकशील. अशारितीने हत्तीला साभाळून घेत ते पुन्हा अग्नीचा शोध करत असतात. तेथून निघालेला अग्नी आता शमी वृक्षाच्या खोडात जाऊन लपतो. त्या झाडावर रहाणारा पोपट अग्नीचा दाह सहन न झाल्याने देवांकडे तक्रार करतो व त्यामुळे देवांना ती जागासुद्धा समजते. अग्नीला पोपट जातीचा राग येतो व त्यांना शाप देतो कीं, ते बोलू शकणार नाही. देव तेवढ्यात अग्नीला शमीच्या झाडात पहातात. देवांना पोपटाबद्दल अनुकंपा वाटते ते त्यांना आशिर्वाद देतात कीं, जरी त्यांची जीभ वाकडी असली तरी ते "कीऽ", बोलू शकतील. तुमचे बोल लहान मुलासारखे गोड असतील व ऐकावयाला लोकांना आवडेल. अशाप्रकारे पोपटाला वरदान दिल्यावर ते त्या शमीच्या झाडाला यज्ञाच्या संमिधांसाठी योग्य असा दर्जा देऊन वरदस्त करतात. त्या काळापासून असे समजतात कीं, अग्नी शमीच्या झाडात असतो. त्याच्या काड्या घासून अग्नी निर्माण करण्याची प्रथा सुरू झाली. शमीच्या कोरड्या काठ्या घासल्याने चटकन अग्नी तयार होऊ लागला.

जेथे अग्नी राहिला होता त्या डोंगर प्रदेशातील झर्यांतून उन्हाळे वाहू लागले. अखेरीस अग्नी पळावयाचे थांबवतो व करुणा येऊन देवांना त्याचे त्याचा शोध घेण्याचे प्रयोजन काय म्हणून विचारतो. तेव्हा त्या देवता आणि ऋषी ते प्रयोजन काय ते सांगतात. त्याने ते काम केले की त्याची पत प्रतिष्ठा देवांच्या मध्ये वृद्धीगत होईल असे ते सांगतात त्यासाठी त्याला पुत्र जन्माला घालावा लागेल. त्या पुढे सांगतात कीं, एक माजोर दैत्य देव आणि ऋषीना फार पिडा देत आहे. त्याचा वध करण्यासाठी तुला एक पुत्र द्यावा लागेल कारण, कीं, महादेवीच्या शापामुळे इतर कोणी देव पुत्र जन्माला घालू शकत नाही फक्त तूंच ते करू शकतोस म्हणून आम्ही तुला शोधत होतो. त्या दैत्याचे नाव आहे तारकासूर. कारण कीं, प्रजापतीने तशी आज्ञा केली आहे कीं पावक ते कार्य करील म्हणून आम्ही तुला शोधत होतो. त्यासाठी तुला तुझ्यासारखा तेजस्वी मुलगा द्यावा लागेल. तसे केलेस तर सगळे देव आणि ऋषी तुझे उपकार मानत रहातील. नाहीतर तो दैत्य आम्हा सगळ्यांना मारून टाकील. ते ऐकून यज्ञाची देवता त्यांना सांगते, तुम्ही जसे सांगता तसे मी करण्यास तयार आहे. तेवढे बोलून तो अग्नी गंगेकडे जाऊ लागतो. तिच्याशी त्यांचा अध्यात्मिक संयोग होतो. गंगेच्या उदरात तो गर्भ वाढत असतो. त्यामुळे गंगेला फार त्रास होऊ लागतो

त्याच्या उष्णतेमुळे. तिला त्रास सहन होत नाही. ती तो गर्भ टाकण्याचे ठरवते. जेव्हां अग्नीने गंगेत त्याचे तेज सोडले तेव्हा दुसर्या एका असुराने ते पाहून त्याच्या निजी मतलबासाठी एक मोठी किंकाळी मारली होती. ती जाहनूची मुलगी त्या तापाने थरथरू लागली. गंगा अग्नीला सांगते कीं, ती तो गर्भ सांभाळू शकणार नाही. मी तो गर्भ टाकणार आहे असे ती अग्नीला सांगते. अग्नी तिला समजवून सांगतो कीं त्यात मोठे हित आहे सगळ्या चांगल्या लोकांसाठी म्हणून तू ते थोडाकाळ सहन करून त्या अग्नीला जन्मू दे. सगळ्या पृथ्वीचा भार घेणारी तू एवढी गरमी सहन करू शकत नाहीस, असें कसे चालेल. तुझ्यात जे पाणी आहे त्यांने ती उष्णता तू कमी करण्याचा प्रयास केला पाहिजेस. तरी गंगा तिचा नाइलाज सांगते तेव्हां अग्नी तिला सांगतो कीं तो गर्भ ती मेरूच्या शिखरावर टाकू शकते. अखेरीस ती तो गर्भ ठरलेल्या ठिकाणी टाकते. अग्नी तिला विचारतो तू त्याला पर्वतावर टाकले आहेस तो सुरक्षित आहे कां? तो कसा दिसतो? त्याचा आकार कसा आहे? त्यातून माझ्यासारखी उर्जा निघते कां? मला ते सगळे सांग". असे अग्नी गंगेला बोलतो.

गंगा त्याला सांगते, तो सुरक्षितपणे मेरूच्या शिखरावर ठेवलेला आहे, त्याचा रंग पिवळा सोन्यासारखा आहे. त्याचे तेज तुझ्यासारखेच आहे. तो सूर्यासारखा चमकत होता. त्याच्या प्रकाशात सगळे पिवळे चमकत होते. त्याच्यातून स्वर्गीय सुगंध येत होता. तो नीलकमळांचा तसेंच कदंबाच्या फुलांसारखा असा मिश्र होता. त्याच्या सानिध्यातील सगळे सोन्यासारखे चमकत आहे. त्याच्या शांत प्रकाशात सगळी पृथ्वी सोन्यासारखी पिवळी झाली होती. सगळ्या गोष्टींचे सोन्यात रुपांतर होत होते. असा तुझा बाळ आहे सावकाश वाढत आहे. असें सांगून गंगा अंतर्धान पावली. अग्नीसुद्धा देवतांचे काम आपण चोख बजावले आहे असे धरून त्याच्या तपस्ये करता जातो. त्या करता अग्नीला देव आणि ऋषी हिरण्यरेता असें कौतुकांने बोलतात. पृथ्वी तो दाहक अग्नीचा मुलगा धारण करते म्हणून तिला वासुमति असे ऋषी नांव देतात. तो गर्भ आकाशातून गंगेने जो टाकला तो अरण्यात वेताच्या बेटात पडतो. तेथे तो वाढत असतो. नक्षत्र कृत्तिकेला त्याचे फार प्रेम वाटते व ती त्याला अंगचे दूध पाजू लागते. म्हणून त्या बालकाचे नांव त्याच्या दूधमातेवरून कार्तिकेय असे ठेवले जाते. वेताच्या वनात वाढला आणि रूद्राच्या अंगावर

पडला म्हणून त्याला स्कंध (पडलेला) असे नांव कांहीं ऋषी देतात. त्याचा जन्म गुप्त ठेवला होता तारकासुरापासून म्हणून त्याला गुह (गुप्त) असेसुद्धा नाव मिळते. पुढे त्याच्या गणांना (सहाय्यकाना) गुह्यक म्हणून ओळखले जाऊ लागले. अशारितीने सोने गुहाच्या रुपात प्रथम आले आहे. त्यातून सगळे दागिने बनवले जाऊ लागले. सोने हा देवांचा धातू ठरला म्हणून त्यावरून जातरुपम असें आणखी एक नांव त्याला मिळाले. देवाचा धातू म्हणून तो सर्वात जास्त मौल्यवान धातू ठरला. सोन्यात अग्नी असतो म्हणून त्याला अग्नी जाळू शकत नाही.

अशारितीने ऋषी वसिष्ठ सोन्याचे मूळ सांगत होते.

त्यानंतर ब्रह्माने एक यज्ञ केला होता त्यातून सगळे चराचर उत्पन्न झाले त्याचे आख्यान वसिष्ठ ऋषी सांगतात, ज्या आख्यानाला ब्रह्मदर्शन असे बोलतात.

ब्रह्मदर्शनाची माहिती मला फार पूर्वीच्या काळात ऐकावयाला मिळाली होती. ते ब्रह्माच्या लिलेने घडले असें ऋषी सांगतात.

त्या काळात रूद्राने वरुणाचे रुप घेतले होते. त्या यज्ञाला बरेच मुनी ऋषी आमंत्रित होते. त्यात अग्रणी असलेली देवता अग्नी सुद्धा उपस्थित होती. त्या यज्ञाचे स्वरुप असें होते कीं, त्यात सगळ्या सृष्टीतील गोष्टी व्यक्त रुपात (मानवी रुपात) उपस्थित होते. त्यात सगळे सांम, यजू, ऋग असे वेदाची अंग सुद्धा मानवी रुपात हजर होते. त्यांची लक्षणं आणि चिन्ह त्यामुळे व्यक्त होत होती. संगीताचे सूर तेथे उभे होते. वाक्ये आणि व्याकरणं तेथे आली होती. सगळ्या वाणी तेथे हजर होत्या. ॐ जातीने उपस्थित होते. ते महादेवाच्या अंगाचे म्हणून आले होते. वेद, उपनिषदं, विद्या, सवितृ, भूत, वर्तमान, भविष्य, शिवाच्या बाजूला होते. त्यानंतर महादेव स्वतःला अर्घ्य देतात. तो यज्ञ विलक्षण प्रभावी होता. त्याचे वर्णन करणे शक्य नव्हते. महादेवच स्वर्ग, पाताळ आणि पृथ्वी असें तिनही होते. श्री त्याच्या भोवती प्रदक्षिणा करत होती, अग्नी त्याच्या सामावलेला होता. तोंच ब्रह्म, शिव, वरुण, रूद्र, अग्नी आणि प्रजापति असा सगळेच होता. सगळे यज्ञ तेथे हजर होते. तपस्या, सगळ्या विधी, सगळ्या देवता, दिशा देवी तेथे तळपत होती, विविध व्रतं तेथे यज्ञात भाग घेण्यासाठी उत्सुक दिसत होती. सगळ्या दिशा तेथे आलेल्या होत्या त्यात उत्तर दिशा प्रमुख होती. बाकीच्या तिच्या बाजूला होत्या. दैवी माता (ज्या देवतांना

जन्माला घालतात) तेथे यज्ञात भाग घेण्यासाठी तयार होत्या. पशुपति वरुणाच्या रुपात महादेवाचा तो यज्ञ पहात होता. सगळे अतिप्रसन्न दिसत होते. तेथे जमलेल्या स्वर्गीय सुंदर्या पाहून ब्रह्माचे वीर्य बाहेर आले. ते मातीत पडले. ते पाहून देव पुशान ते उचलतो, आणि यज्ञाच्या होमात टाकतो. त्यावेळी यज्ञ आरंभ होतो. ब्रह्म स्वतः होत्री होमात तर्पण करत असतो. ते करतांना ब्रह्मदेव फार खुषीत दिसत होते. पुन्हा त्यांचे वीर्य बाहेर येते. ते तो त्याच्या हातातील पळीत घेतो, ते यज्ञात आहूति म्हणून देतो. त्यावेळी आवश्यक मंत्र बोलले जातात. त्याबरोबर पांच प्रकारच्या जीवांची (पशू, मत्स्य, वनस्पति, पक्षी, सुक्ष्म जीव) उत्पत्ती होते. त्याच बरोबर त्याच्या तीन गुणांची (सत्त्व, रज आणि तम) सुद्धा उत्पत्ति होते. त्यामुळे रज गुण चर सजीव नियंत्रित करतो, तम अचर सजीवांचे नियंत्रण करतो आणि सत्त्व आकाशाचे व त्याबरोबर त्या दोन गुणांचे नियंत्रण करण्याचे ठरते. सत्त्व गुण बुद्धी आणि त्यातून विचार नियंत्रित करण्याचे ठरते. महादेव स्वतः जीवात्म्याच्या अंशाच्या रुपात तेथे होमातून उपस्थित होतो. ब्रह्माने आणखीन हवी यज्ञात सोडल्या नंतर तीन मानवी रुप त्यातून बाहेर आली. पहिला त्या अग्नीतून बाहेर आला त्या अग्नीला भृग म्हणतात म्हणून त्या ऋषीचे नांव भृगू झाले. दुसरा होमातील जळणार्या विस्तवातून (अंगार) आला त्याला अंगिरस असे नांव झाले. तिसरा विझलेल्या विस्तवातून आला म्हणून त्याचे कवी नांव झाले. असे भृगू, अंगिरस आणि कवी त्या होमातून व ब्रह्माच्या वीर्यातून ते मूळ पुरूष उत्पन्न झाले. भृगू नंतर त्या जळत्या विस्तवातून आणखीन कांहीं आले त्यात एक होता मरिची. त्याच्यातून काश्यप आला. त्यानंतर उरलेल्या राखेतून छोटे ऋषी उत्पन्न झाले जे त्या आधीच्या ऋषींना मदत करण्यासाठी होते त्यांचे नांव वालखिल्य असें होते. वालखिल्य यज्ञाच्या भोवती घातलेल्या कुसाच्या गादीतून आले होते. त्याच कुसाच्या गवतातून अत्री ऋषी तयार झाले. यज्ञातील उरलेल्या राखेतून इतर ऋषी आले त्यात वैखनस होते. त्यांचे वेदांचे ज्ञान पूर्ण होते. यज्ञाच्या अग्नीतून (त्याच्या डोळ्यातून) अश्विनी आले. कानातून प्रजापति आले. अग्नीच्या अंगाच्या रंध्रांतून आले त्याच्या घामाच्या रुपात छंद आणि माणसाचे मन तयार झाले. म्हणून असे म्हणतात कीं सगळ्या देवता अग्नीमध्ये समाविष्ट असतात. ते सगळे ऋषी वेदांचे ज्ञान घेऊन आले होते. अग्नीच्या ज्वाळांतून प्रकृतीचा काळ तयार झाला त्यात महिने, वर्षे, दिवस, रात्र,

पंधरवडा, मुहूर्त असें सगळे आले. अग्नीच्या रक्तात रूद्र होते. म्हणून रक्त नेहमी लाल रंगाचेच असते. त्या अग्नीच्या रक्तातून सोनेरी रंगाचा ऋषी उपजला ज्याला मैत्रदेव म्हणतात. त्याच्या धूरातून वसू आले. ज्वाळेतून बारा आदित्य उपजले. आकाशात त्यांच्या जागी असलेले नक्षत्र, तारे हे अग्नीचे जळणारे निखारे असतात असे समजले गेले. पहिल्या ब्रह्माने सांगितले कीं, अग्नीच अतिम ब्रह्मदेव आहे. त्याच्या तेजातून चैतन्य उभे झाले ज्यात विचार करण्याची क्षमता आली. त्यातून विचार सागर तयार झाला. हे सगळे रहस्यमय आहे. कोणाला सहज न समजणारे आहे.

अशारितेने सगळे सृष्टीचे नियामक आणि कार्यकारी त्या यज्ञातून तयार होत होते जे नंतरच्या काळात सृष्टी चालवणारे आहेत. महादेव सांगतो, कीं, हा यज्ञ त्याचा आहे. म्हणून ती सगळी माझी अपत्ये आहेत. ते माझ्या यज्ञाची निपज आहेत. अग्नी बोलतो, अग्नी सांगतो ते माझ्या अंगातून आले आहेत. त्यांच्या उपजीविकेसाठी त्यांना माझी गरज लागणार आहे. ते सगळे माझ्या वीर्यातून आले आहेत. महादेव वरुण (पाणी) रुपात कांहीं चुकीचे समजत आहे कीं, ते त्याचे आहेत. सरते शेवटी ब्रह्मदेव म्हणतात, ही माझी संतान आहे. ते वीर्य माझे होते. मी ते यज्ञात दिले म्हणून हे सगळे उपजले आहेत. म्हणून ती सृष्टी माझी निर्मिती आहे. ते ऐकल्यावर सगळ्या देवता ब्राह्मच्या बाजूला होतात व त्याला अभिवादन करतात. त्या महादेवाला आणि अग्नीला तुमच्या मदतीने काम केले पाहिजे असे सगळे सांगतात. ते ऐकल्यावर महादेव जो ब्रह्मातून आला होता ते मान्य करतो. तो सांगतो, जो तो आपापली जागा घेऊन काम करील. त्या आदेशातून रचना तत्त्व विकसित झाले आणि वास्तविक सृष्टीची रचना होऊ लागली. ब्रह्मदेव सांगतो कीं, अंगिरस अग्नीचा मुलगा समजावा. त्यांनी कवीला स्वताचा मुलगा म्हणून स्वीकारले. त्यानंतर पृथ्वीवर जीवांची उत्पत्ती करण्याचे कार्यक्रम ठरले.

भृगू आणि अंगिरस जे अग्नीचे होते ते जगात अनेक वंश आणि प्रजाती जन्माला घालू लागले. त्याप्रमाणे भृगू, अंगिरस आणि कवी जगाचे प्रजपति झाले. प्रथम भृगूला सात अपत्ये झाली. ते सगळे त्याच्या सारखेच समर्थ होते. त्यांचीं नावं अशी आहेत, च्यवन, वज्रशिरस, सुची, उर्व, शुक्र, विभू आणि श्रवण. त्याना व त्यांच्या वंशजांना भार्गव असे उपनाम (आडनांव) मिळाले.

अंगिरसाला आठ अपत्ये झाली. कारण कीं, महादेवांने त्यांना त्याच्या वरुण रुपात त्याची मुलं म्हणून स्वीकारले होते त्यांना वरुणी असे सुद्धा समजतात. त्यांची नांव आहेत बृहस्पति, उतथ्य, पायस, सांती, धीर, वरुप, संवर्त, सुधान्वन. ते सगळे अग्नीची मुलं समजली जातात. ते पूर्णतया निर्दोष असतात व त्यांचे कार्य ज्ञानाचे संवर्धन करण्याचे असें ठरलेले आहे. ते वेद सांभाळू लागतात.

कवीची अपत्ये सुद्धा वरुणा असें समजले जाते कारण त्याना सुद्धा ब्रह्माने स्वीकरले होते. तेसुद्धा आठ आहेत. ते विविध प्राणीमात्रांच्या प्रजातींचे मूळ आहेत. ते शुभ शकूनी आहेत. त्यांची नांव अशी आहेत, कवी, काव्य, ध्रीश्नू, उशन, भृगू, विराज, काशी, उग्र, ते त्यांच्या कामात प्रामाणिकपणे असतात. सगळ्या जगातील विविध लोक त्याच्या अपत्यांतून निपजली आहेत. म्हणून त्याना सुद्धा प्रजापति म्हणतात. अशारितीने सगळी सृष्टी ह्या तिघांच्यातून निपजली आहे.  महादेवानी वरुणाच्या रुपात अंगिरस आणि कवी ह्या दोघाना त्याची मुलं म्हणून स्वीकरले होते. असे असले तरी ते ब्राह्माचेच म्हणून समजले जात होते. त्यांच्यामध्ये समरसता होती. म्हणून ही सृष्टी निवांतपणे चालत आहे.

सगळे देव ब्रह्माच्या आदेशानेच त्यांची कामं करत असतात. अग्नी आणि महादेव त्याला साथ देत असतात. सुखी जीवनासाठी मनुष्य त्यांची आराधना करत असतो. आम्हाला तपस्या करण्याची शक्ती ते देतील अशी प्रार्थना करावयाची असते. असे सगळे मिळून पितर समजले जातात. म्हणून जेव्हां पितरांची पुजा होते तेव्हां ह्या सगळ्यांची पुजा होत असते. ते संभोगातून निपजले नसल्यामुळे (ते सगळे ऋषी विचारांतून तयार झाले आहेत) ब्रह्मचर्य प्रधान तपस्या समजली जाते. त्यांच्यातून सगळ्या देवता आणि ब्राह्मण निघाले आहेत. मरिची त्यातील पहिला समजला जातो. सगळे भार्गव तुझी अपत्ये आहेत. म्हणून आम्ही सगळे एकमेकांना सांथ देण्यास बांधलेले आहोत. संघटितपणे ही सृष्टी चालवू विश्वाच्या अंतापर्यंत अशी ते प्रार्थना करतात. त्या देवता आणि ऋषी असे आश्वासन दिल्यानंतर ब्रह्मा म्हणतो, "तथास्तू". मी तुमच्यावर प्रसन्न आहे. त्यानंतर सगळे आपापल्या ठिकाणी जातात.

असे त्या अतिप्राचीम काळी घडले आहे त्या यज्ञाच्या प्रसंगी. महादेव ज्यांने तो यज्ञ आरंभिला तोंच पशुपति ठरतो. तोंच सर्व आहे. तोंच रूद्र आहे आणि तोंच प्रजापति सुद्धा

असतो. सगळे एकच आहे. सगळे जाणतात की, सोने अग्नीची निपज आहे. म्हणून यज्ञ करतांना अग्नी करणे शक्य नसेल व सोने असेल तर सोन्यावर यज्ञ करावयाचा असतो त्यासाठी सोने कुसाच्या गादीवर ठेवून त्याची पुजा करावयाची असते व त्यानंतर ते सोने सत्पात्र ब्राह्मणाला दान करावयाचे असते. त्यामुळे देवता अग्नी संपन्न होते. असे करणार्याच्या सगळ्या इच्छा पूर्ण होतात असे वेदांत सांगितले आहे. म्हणून अग्नीला देवतांचे मुख समजतात. अग्नी ब्रह्मातून निपजला आहे आणि अग्नीतून सोने आले आहे. म्हणून सदाचारी मनुष्य जर सोन्याचे दान करत असेल तर त्याने सगळ्या देवतांची पुजा केली असे समजले जाते.

त्यानंतर भार्गव (परशुराम) राजा झाला. जो सोन्याचे दान मंत्रोच्चार करत करतो त्याच्यवर कधी अरीष्ट येत नाही. तसे दान दुपारच्या प्रहरी केले तर त्याचे शत्रू नष्ट होतात. पवित्र जीवन जगणारा उशीरा संध्याकाळी सोन्याचे दान करतो तर तो ब्रह्मलोकात जातो. अरे भार्गवा सोन्याच्या दानाची किती प्रशंसा करावी तेवढी कमी आहे. मी तुला सोन्याचे महत्व सांगितले आहे. त्यात सोने कसे आले पृथ्वीवर तेसुद्धा सांगितले.

आता सांगतो कार्तिकेय कसा मोठा झाला. त्याला दैत्यांशी युद्ध करण्यासाठी इंद्राने देवांचे सरसेनापति म्हणून नेमले. तेव्हा तो फक्त सहा महिन्याचा होता. त्याचे काम तारकासुराचा वध करण्याचे होते. त्याशिवाय इतर बरेच त्रास दायक असुर सुद्धा मारावयाचे होते. त्याने सगळ्या सदाचारी जगाचे कल्याण होणार होते.

भिष्म पुढे सांगतात, अशाप्रकारे वसिष्ठ जमदाग्नीच्या मुलाला सोन्याचे दान करण्याचे महत्व आणि इतर गोष्टी सांगतात. म्हणून तूसुद्धा ब्राह्मणांना भरपूर सोन्याची दानं करत जा. त्यामुळे राज्य करभार करतांना जी अनिवार्य पापं तू करणार आहेस त्यातून तुझी सुटका होईल.

युधिष्ठीर पुढे विचारतो, मला सांगा ते दान देणार्या ब्राह्मणांचे काय होते.

भिष्माचार्य सांगतात कीं, राजे त्यांच्या कारभाराच्या अनुषंगाने कितीतरी भयंकर पाप कृत्य करण्यास उद्युक्त होत असतात. त्या पापांचे क्षालन करणे अनिवार्य असते परंतु, राजाला ते करणे शक्य नसते कारण तो त्याच्या कारभारात व्यस्त असतो. तेव्हां ते काम करण्याची जबाबदारी अगदी प्राचीन काळापासून ब्राह्मणांवर व ऋषींवर पडत असें. कारण

त्या पापाचे निरसन करण्यासाठी पूर्णवेळ तपस्या, व्रतस्थता, ध्यानसाधना, जपयज्ञ अशा गोष्टी कराव्या लागतात ज्या एक राज्य कारभारात गुतलेला करू शकत नाही. फार प्राचीन काळापासून ती जबाबदारी आपल्या जाणकार ऋषींना ब्रह्मदेवाच्या आणि यमदेवाच्या संमतीने पवित्र जीवन जगणार्या ब्राह्मणांवर टाकली आहे. त्याकरता राजा योग्य विधीपूर्वक त्याची पापं ब्राह्मणाला धुण्यासाठी देतो व त्या कामाच्या बदल्यात योग्य प्रमाणात तो त्या ब्राह्मणांना विविध दानं (त्या कामाचा मोबदला म्हणून) करत असे. त्यात जास्त मौल्यवान दानात भूदान, गोवंशाचे दान आणि सुवर्ण दान येते त्याची माहिती तू आता समजला आहेस. त्यासाठी जे विधी सांगितले आहेत त्यात राजा प्रथम ब्राह्मणांना त्याच्या पापाचा पाढा वाचतो व ती सगळी पापं त्याना स्वीकारण्याची विनंति करतो. ते स्वीकारल्या नंतर राजा त्याच्या मोबदल्यात किती दान करावे ते त्या ब्राह्मणांना विचारतो. त्यानंतर दान घेणारे ब्राह्मण त्या कामाची (पाप धुण्याच्या कामाची) किंमत सांगतात. हा विधी ठरलेल्या स्वरूपात वेदात सांगितल्या प्रमाणे होतो. त्यानंतर राजा त्याचे पाप ब्राह्मणाला प्रथम देतो व त्याच्या बरोबर ठरलेल्या किमतीचे दान (गोदान, भूदान अथवा सुवर्ण दान) करतो. अशाप्रकारे तो दानाचा सोहळा संपन्न होत असतो. आता मी तुला ते सांगितले आणखीन काय सांगू? युधिष्ठीर विचारतो, अहो माझे आजोबा मला सांगा दान आणि भीक ह्यात काय फरक असतो? भिष्म सांगतात, दान हा व्यवहार असतो त्यात भूतदयेचे कांहीं स्थान नसते. भीक हे भूतदयेने गरीबाला केलेली मदत असते. त्यामुळे दान करणार्याचे पाप भीक घेणार्याला स्वीकारावयाचे नसते. दानाच्या व्यवहारात ब्राह्मण मोठ्या प्रमाणात अडकत असतो कारण अरे पंडूपुत्रा, कित्येक ब्राह्मण ती राजांची पाप न धूवू शकल्याने नरकात शेकडो वर्षे खितपत पडलेले मी पाहिलेले आहे. तसेंच अयोग्य ब्राह्मणांशी तो पाप घेण्याचा करार केल्यामुळे कित्येक राजे दान करूनही त्यांच्या पापात फसल्याचे मी व नारदामुनीनी पाहिले आहेत. म्हणून अरे राजा, तू दान करतांना ब्राह्मण धौम्य ऋषींच्या सल्ल्याने तपासून घेत जा. अनुशासन पर्व भाग ब्यांऐशीवा संपला.

अनुशासन पर्व तिसर्या भागांत पुढे चालू –

## - अनुशासन पर्व भाग दोन संपला -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चाने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्याकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,